पाहिजेत

हॉटेल साई इन, चोंढी-अलिबाग रोड येथे फुल टाईम/पार्ट टाईम रिसेप्शन स्टाफ/अकाऊंट पाहिजे (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक अर्जासह भेटा.

१९३७-२०२६ वर्ष १०

कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग



रायगड | रविवार | दि. २२ नोव्हेंबर २०२६ | अंक १६६ | पृष्ठ १० | किंमत ५ ₹

| आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-28 | krushival.in

वे|घ|क

७ ते १८ डिसेंबरदरम्यान नागपुरात अधिवेशन

मुंबई : महाराष्ट्र विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन ७ ते १८ डिसेंबरदरम्यान नागपुरात होणार आहे. अधिवेशनाचे कामकाज सुरळीत पार पडावे आणि लोकप्रतिनिधींच्या प्रश्नांना वेळेत उत्तरे मिळावीत, यासाठी राज्य सरकारने मंत्री आणि वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीबाबत कडक निर्देश दिले आहेत. संसदीय कार्य विभागाच्या शासन निर्णयानुसार, संबंधित विभागाचा विषय सभागृहात चर्चेला येणार असल्यास मंत्र्यांनी सभागृहात, तर विभागाच्या सचिवांनी प्रेक्षक गॅलरीत उपस्थित राहणे आवश्यक आहे. मंत्रालयात स्वतंत्र पथके नियुक्त करून सभागृहाच्या कामकाजावर लक्ष •➤पान २ वर

अदाणींच्या तारळी प्रकल्पाला दणका


सातारा : सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यातील अदाणी ग्रीन एनर्जीच्या १,५०० मेगावॅट क्षमतेच्या तारळी पंप्ड स्टोरेज प्रकल्पाला आणखी एक धक्का बसला आहे. राष्ट्रीय वन्यजीव मंडळाच्या काम थांबवण्याच्या आदेशानंतर आता महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळानेही प्रकल्पातील उत्खनन आणि बांधकामाची कामे तात्काळ बंद करण्याचे निर्देश दिले आहेत. सावरघर येथील गट क्रमांक ३३ आणि ३४ मध्ये मंडळाने केलेल्या पाहणीत आवश्यक संमती व पर्यावरणीय मंजुरीशिवाय उत्खनन आणि विकासकामे सुरू असल्याचे आढळले. मंडळाची •➤पान २ वर

लग्नाचे आमिष दाखवून २९.५१ लाखांना गंडा

पनवेल : लग्नासाठी जोडीदाराचा शोध घेत असलेल्या खारघरमधील ३७ वर्षीय तरुणीला मॅट्रिमोनियल साईटवर ओळख झालेल्या भामट्याने तब्बल २९ लाख ५१ हजार ९४७ रुपयांना गंडा घातला. ब्रिटनमधून आणलेला ब्रिटिश पौंडचा ड्राफ्ट मुंबई विमानतळावर अडकल्याचे सांगून विविध शुल्कांच्या नावाखाली ७३ वेळा ऑनलाइन पैसे उकळण्यात आले. याप्रकरणी खारघर पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे.खारघर सेक्टर ३६ येथे राहणाऱ्या तरुणीची जीवनसाथी मॅट्रिमोनियल वेबसाईटवर अभिजीत केशव शिंदे नावाच्या व्यक्तीशी ओळख झाली. आरोपीने लग्नाचे आश्वासन देत तिचा विश्वास संपादन केला. त्यानंतर ब्रिटनमधून •➤पान २ वर

चिमुरडीच्या हत्येप्रकरणी आरोपीला जन्मठेप

माणगाव : माणगाव तालुक्यातील सात वर्षीय दिया जाईलकर हिच्या हत्या प्रकरणाचा आठ वर्षांनंतर निकाल लागला आहे. माणगाव जिल्हा व सत्र न्यायालयाने आरोपी सूरज सहादेव करकरे (रा. रावे, तर्फे निजामपूर) याला जन्मठेपेची शिक्षा सुनावली असून, मृत मुलीच्या आई-वडिलांना एक लाख रुपयांची नुकसानभरपाई देण्याचे आदेश दिले आहेत. २५ मे २०१८ रोजी दिया हिची हत्या करण्यात आली होती. याप्रकरणी माणगाव पोलीस •➤पान २ वर



विजेअभावी नळ कोरडेठाक!

विद्युत जोडणीसाठी तीन कोटींचा निधी रखडला

सहा तालुक्यांतील २५ जलजीवन योजना ठप्प

हजारो नागरिक पाण्याच्या प्रतीक्षेत

प्रमोद जाधव

। रायगड ।

जलजीवन मिशनअंतर्गत पाणीपुरवठा योजनांची कामे पूर्ण झाली; मात्र विद्युत जोडणीअभावी नळ कोरडेच आहेत. रोहा, महाड, पोलादपूर, मुरूड, म्हसळा आणि माणगाव या सहा तालुक्यांतील २५ योजना विजेअभावी ठप्प आहेत. विद्युत जोडणीसाठी तीन कोटी सात लाख ६३ हजार ७९१ रुपयांचा निधी आवश्यक असताना जिल्हा प्रशासनाकडून तो उपलब्ध झालेला नाही. त्यामुळे योजना पूर्ण होऊनही हजारो नागरिकांना पाण्यासाठी प्रतीक्षा करावी लागत आहे.

वाढते पर्यटन आणि औद्योगिकीकरणामुळे ग्रामीण भागातील पाणीटंचाई गंभीर बनत आहे. जानेवारीपासूनच पाणीकपातीचे संकट निर्माण होते. ही परिस्थिती बदलण्यासाठी



> विद्युत जोडणीसाठी जिल्हा प्रशासन आणि आपत्ती व्यवस्थापन विभागाकडे निधीची मागणी केली आहे. पालकमंत्री आणि जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्हा नियोजनमधून निधी उपलब्ध करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यामुळे हा प्रश्न लवकरच मार्गी लागण्याची शक्यता आहे. - मोहन सरवदे, कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा विभाग

तालुकानिहाय २५ योजना विजेच्या प्रतीक्षेत

तालुका	योजना	आवश्यक निधी
रोहा	4	54,09,983 रु.
म्हसळा	3	33,59,430 रु.
पोलादपूर	6	83,08,166 रु.
महाड	4	57,41,150 रु.
माणगाव	5	29,72,737 रु.
मुरूड	3	23,32,669 रु.
एकूण	25	3,07,63,791 रु.

केंद्र सरकारच्या जलजीवन मिशनअंतर्गत रायगडमधील ८०९ ग्रामपंचायतींच्या हद्दीतील पाच हजार तीन गावे-वाड्यांमधील १६ लाख ६४ हजार नागरिकांसाठी नळपाणी योजना राबविण्यात आल्या. मात्र, •➤पान २ वर

स्थगिती झुगारून जमीन मोजणीचा घाट



। उरण । प्रतिनिधी ।

न्यायालयाची स्थगिती असतानाही कोप्रोलीत जमीन मोजणीचा प्रयत्न झाल्याने शेतकरी संतप्त झाले. बेस्ट रोडवेजचे मालक जयकुमार गजानन गुप्ता यांच्या मागणीनुसार, शासकीय अधिकारी पोलीस बंदोबस्तात मोजणीसाठी दाखल होताच ॲड. पर्जन्य म्हात्रे यांच्यासह शेतकऱ्यांनी जोरदार विरोध केला. न्यायालयाचा आदेश आणल्याशिवाय मोजणी होऊ देणार नाही, असा ठाम पवित्रा घेत शेतकऱ्यांनी ही कार्यवाही रोखली.

गुप्ता गेल्या २० वर्षांपासून

पोलीस बंदोबस्तात जमीन मोजणीला कोप्रोलीत शेतकऱ्यांचा विरोध

बेकायदा रस्ते, वेअरहाऊस आणि वाहने हटवण्याची मागणी

शेतकऱ्यांवर अन्याय करत असल्याचा आरोप असून, १५ हून अधिक शेतकऱ्यांनी त्यांच्याविरोधात •➤पान २ वर

पेणमध्ये ढवळाढवळ नको!

मोहितेंचा शिंदेसेनेला सज्जड इशारा

। अलिबाग । प्रतिनिधी ।

रायगडच्या राजकारणात भाजप आणि शिंदेसेनेतील अंतर्गत संघर्षाला आता नवे वळण मिळाले आहे. पेणमधील भाजप कार्यकर्त्यांनी शिंदेसेनेत प्रवेश केल्याच्या पार्श्वभूमीवर भाजपचे ॲड. महेश मोहिते आक्रमक झाले आहेत. पेणच्या राजकारणात हस्तक्षेप करू नका, असा थेट इशारा त्यांनी शिंदेसेनेला दिल्याने महायुतीतील मतभेद पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत. राष्ट्रवादी आणि शिंदेसेनेतील वाद विकोपाला गेलेला असतानाच आता शिंदेसेनेविरोधात भाजपनेही रणशिंग फुंकले आहे. यामुळे



आगामी काळात महायुतीतील शिंदेसेनेच्या राजकीय अस्तित्वावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

पेणमधील भाजप कार्यकर्त्यांच्या पक्षांतरामुळे स्थानिक राजकीय समीकरणांवर परिणाम होत असल्याची पार्श्वभूमी या वादाला आहे. कार्यकर्त्यांच्या पक्षांतरानंतर मोहिते यांनी आपली भूमिका स्पष्ट करत शिंदेसेनेने पेणमध्ये हस्तक्षेप करू नये, असा इशारा दिला. त्यामुळे पेणमध्ये भाजप आणि शिंदेसेनेतील राजकीय संघर्ष अधिक तीव्र होण्याची चिन्हे आहेत. मोहिते यांनी केवळ पेणपुरतीच भूमिका मर्यादित न ठेवता शिंदेसेनेला अलिबाग तालुक्याबाबतही सल्ला दिला. 'अलिबाग तालुक्यात भविष्यात आपला मतदारसंघ शिल्लक राहील का, याची आधी काळजी घ्या,' अशा आशयाची टिप्पणी करत त्यांनी शिंदेसेनेच्या स्थानिक राजकीय अस्तित्वावरच प्रश्न उपस्थित केला.

आधी आमदार महेंद्र दळवी आणि महेश मोहिते यांच्यातील शाब्दिक चकमक, त्यानंतर शिवसेनेचे जिल्हाप्रमुख राजा केणी यांनी मोहिते •➤पान २ वर

यात्रांच्या उत्सवाने रायगड बहरणार

साजगावपासून चौल-भोवाळेपर्यंत गावोगावी उत्सवांची लगबग

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्याला यात्रांची समृद्ध परंपरा लाभली आहे. भात कापणीचा हंगाम संपल्यानंतर कार्तिकी एकादशीपासून सुरू होणारा यात्रांचा उत्सव यंदाही गावागावांत रंगणार आहे. शनिवारपासून (दि. २१) साजगावच्या बोंबले विठोबाच्या यात्रेला सुरुवात झाली असून, त्यापाठोपाठ आवास, कनकेश्वर, वरसोली आणि चौल-भोवाळे येथील यात्रांमुळे डिसेंबरअखेरपर्यंत रायगड जिल्हा भक्ती, श्रद्धा आणि उत्साहाच्या वातावरणात न्हाऊन निघणार आहे.

खालापूर तालुक्यातील प्रतिपंढरपूर म्हणून ओळखल्या



जाणाऱ्या साजगाव येथील विठ्ठलाचा उत्सव कार्तिकी एकादशीपासून सुरू झाला आहे. त्यानंतर सोमवारी (दि. २३) अलिबाग तालुक्यातील आवास येथील नागेश्वर यात्रा भरणार आहे. मंगळवार (दि. २४) आणि बुधवार (दि. २५) नोव्हेंबर रोजी •➤पान २ वर

यात्रांचे वेळापत्रक

- २१ नोव्हेंबर : साजगाव बोंबले विठोबा यात्रा
- २३ नोव्हेंबर : आवास नागेश्वर यात्रा
- २४ व २५ नोव्हेंबर : कनकेश्वर यात्रा
- ४ डिसेंबर : वरसोली विठ्ठल-रखुमाई पाच दिवस यात्रा
- २३ डिसेंबर : चौल-भोवाळे यात्रा

टाटा धरणाच्या ब्लास्टिंगचा तडाखा

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील भिवपुरी येथे टाटा कंपनीच्या नवीन धरणासाठी सुरू असलेल्या सुरुंग स्फोटांचे हादरे आता थेट गावांपर्यंत पोहोचले आहेत. ब्लास्टिंगमधून उडालेले दगड अंगावर पडल्याने तापकीरवाडीतील एक महिला आणि शाळकरी विद्यार्थी जखमी झाला. प्रकल्पाचे काम सुरू असतानाच ग्रामस्थांच्या जीवावर बेतणारी परिस्थिती निर्माण झाली आहे. आज दोन जण जखमी झाले; उद्या मोठी दुर्घटना घडण्याची वाट प्रशासन पाहात आहे का, असा संतप्त सवाल ग्रामस्थ विचारत आहेत.

टाटा धरणाच्या ब्लास्टिंगमुळे तापकीरवाडी, मोरमारावाडा आणि धनगरवाडीतील घरांना हादरे बसत असून, भिंतींना तडे जाण्याच्या



- **दगड उडून महिला आणि शाळकरी विद्यार्थी जखमी**
- **तापकीरवाडी, धनगरवाडीत भीतीचे सावट**

तक्रारी आहेत. स्फोटांच्या प्रचंड आवाजामुळे लहान मुले, विद्यार्थी आणि ज्येष्ठ •➤पान २ वर


आधुनिक खारघरच्या शेजारी धामोले वाडीची परवड

स्मशानभूमीअभावी उघड्यावर अंत्यसंस्काराची वेळ

। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।

एका बाजूला धनदांडग्यांसाठी आलिशान गोल्फ कोर्स, आधुनिक सुविधांचा झगमगाट; तर दुसऱ्या बाजूला आदिवासी बांधवांना मृत व्यक्तीवर अंत्यसंस्कार करण्यासाठी हक्काची जागाही नाही. आधुनिक खारघरच्या अगदी शेजारी असलेल्या धामोले आदिवासी वाडीतील हे विदारक वास्तव ३२ वर्षीय सुभाष कातकरी यांच्या मृत्यूनंतर समोर आले. स्मशानभूमीअभावी त्यांच्या पार्थिवावर उघड्यावर अंत्यसंस्कार करण्याची वेळ आदिवासी बांधवांवर आली. विकासाच्या गप्पा मारणाऱ्या व्यवस्थेला हा थेट सवाल आहे.

धामोले आदिवासी वाडीच्या परिसरात धनदांडग्यांसाठी आधुनिक गोल्फ •➤पान २ वर



मृत्यूनंतरही पदरी यातना

धामोले आदिवासी वाडीचा परिसर पनवेल महानगरपालिका क्षेत्रात येतो. त्यामुळे स्मशानभूमीसाठी जागा निश्चित करून अंत्यविधीच्या सुविधा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी महापालिकेची आहे. आदिवासी बांधवांना मृत्यूनंतरही सन्मानाने अंत्यसंस्काराचा हक्क मिळणार की त्यासाठीही संघर्ष करावा लागणार, असा सवाल उपस्थित होत आहे.

> धामोले आदिवासी वाडीतील नागरिकांना अंत्यविधीसाठी स्मशानभूमी उपलब्ध नसणे ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. आधुनिक खारघरच्या शेजारी राहणाऱ्या आदिवासी बांधवांना अंत्यसंस्कारासाठी जागा मिळू नये, ही खेदाची बाब आहे. पनवेल महानगरपालिकेने या गंभीर प्रश्नाकडे तातडीने लक्ष देऊन आदिवासी वाडीसाठी हक्काची स्मशानभूमी उपलब्ध करून द्यावी. - लीला कातकरी, नगरसेविका, काँग्रेस

ठेकेदारासह इंजिनियरवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा



। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

नागाव-खारगल्ली दरम्यान रस्त्यावर केलेल्या कामातील निष्काळजीपणामुळे झालेल्या अपघातात बोरपाडा येथील प्रकाश काशिनाथ भगत (५४) यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी ठेकेदार, इंजिनियर आणि कामावर देखरेख करणाऱ्या कंपनीच्या टीम लिडरविरोधात अलिबाग पोलीस ठाण्यात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नागाव ते रेवदंडा रस्त्याचे सिमेंट काँक्रिटीकरण आरपीपी इन्फ्रा प्रोजेक्ट लिमिटेड कंपनीमार्फत सुरू आहे. नागाव येथील खारगल्ली बसथांब्याजवळ रस्त्याच्या दोन्ही बाजूंचे काँक्रिटीकरण पूर्ण •➤पान २ वर

प्रशांत नाईक यांच्या वाढदिवसानिमित्त आरोग्य शिबीर | **नेत्र, मधुमेह, हिमोग्लोबिनसह विविध तपासण्या**

शुभेच्छांची आरोग्यसेवेतून परतफेड!

। अलिबाग । प्रतिनिधी ।

शुभेच्छांचा आनंद स्वतःपुरता मर्यादित न ठेवता तो समाजाच्या आरोग्याशी जोडण्याचा आदर्श उपक्रम अलिबाग नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष तथा विद्यमान वीज व बांधकाम सभापतीप्रशांत नाईक यांनी वाढदिवसानिमित्त राबविला. सत्कार, हार-तुरे आणि जल्लोषाऐवजी मोफत आरोग्य तपासणी शिबिराच्या माध्यमातून त्यांनी नागरिकांच्या आरोग्याला प्राधान्य दिले. सामाजिक बांधिलकी जपत वाढदिवसाच्या शुभेच्छांना समाजोपयोगी कृतीतून दिलेली ही परतफेड विशेष ठरली.

जलसापाडा, कस्टम ऑफिससमोर, अलिबाग येथे शनिवारी (दि. २१) सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत हे शिबीर पार पडले.





प्रशांत नाईक यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. लायन्स क्लब अलिबाग यांच्या सौजन्याने आणि लायन्स हेल्थ फाऊंडेशन यांच्या सहकार्याने आयोजित या शिबिरात नागरिकांसाठी मोफत नेत्रतपासणी, मधुमेह, हिमोग्लोबिन पाटील तसेच गौतम पाटील, जनार्दन वरसोलकर, समीर ठाकूर, साक्षी पाटील, अश्विनी ठोसर, नीलम हजारे, निवेदिता वाघमारे, नागेश कुलकर्णी यांच्यासह नगरसेवक, पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डॉ. अदिती कीर, डॉ. सतीश निचिते, केतकी भगत, सिद्धी पाटील, प्राची केणी आणि कम लाकर पाटील यांचे विशेष सहकार्य लाभले. अलिबाग शहर पुरोगामी युवक संघटनेचे शहरप्रमुख कपिल अनुभवे आणि सहप्रमुख युगांत म्हात्रे यांनी शिबिराच्या आयोजनासाठी पुढाकार घेतला.



शवविच्छेदन कर्मचारीच नाही!

● चौक येथील कर्मचाऱ्याच्या भरवशावर काम सुरू

● आरोग्य विभागाचे दुर्लक्ष, रिक्तपद तातडीने भरण्याची मागणी

। खोपोली । प्रतिनिधी ।

खालापूर प्राथमिक आरोग्य केंद्रात गेल्या आठ महिन्यांपासून शवविच्छेदनासाठी कर्मचारीच नसल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. संबंधित कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यानंतर रिक्त पद भरण्याची तसदी आरोग्य विभागाने घेतलेली नाही. त्यामुळे पोस्टमार्टमची प्रक्रिया चौक प्राथमिक आरोग्य केंद्रातील कर्मचाऱ्याच्या भरवशावर सुरू आहे. आरोग्य विभागाच्या या भोंगळ कारभाराचा फटका मृतांच्या नातेवाईकांना बसत आहे. खालापूर प्राथमिक आरोग्य केंद्रातील शवविच्छेदन कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांच्या जागी नवीन नियुक्ती झालेली नाही.

त्यामुळे तालुक्यात दुर्घटना किंवा अनैसर्गिक मृत्यूची घटना घडल्यास चौक येथील कर्मचाऱ्याला बोलवावे लागते. परिणामी, शवविच्छेदन प्रक्रियेला विलंब होण्याची शक्यता असून, दुःखात असलेल्या कुटुंबियांना आणखी प्रतीक्षा करावी लागते.

चौकच्या कर्मचाऱ्यावर किती दिवस भार?

एका आरोग्य केंद्रातील महत्त्वाची सेवा दुसऱ्या केंद्रातील कर्मचाऱ्याच्या उपलब्धतेवर अवलंबून राहणे ही आरोग्य विभागाच्या नियोजनाची शोकांतिका आहे. शवविच्छेदनासारख्या संवेदनशील प्रक्रियेसाठी कायम स्वरूपी कर्मचारी नसणे गंभीर बाब आहे. खालापूरचे रिक्त पद तातडीने भरावे आणि चौकच्या कर्मचाऱ्यावरील अतिरिक्त भार कमी करावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

खालापूर तालुका भौगोलिकदृष्ट्या विस्तीर्ण असताना आरोग्य यंत्रणेतील मनुष्यबळाची कमतरता अधिकच गंभीर ठरत आहे. चौक येथील कर्मचाऱ्याला स्वतःच्या केंद्राची जबाबदारी सांभाळून खालापूरची अतिरिक्त जबाबदारीही पार पाडावी लागत आहे. आठ महिने उलटूनही रिक्त पद न भरण्याम गचे कारण काय, असा सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत.

अधीक्षक अभियंता पवारांचा सत्कार

खोपोली : महावितरणच्या पेण मंडळाचा नव्याने कार्यभार स्वीकारलेले अधीक्षक अभियंता दत्तात्रय पवार यांचा महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी पवार यांना क्रांती ऊर्जा डायरी, महापुरुषांची पुस्तके, रोपटे आणि शाल देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी संघटनेचे भांडुप परिमंडळ अध्यक्ष विजय शिरसाळे, उपाध्यक्ष गणेश वाघ, सहसचिव सुहास कुंभार, पेण मंडळ अध्यक्ष संजय जाधव, सचिव विलास खताळ, अलिबाग विभाग अध्यक्ष चंद्रकांत फसाळे आदी मान्यवर उपस्थित होते.

रायगड दर्शन आता १०० रुपयांत?

स्वस्त रोप-वे उभारण्यासाठी संभाजीराजेंचा पुढाकार

। महाड । प्रतिनिधी ।

सध्याच्या रोप-वेचे दर सर्वसामान्य शिवभक्तांना परवडत नसताना आता अवघ्या १०० ते १५० रुपयांत रायगडावर जाऊन पुन्हा खाली येण्याची सुविधा उपलब्ध होण्याची शक्यता आहे. यासाठी स्वस्त आणि अद्ययावत रोप-वे उभारण्याचा प्रस्ताव रायगड प्राधिकरणाचे अध्यक्ष छत्रपती संभाजीराजे यांनी पुढे आणला आहे. शिवभक्तांच्या भेटीदरम्यान त्यांनी ही माहिती दिली.

रायगड किल्ल्याचे संवर्धन आणि जतन शास्त्रोक्त पद्धतीने सुरू आहे. मात्र, सध्याच्या रोप-वेवरील वाढता ताण आणि सर्वसामान्यांना न परवडणारे दर लक्षात घेऊन नव्या



रोप-वेचा विचार सुरू आहे.

यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल शिवभक्तांनाही दुर्गराज रायगडाचे दर्शन घेणे शक्य होणार आहे. या प्रकल्पामुळे रायगडाच्या पंचक्रोशीतील २१ गावांमध्ये रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होण्याचीही अपेक्षा आहे. या रोप-वेच्या मंजुरीसाठी गेल्या चार ते पाच वर्षांपासून दिल्लीतील पुरातत्त्व विभागाकडे पाठपुरावा सुरू असल्याचे संभाजीराजे यांनी सांगितले.

मात्र, पुरातत्त्व विभागाची मंजुरी कधी मिळणार आणि स्वस्त रोप-वेचे स्वप्न प्रत्यक्षात कधी उतरणार, याकडे शिवभक्तांचे लक्ष लागले आहे.

भरधाव कारच्या धडकेत पादचारी ठार



। महाड । प्रतिनिधी ।

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर महाडजवळील धारिया पेट्रोल पंप परिसरात भरधाव मारुती व्हॅगनार कारने दिलेल्या जोरदार धडकेत एका ५४ वर्षीय पादचाऱ्याचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना शनिवारी सकाळी घडली. राकेश जयदेव जगे शिया, रा. महाड असे मृत व्यक्तीचे नाव आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, मारुती सुझुकी कंपनीची व्हॅगनार कार (क्र. एमएच १२ व्हीटी ५८६६) मुळशी, जिल्हा पुणे येथून चिपळूणच्या दिशेने जात होती. ही कार अजित रवींद्र गुदले (३४, रा. मुळशी, जि. पुणे) चालवत होते. धारिया पेट्रोल पंपाजवळ चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने रस्त्याच्या बाजूला उभे असलेल्या राकेश जगे शिया यांना कारने जोरदार धडक दिली. या अपघातात त्यांच्या डोक्याला, हाताला आणि पायाला गंभीर दुखापत झाली. त्यांना तातडीने महाड ग्रामीण रुग्णालयात नेण्याचा प्रयत्न करण्यात आला; मात्र रुग्णालयात पोहोचण्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. अपघाताची माहिती मिळताच महामार्ग वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक रामेश्वर ढाकणे, हेडकॉन्स्टेबल मोरे आणि पोलीस शिपाई ढाकणे यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी वाहतूक सुरळीत करण्यासाठी मदत केली. या अपघातामुळे मुंबई-गोवा महामार्गावरील वाहनांच्या वेगाचा आणि पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

सुप्रिया जोशींचा शोधनिबंध आंतरराष्ट्रीय नियतकालिकात

खोपोली : सुप्रसिद्ध क्लिनिकल न्यूट्रिशनिस्ट आणि डायबेटीस एज्युकेटर सुप्रिया जोशी यांचा शोधनिबंध ''डायबेटीस रिसर्च अँड क्लिनिकल प्रॅक्टिस'' या आंतरराष्ट्रीय वैद्यकीय नियतकालिकात प्रसिद्ध झाला आहे. हे नियतकालिक आंतरराष्ट्रीय मधुमेह महासंघाचे अधिकृत नियतकालिक असून, जागतिक प्रकाशन संस्था एल्सेव्हियरतर्फे प्रकाशित केले जाते. मुंबई (मीरा रोड) येथील मधुमेहतज्ज्ञ डॉ. आशीर्वाद पवार हे या लेखाचे सहलेखक आहेत. पीएमओएस असलेल्या अनेक महिलांना जीएलपी-१ गटातील औषधे (उदा. सेमाग्लुटाइड) दिली जातात. ही औषधे भूक कमी करून वजन घटवण्यास मदत करतात. भूक कमी झाल्याने प्रथिने (प्रोटीन), जीवनसत्त्वे आणि खनिजे कमी पडण्याचा धोका असू शकतो. या काळात आहार कसा असावा, याबद्दल सध्या स्पष्ट मार्गदर्शन उपलब्ध नाही, ही उणीव या लेखात मांडली आहे.

वनराई बंधाऱ्यांतून पाणीटंचाईला तात्पुरता दिलासा

■ धरणे, पक्के बंधारे, अपूर्ण जलजीवन योजनांना मुहूर्त कधी?



। माणगाव । प्रतिनिधी ।

पावसाळ्यात वाहून जाणारे पाणी अडविण्याऐवजी उन्हाळ्यात टँकरच्या मागे धावण्याची वेळ रायगडकरांवर येत आहे. माणगाव तालुक्यात ग्रामस्थांनी श्रमदानातून उभारलेल्या ११५ वनराई बंधाऱ्यांनी पाणीटंचाईला काहीसा दिलासा दिला असला, तरी कायमस्वरूपी जलसाठ्याचा प्रश्न कायम आहे. समृद्धी महामार्ग उभा राहिला; मग रायगडला जलसमृद्ध करणारे प्रकल्प कधी पूर्ण होणार, हा सवाल आहे.

माणगाव तालुक्याला २०० वनराई बंधाऱ्यांचे उद्दिष्ट देण्यात आले असून, ११५ बंधारे पूर्ण झाले आहेत. उर्वरित ८५ बंधाऱ्यांची कामे सुरू आहेत. पंचायत समितीचे सभापती विलास शिंदे, उपसभापती मनीषा मालुरे आणि गटविकास अधिकारी शुभदा पाटील-कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविली जात आहे.

होडगाव ग्रामपंचायतीच्या जांभूळवाडी येथे ग्रामस्थांनी श्रमदानातून नदीवर बंधारा उभारला. त्यामुळे नदीपात्रातील पाणीसाठा वाढून तीन गावांच्या पाणीपुरवठा योजनेच्या जॅकवेलला दिलासा मिळाला आहे. पशुधनाच्या पाण्याचाही प्रश्न काही प्रमाणात सुटला आहे. लोकसहभागातून जलसंवर्धन शक्य असल्याचे या उपक्रमाने दाखवून दिले आहे.

मात्र, वनराई बंधारे हा कायमस्वरूपी उपाय नाही. माणगावमधील कुंभे जलविद्युत प्रकल्प वर्षानुवर्षे अपूर्ण आहे. पन्हळघर धरणाच्या पाण्याचा सिंचनासाठी अपेक्षित वापर होत नाही. माकटी, चेरवली आणि डोंगरोली येथील प्रस्तावित धरणांनाही गती मिळालेली नाही. दुसरीकडे जलजीवन मिशनची अनेक कामे अपूर्ण असल्याने गावांतील पाणीप्रश्न कायम आहे. रायगडमध्ये मुबलक पाऊस पडतो; मात्र पावसाचे पाणी नद्या-नाल्यांतून थेट समुद्राला मिळते. उन्हाळ्यात त्याच जिल्ह्यातील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी संघर्ष करावा लागतो.

अल्पवयीन मुलीशी गैरवर्तन

पनवेल : १३ वर्षीय अल्पवयीन मुलीशी अश्लील भाषेत गैरवर्तन करून तिच्या आईलाही धमकावल्याप्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात एका व्यक्तीविरोधात पोक्सो कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीडित मुलीच्या आईने दिलेल्या तक्रारीनंतर पोलिसांनी कारवाई केली. १८ नोव्हेंबर रोजी रात्री साडेआठच्या सुमारास शेजारी राहणाऱ्या एका व्यक्तीने मुलीला उद्देशून अश्लील भाषा वापरल्याचा तसेच मुलगी आणि तिच्या आईला धमकावल्याचा आरोप आहे. या घटनेनंतर पोलीस मित्र अपराध नियंत्रण व आंतरराष्ट्रीय मानवाधिकार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे यांची भेट घेऊन कारवाईची मागणी केली. त्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आला.

IIFL FINANCE

आयआयएफएल फायनान्स लिमिटेड CIN: L67100MH1995PLC093797
नोंदणीकृत कार्यालय: आयआयएफएल हाऊस, सन इन्फोटेक पार्क, रोड क्र. 16व्ही, प्लॉट क्र. बी-23, ठाणे औद्योगिक क्षेत्र, वागळे इस्टेट, ठाणे – 400604
दूरध्वनी: 022-41035000 • फॅक्स: 022-25806654 • टोल-फ्री: 1860-267-3000
ई-मेल: gold-helpline@iifl.com • वेबसाइट: www.iifl.com

सार्वजनिक सूचना – तारण ठेवलेल्या सोन्याच्या मालमत्तेचा लिलाव

याद्वारे संबंधित कर्जदार/कर्जदारांना, त्यांच्या कायदेशीर वारसांना तसेच सर्वसामान्य जनतेला सूचित करण्यात येते की, एक भारतीय रिझर्व्ह बँकेत नोंदणीकृत बिगर-बँकिंग वित्तीय कंपनी (एनबीएफसी), आयआयएफएल फायनान्स लिमिटेड ("आयआयएफएल") येथे नमूद केलेल्या कर्ज खात्यांमध्ये तारण ठेवलेल्या सोन्याच्या तारणमालमत्तेचा सार्वजनिक लिलाव आयोजित करीत आहे. संबंधित कर्जदारांनी लिलावाच्या सूचना व उपलब्ध पत्रव्यवहार माध्यमांद्वारे पाठविण्यात आलेल्या स्मरणपत्रांनंतरही आपल्या कर्जाची परतफेड किंवा खाते नियमित केलेले नसल्यामुळे, भारतीय रिझर्व्ह बँकेने वेळोवेळी जारी केलेल्या लागू निर्देशांनुसार ("आरबीआय निर्देश"), कर्ज करारातील अटी व शर्ती तसेच आयआयएफएलच्या संचालक मंडळाने मंजूर केलेल्या सुवर्ण कर्ज (गोल्ड लोन) धोरणानुसार हा लिलाव करण्यात येणार आहे.

लिलावाची तारीख, वेळ आणि ठिकाण: सार्वजनिक लिलाव दि. **०१.१२.२०२६** रोजी **सकाळी १०:०० वाजल्यापासून** पुढे नमूद आयआयएफएल शाखेत आयोजित करण्यात येईल – **मुंबई – पनवेल सेक्टर १९: आयआयएफएल फायनान्स लिमिटेड, गिरिजा आनंद बनवाली, तळमजला, दुकान क्रमांक १/२/३, सेक्टर १९, स्टेशन रोड, विजय मार्ग, ४१०२०६.**

हा लिलाव त्याच जिल्ह्यातील कर्ज वितरण करणाऱ्या शाखांच्या कर्ज खात्यांशी संबंधित आहे.

सुवर्ण कर्ज (गोल्ड लोन) खात्यांचा तपशील: कर्ज खात्यांचे क्रमांक – GL44076174, GL44035097, GL42935912, GL44157207, GL43486726, GL43095915, GL44212707, GL44119175, GL45352819, GL46182157, GL41971827, GL42929904, GL43480031, GL44493189, GL44371800, GL48914399, GL44357628, GL41029871, GL41031362, GL50834192, GL41287517, GL41291792, GL44029292, GL41220098, GL50922164, GL44885602, GL49504413, GL41938442, GL43012590, GL46892874, GL43500973, GL43016992, GL52511712, GL46766888, GL42906528, GL42457363, GL40759513, GL44573162, GL44140948, GL44530259, GL41773675, GL44773929, GL44060039, GL47759909, GL44318433, GL41439875, GL43094794, GL43808047, GL42855463, GL46770033, GL44036544, GL43345991, GL43048781, GL44172640, GL46110816, GL42137248, GL45421864, GL47770478, GL47597947, GL43778364, GL46178873, GL42171828, GL48578906, GL42172676, GL45098610, GL44310546, GL44250373, GL46458374, GL44078500, GL44009938, GL44969089, GL42781914, GL40339951, GL44808343, GL44089827, GL44053373, GL42901821, GL52025051, GL44011208, GL47242673, GL44158530, GL44150354, GL48723222, GL47442732, GL43823847, GL44240130, GL45030967, GL49147804, GL46971701, GL46633595, GL44738226, GL41332062, GL42843803, GL42223838, GL46844692, GL43854814, GL43528165, GL43481645, GL50917467, GL41854220, GL41317964, GL44794896, GL44525980, GL43297199, GL43344101, GL47109190, GL46915895, GL49807105, GL47823694, GL43883918, GL47862221, GL49006399, GL42272168, GL42803968, GL49363597, GL46648114, GL39074037, GL48330255, GL43175255, GL45134004, GL47382371, GL45679961, GL46072797, GL45957780, GL44290650, GL46894675, GL46821407, GL50691208, GL47037114, GL42233698, GL39493816, GL47035903, GL46097248, GL44268646, GL42532455, GL44391837, GL42606515, GL46815961, GL42032617, GL43732370, GL46684697, GL46406986, GL46588263, GL43774934, GL42858064, GL41790659, GL44670390, GL41195782, GL44411854, GL45775038, GL43895903, GL44288929, GL45704764, GL38830433, GL47238334, GL47916525, GL45787673, GL42818200, GL43117965, GL43595500, GL50293796, GL42737720, GL44235244, GL47387931, GL49237995, GL50562392, GL47161011, GL48125805, GL43204717, GL46591637, GL41781056, GL44486516, GL45640135, GL44849695, GL50697674, GL44151403, GL47210616, GL42967566, GL40430365, GL44157195, GL48962910, GL40529696, GL42953296, GL47700724, GL45785117, GL43867277, GL43898162, GL44469210, GL40513114, GL42178330, GL42738535, GL45318832, GL44068493, GL47816704, GL47891864, GL43151197, GL48516181, GL46782941, GL40132616, GL43397282, GL43376909, GL45057309, GL41939878, GL48896915, GL44099621, GL44083204, GL46631963, GL49019991, GL44102492, GL44077276, GL48634324, GL50465386, GL40999136, GL50477015, GL44820867, GL46687799, GL40986831, GL44386629, GL43932886, GL43923081, GL48935633, GL44372425, GL44735290, GL46577814, GL45492149, GL45768277, GL47928599, GL41009809, GL46526704, GL45660140, GL46894457, GL46750088, GL47045556, GL47865706, GL45972150, GL44143434, GL45777472, GL44293199, GL43492181, GL47315403, GL48177410, GL45811619, GL46376051, GL46115274, GL43497316, GL46646027, GL44172806, GL48066563, GL46773937, GL46306427, GL37835803, GL43875848, GL45506662, GL42627977, GL42829615, GL41553824, GL44025498, GL47853322, GL40770054, GL43294753, GL40868829, GL44012085, GL46635767, GL44802921, GL47155182, GL41555316, GL45749550, GL46110637, GL45679640, GL43911701, GL43971525, GL46848717, GL44302238, GL44558440, GL48512151, GL43946260, GL47244781, GL47044759, GL46083211, GL49393585, GL44869376, GL43941178, GL47442306, GL46599066, GL43984003, GL44018219, GL44235290, GL44619508, GL45880332, GL43980517, GL46416054, GL49468076, GL46766082, GL45782993, GL46837910, GL44070536, GL44382154, GL49266812, GL44393666, GL41647696, GL44652094, GL49238286, GL44109553, GL47421280, GL41396167, GL41562142, GL42001162, GL46404978, GL47121010, GL45810337, GL42671297, GL42671492.

थकबाकीदार कर्जदारांची नावे, तारण ठेवलेल्या सोन्याच्या मालमत्तेचा तपशील तसेच संबंधित कर्ज वितरण शाखेचा पत्ता हा संबंधित कर्ज वितरण शाखेत आणि वरील लिलाव केंद्रावर प्रदर्शित करण्यात आलेला आहे. तसेच ही माहिती आयआयएफएलच्या ग्राहक सेवा केंद्रावर 1860-267-3000 या क्रमांकावर किंवा www.iifl.com या संकेतस्थळावरूनही प्राप्त करता येईल.

लिलावापूर्वी कर्जाची परतफेड करण्याचा अधिकार: कर्जदार/कायदेशीर वारस लिलावाच्या तारखेपर्यंत कोणत्याही वेळी कर्ज करार आणि मुख्य माहिती निवेदन (केएफएस) मध्ये नमूद केल्याप्रमाणे संपूर्ण थकीत रक्कम, अद्ययावत व्याज तसेच लागू असलेले सर्व शुल्क भरून कर्ज खाते बंद करू शकतात किंवा नियमित करू शकतात. अशा परिस्थितीत संबंधित कर्ज खाते लिलावातून वगळण्यात येईल.

या प्रकाशनाच्या तारखेला किंवा त्यानंतर बंद केलेल्या किंवा नियमित केलेल्या खात्यांकडून प्रमाणशीर प्रकाशन शुल्क वसूल केले जाईल.

मृत कर्जदार: ज्या प्रकरणांमध्ये कर्जदाराचे निधन झाले आहे, त्या प्रकरणांमध्ये ही सूचना आणि लिलावाच्या अटी कर्जदाराच्या कायदेशीर वारसांनाही लागू राहतील.

राखीव किंमत: भारतीय रिझर्व्ह बँकेच्या निर्देशांनुसार निश्चित करण्यात आलेल्या तारण ठेवलेल्या सोन्याच्या विद्यमान मूल्याच्या किमान 90% (ज्या कर्ज खात्यांमध्ये लिलाव दोन वेळा अयशस्वी ठरला आहे, त्यांच्यासाठी 85%) इतक्या राखीव किंमतीच्या अधीन राहून लिलाव करण्यात येईल.

विक्रीचा आधार: लिलाव "ज्या स्थितीत आहे त्या स्थितीत" "ज्या स्वरूपात आहे त्या स्वरूपात" आणि "जे काही उपलब्ध आहे त्या आधारावर" या तत्त्वांवर आयोजित करण्यात येईल. इच्छुक बोलीदारांनी बोली लावण्यापूर्वी प्रदर्शित केलेल्या तारण ठेवलेल्या सोन्याच्या तपशीलाची पाहणी करून स्वतःची खात्री करून घ्यावी.

लिलाव पुढे ढकलणे / लिलावातून वगळणे: आयआयएफएल आवश्यक कारणांची नोंद करून, त्यामध्ये कर्जाची परतफेड किंवा खाते नियमित होणे, कोणत्याही न्यायालयाचे किंवा प्राधिकरणाचे आदेश अथवा कार्यकारी कारणे यांचा समावेश असू शकतो, लिलाव पुढे ढकलू शकते किंवा कोणतेही कर्ज खाते लिलावातून वगळू शकते.

लिलावाची तारीख किंवा ठिकाण यामध्ये कोणताही बदल झाल्यास, तो लिलाव केंद्रात तसेच संबंधित कर्ज वितरण शाखेत प्रदर्शित करण्यात येईल.

या सूचनेमध्ये नमूद केलेल्या दिवशी लिलाव आयोजित करणे किंवा पूर्ण करणे शक्य न झाल्यास, आयआयएफएल आपल्या विवेकाधिकाराने, योग्य पूर्वसूचना देऊन, त्याच जिल्ह्यात किंवा लगतच्या जिल्ह्यात पुढील तारखेला लिलाव आयोजित करू शकते किंवा सुरू ठेवू शकते अथवा ऑनलाइन लिलाव आयोजित करू शकते.

हितसंबंधांचा संघर्ष नसणे: भारतीय रिझर्व्ह बँकेच्या निर्देशांचे पालन करून, आयआयएफएल तसेच त्याच्याशी संबंधित पक्ष या लिलावात सहभागी होणार नाहीत.

लिलावातून प्राप्त रक्कम: लिलावातून प्राप्त झालेल्या रकमेचा, तसेच त्यातून समायोजित करण्यात आलेल्या थकबाकीचा संपूर्ण तपशील कर्जदार/कायदेशीर वारसांना उपलब्ध करून दिला जाईल. लिलावातून थकबाकी वजा केल्यानंतर काही शिल्लक रक्कम राहिल्यास, (कर्जदाराच्या बँक खात्याचा तपशील उपलब्ध असल्यास) संपूर्ण लिलाव रक्कम प्राप्त झाल्यापासून सात कामकाजाच्या दिवसांच्या आत ती परत करण्यात येईल. त्यामुळे कर्जदारांनी आपले अद्ययावत बँक खात्याचे तपशील संबंधित कर्ज वितरण शाखेकडे नोंदवावेत. लिलावात कोणतीही तूट राहिल्यास, ती कर्ज करारातील अटींनुसार वसूल करण्यात येईल.

अधिक तपशील तसेच अटी व शर्तींसाठी, कृपया आयआयएफएल फायनान्स लिमिटेडच्या संबंधित कर्ज वितरण शाखेशी (जिचा पत्ता खात्यांच्या यादीसह प्रदर्शित करण्यात आलेला आहे) किंवा आयआयएफएल ग्राहक सेवा केंद्राशी 1860-267-3000 या क्रमांकावर संपर्क साधावा.

सही/-
अधिकृत स्वाक्षरीकर्ता
आयआयएफएल फायनान्स लिमिटेड

दिनांक: २२.११.२०२६
स्थळ: रायगड (एम. एच.)

पान १ वरून

विजेअभावी नळ कोरडेठाक!

नियोजनातील त्रुटींमुळे या योजनांचा बोजवारा उडाल्याचे चित्र आहे.

सहा तालुक्यांतील २५ योजनांची कामे पूर्ण झाली आहेत. त्यात रोहा चार, म्हसळा तीन, पोलादपूर सहा, महाड चार, माणगाव पाच आणि मुरूडमधील तीन योजनांचा समावेश आहे. मात्र, पाणी उपसण्यासाठी आणि घरापर्यंत पोहोचविण्यासाठी रोहित्र, विद्युत खांब आणि तारांची जोडणी आवश्यक आहे. त्यासाठी तीन कोटी सात लाख ६३ हजार ७९१ रुपयांचा निधी हवा आहे.

जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा विभागाने जिल्हा नियोजन आणि आपत्ती व्यवस्थापन विभागाकडे निधीची मागणी केली आहे. वारंवार पत्रव्यवहार करूनही निधी मिळालेला नाही. परिणामी, पूर्ण झालेल्या योजनांचा उपयोगच होत नसल्याने प्रशासनाच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

स्थगिती झुगारून जमीन मोजणीचा घाट

न्यायालयात दावे दाखल केले आहेत. पनवेल आणि उरण दिवाणी न्यायालयाचे आदेश असतानाही दोन प्रकरणांत ते झुगारून रस्त्यांचे काँक्रिटीकरण आणि गोडाऊन उभारल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. पिकत्या जमिनीत भराव टाकून काँक्रिटचे रस्ते तयार करण्यात आले. यासाठी आवश्यक परवानग्या घेतल्या नाहीत, रॉयल्टीही भरली नसल्याचा दावा ॲड. म्हात्रे यांनी केला. शेतकऱ्यांच्या जागेत कंटेनर आणि टेम्पो उभे करून जमिनीचा व्यावसायिक वापर केला जात असल्याने शेतीचे नुकसान होत असल्याचेही त्यांनी सांगितले. अनधिकृत वेअरहाऊसमध्ये दुर्घटना घडल्यास जबाबदारी कोणाची, असा सवालही शेतकऱ्यांनी उपस्थित केला.

याबाबत पोलीस, जिल्हाधिकारी, एमएमआरडीए आणि तहसीलदारांकडे वारंवार तक्रारी करून, मोर्चे काढूनही कारवाई झाली नसल्याचा आरोप आहे. शेतकऱ्यांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करणारी यंत्रणा गुप्ता यांच्या अर्जावर मात्र तत्परतेने हालचाल करते, अशी टीका आंदोलकांनी केली.

न्यायालयाचा आदेश मिळेपर्यंत जमीन मोजणी करू नये. शेतकऱ्यांच्या जमिनीतील बेकायदा रस्ते, वेअरहाऊस आणि उभी केलेली वाहने तातडीने हटवावीत, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

पेणमध्ये ढवळाढवळ नको!

यांच्यावर परप्रांतीय असल्याची केलेली टिप्पणी आणि आता पेणमधील कार्यकर्त्यांच्या पक्षांतरावरून मोहिते यांनी दिलेला इशारा, अशा घटनांमुळे रायगडमध्ये भाजप-शिंदेसेना संघर्षाची चर्चा रंगली आहे.

राज्यात सत्तेत एकत्र असलेल्या महायुतीतील दोन घटक पक्षांमध्ये रायगडमध्ये मात्र स्थानिक वर्चस्व, कार्यकर्त्यांचे पक्षांतर आणि मतदारसंघातील राजकीय प्रभाव यावरून मतभेद समोर येत आहेत. पेणमधील या इशाऱ्यानंतर शिंदेसेना काय भूमिका घेणार आणि भाजपचे स्थानिक नेतृत्व आपली भूमिका अधिक आक्रमक करणार का, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

यात्रांच्या उत्सवाने रायगड बहरणार

कनकेश्वर यात्रा होणार आहे. वरसोली येथील विठ्ठल-रखुमाई मंदिरात ४ डिसेंबरपासून उत्सवाला सुरुवात होणार असून, यानिमित्त पाच दिवस यात्रा भरणार आहे. तर, चौल-भोवाळे येथे २३ डिसेंबरपासून दत्तजयंती सोहळा आणि यात्रेची लगबग सुरू होणार आहे.

या प्रमुख यात्रांमुळे नोव्हेंबर आणि डिसेंबर महिना उत्सवमय होणार आहे. यात्रांच्या निमित्ताने भाविकांची मोठी गर्दी होणार असून, धार्मिक विधींसह विविध सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल राहणार आहे. खाद्यपदार्थ, घरगुती वस्तू, पूजेचे साहित्य आणि खेळण्यांची दुकाने सजणार आहेत. त्यामुळे स्थानिक व्यापारी, छोटे व्यावसायिक आणि विक्रेत्यांना रोजगाराची संधी मिळणार असून, ग्रामीण बाजारपेठांमध्ये आर्थिक उलाढाल वाढणार आहे.

नोकरी-व्यवसायानिमित्त बाहेरगावी स्थायिक झालेले चाकरमानी, नातेवाईक आणि माहेरवाशिणीही यात्रेच्या निमित्ताने पुन्हा गावाकडे परतणार आहेत. त्यामुळे गावागावांत नात्यांची भेट, परंपरांचा जागर आणि उत्सवाचा आनंद अनुभवायला मिळणार आहे. श्रद्धा आणि भक्तिभावाबरोबरच व्यापार, रोजगार आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देणारा रायगडचा यात्रोत्सव यंदाही विशेष ठरणार आहे.

आधुनिक खारघरच्या शेजारी धामोले वाडीची परवड

कोर्स उभारण्यात आला आहे. या गोल्फ कोर्सच्या परिसरातून आदिवासी वाडीकडे जाण्यासाठी रस्ताही आहे. मात्र, एका बाजूला गोल्फ कोर्सचा झगमगाट आणि दुसऱ्या बाजूला मृत व्यक्तीच्या अंत्यविधीसाठी जागेसाठी संघर्ष करणारे आदिवासी बांधव, असे विरोधाभासी चित्र पाहायला मिळाले. ३२ वर्षीय सुभाष कातकरी यांच्या मृत्यूनंतर निर्माण झालेल्या या परिस्थितीमुळे स्मशानभूमीचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. वाडीला कायमस्वरूपी स्मशानभूमी उपलब्ध करून देण्याची मागणी स्थानिकांकडून होत आहे. दरम्यान, प्रशासनाने याबाबीकडे गांभीर्याने लक्ष घालून धामोले वाडीसाठी स्मशानभूमी उभारुन द्यावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

टाटा धरणाच्या ब्लास्टिंगचा तडाखा

नागरिक भयभीत आहेत. धनगरवाडीतील घरे धरणाच्या अगदी जवळ असल्याने तेथील ग्रामस्थांनाही जीव मुठीत धरून राहावे लागत आहे. धरणाचे काम पूर्ण झाल्यानंतर या परिसरावर नेमके कोणते परिणाम होतील, याची चिंता आतापासूनच व्यक्त होत आहे. ब्लास्टिंगमुळे आताच दगड घरांवर येत असतील, तर स्फोटांची तीव्रता वाढल्यास आणि धरणाचे काम पुढे गेल्यास परिस्थिती किती गंभीर होईल, असा प्रश्न उपस्थित होत आहे. तापकीरवाडीतील आदिवासी कुटुंबांना घरांसाठी पर्यायी जमीनही दिली जात नसल्याची तक्रार आहे.

दगड उडून महिला आणि विद्यार्थी जखमी झाल्यानंतर कंपनीच्या प्रतिनिधींनी घटनास्थळी पाहणी करून दोघांना कर्जत उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. मात्र, यापूर्वी पाहणी होऊनही नुकसानभरपाईचा प्रश्न प्रलंबित असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. याप्रकरणी तहसीलदार, उपविभागीय पोलीस अधिकारी आणि जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार करण्यात आल्याची माहिती जखमी कुटुंबातील हेमंत नवले यांनी दिली.

बाधित गावांतील सर्व घरांचे स्वतंत्र तांत्रिक सर्वेक्षण करावे, ब्लास्टिंगची तीव्रता आणि जमिनीतील कंपनांची शास्त्रीय नोंद घ्यावी, सुरक्षिततेच्या नियमांची काटेकोर अंमलबजावणी करावी आणि नुकसानग्रस्तांना तातडीने भरपाई द्यावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. दीड वर्षांपासून सुरू असलेल्या या त्रासाकडे कंपनी आणि प्रशासनाने आता तरी गांभीर्याने पाहावे, अशी त्यांची मागणी आहे.

७ ते १८ डिसेंबरदरम्यान नागपुरात अधिवेशन

ठेवले जाणार आहे. तारांकित-अतारांकित प्रश्न, लक्षवेधी सूचना आणि मंत्र्यांनी दिलेल्या आश्वासनांवर तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. विभागीय सचिवांनी अधिवेशन काळात दर आठवड्याला आढावा बैठक घेऊन प्रलंबित प्रश्नांचा निपटारा करावा, असे सरकारने स्पष्ट केले आहे.

अदाणींच्या तारळी प्रकल्पाला दणका

पूर्वपरवानगी मिळेपर्यंत कोणतेही काम पुन्हा सुरू करू नये, अन्यथा कायदेशीर कारवाईचा इशाराही देण्यात आला आहे.

मानद वन्यजीव रक्षक रोहन भाटे यांनी या प्रकल्पातील कथित अनियमितता आणि पर्यावरणीय नियमांच्या उल्लंघनाबाबत तक्रार केली होती. त्यानंतर ही कारवाई करण्यात आली. तारळी नदीच्या खोऱ्यात उभारण्यात येणाऱ्या या प्रकल्पात विजेची मागणी कमी असताना पाणी वरच्या जलाशयात पंप केले जाते, तर मागणी वाढल्यावर पाणी खाली सोडून वीज निर्मिती केली जाते.

लग्नाचे आमिष दाखवून २९.५१ लाखांना गंडा

आणलेला मोठ्या रकमेचा डिमांड ड्राफ्ट कस्टम विभागाने रोखल्याचे सांगितले. तो सोडविण्यासाठी सरकारी कर, आरबीआय प्रक्रिया, सीबीआय मंजुरी आणि विविध शुल्क भरावे लागतील, असे सांगून पैशांची मागणी केली. तरुणीच्या खात्यात ६ कोटी ४६ लाख रुपये जमा होणार असल्याचे बनावट ई-मेल आणि सं

पांडुरंगाच्या जयघोषाने रायगड दुमदुमला

|| विठ्ठल नामाने रंगला मंगलमय सोहळा || जिल्ह्यातील मंदिरामध्ये भाविकांची गर्दी

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

रायगड जिल्ह्यातील विठ्ठल मंदिरांमध्ये शनिवारी (दि.२१) मंगलमय सोहळा साजरा झाला. कार्तिकी एकादशीनिमित्त अलिबागसह जिल्ह्यातील दोनशेहून अधिक विठ्ठल-रुक्मिणी मंदिरांमध्ये दर्शनासाठी सकाळपासून भाविकांच्या रांगा लागल्या होत्या. विधिवत पूजा, अभिषेक, भजन, कीर्तन आणि विविध धार्मिक कार्यक्रमांसह विठ्ठल नामाच्या जयघोषाने जिल्ह्यातील मंदिर परिसर भक्तीमय झाले होते.

कार्तिकी एकादशीनिमित्त मंदारामध्ये पहाटेच्यावेळी काकड आरती, अभिषेक, महापूजेचे आयोजन करण्यात आले होते. या उत्सवानिमित्त मंदिरांवर आणि परिसरात आकर्षक फुलांची सजावट आणि विद्युत रोषणाई करण्यात आली होती. टाळ मृदूंगाच्या गजरात हरिनामाचा जयघोष करीत सकाळपासून विठ्ठल रखुमाईच्या मंदिरात भाविकांची दर्शनासाठी गर्दी होऊ लागली.



अलिबाग शहराच्या नजीक असलेल्या वरसोली येथील आंग्रेकालीन विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात पहाटेपासूनच भाविकांच्या रांगा लागल्या होत्या. विधिवत पूजा आणि धार्मिक विधी पार पडल्यानंतर भाविकांसाठी दर्शन खुले करण्यात आले. वेगवेगळ्या भागातील भजनी मंडळांनी भजनातून विठुरायाचा गजर केला. प्रति पंढरपूर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रायगड जिल्ह्यातील खालापूर तालुक्यातील साजगाव येथील विठ्ठल मंदिरातही कार्तिकी एकादशीनिमित्त भाविकांनी अलोट गर्दी करून रांगेतून विठ्ठल रखुमाईचे दर्शन घेतले.

अलिबागसह जिल्ह्यातील विविध गावांमधील विठ्ठल मंदिरांत पारंपरिक धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. संपूर्ण परिसर भजन किर्तनासह हरिनामाच्या जयघोषाने दणाणून गेला होता.एक वेगळा उत्साह या निमित्ताने भाविकांच्या चेहऱ्यावर दिसून आला. कार्तिकी एकादशीचे महत्वदेखील या निमित्ताने पटवून देण्याचा प्रयत्न भजन, किर्तनाच्या माध्यमातून देण्यात आला. दरम्यान जिल्ह्यातील काही मंदिरांच्या परिसरात खाद्य पदार्थांसह पुजेचे साहित्य हार,तुळस, फुलांची दुकाने सजली होती.

प्रशासनाकडून विशेष नियोजन

वाढती गर्दी लक्षात घेता मंदिर समिती आणि स्थानिक प्रशासनाकडून विशेष नियोजन करण्यात आले आहे. भाविकांच्या सोयीसाठी पिण्याचे पाणी, स्वच्छता आणि आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. तसेच, कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलीस प्रशासनाकडून मंदिर परिसरात चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

निवडक



कार्तिकी एकादशीनिमित्त भक्तीमय वातावरण

खांदा कॉलनी : कार्तिकी एकादशीनिमित्त पंढरपूर येथे विठुरायाच्या दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली असताना पनवेलमध्येही भक्तीमय वातावरण पाहायला मिळाले. पनवेलच्या जुन्या भाजी मार्केट परिसरातील शिंपी समाजाच्या सुमारे दीडशे वर्षांपूर्वीच्या ऐतिहासिक विठ्ठल-रखुमाई मंदिरात दर्शनासाठी सकाळपासूनच भाविकांची रीघ लागली होती. मंदिरातील विठ्ठल-रखुमाईच्या मूर्तींची आकर्षक सजावट करण्यात आली होती. फुलांच्या सजावटीने मंदिर परिसर अधिकच प्रसन्न आणि भक्तीमय झाला होता. पहाटेपासूनच भाविकांनी मंदिरात येऊन विठुरायाचे दर्शन घेतले. महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच तरुण भाविकांचीही दर्शनासाठी उपस्थिती होती. पंढरपूरला जाऊन विठ्ठलाचे दर्शन घेणे शक्य नसलेल्या अनेक भाविकांनी पनवेलमधील या ऐतिहासिक मंदिरात येऊन विठ्ठल-रखुमाईचे दर्शन घेतले. टाळ-मृदंगाचा गजर, विठ्ठल नामाचा जयघोष आणि भक्तांच्या उपस्थितीमुळे मंदिर परिसरात दिवसभर उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. दीडशे वर्षांची धार्मिक परंपरा जपणारे हे मंदिर कार्तिकी एकादशीच्या निमित्ताने पुन्हा एकदा भाविकांच्या श्रद्धेचे केंद्र ठरले. विठ्ठलाच्या दर्शनाने भाविकांनी समाधान व्यक्त केले.

विठ्ठल मंदिर दिंडी सोहळ्याने परिसर दुमदुमला



पाली /गोमाशी : विठ्ठल-रुक्मिणी मंदिर, आनंद आश्रम फाऊंडेशन, गोमाशी येथे शनिवार (दि.२१) नोव्हेंबर रोजी कार्तिकी एकादशी महोत्सव मोठ्या भक्तिभावाने व उत्साहात साजरा झाला. कार्तिकी एकादशी निमित्त नांदगाव विद्यालय ते आनंद आश्रम गोमाशी विठ्ठल मंदिर येथे दिंडी सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी विद्यार्थ्यांनी वारकरी, विठ्ठल-रखुमाई वेशभूषा करून दिंडीत सहभाग घेतला. टाळ-मृदुंगाच्या गजरात, हरिनामाचा जयघोष करत निघालेल्या या दिंडीने संपूर्ण परिसर भक्तीमय झाला होता. या दिंडी सोहळ्यात सुरेश खैरे, अनुपजी गुप्ता, सुधीर मराठे, नांदगाव पंचक्रोशीतील वारकरी संप्रदायाची मंडळी, शिक्षक वृंद मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. तालुक्यातील विद्यार्थी आणि शिक्षकांसाठी अभंग गायन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. स्पर्धकांनी सुमधुर अभंग सादर करून उपस्थितांची मने जिंकली. या कार्यक्रमासाठी गटशिक्षणाधिकारी साधुराम बांगारे, प्राचार्य अशोक शिंदे, केंद्रप्रमुख राणे, इंदुलकर, तालुक्यातील अभंग स्पर्धक, शिक्षक, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय थळे, राजेंद्र अंबिके यांनी केले.

मजगाव-विहूरचा रस्ता ठरतोय अपघाताला आमंत्रण



कोर्लई : राष्ट्रीय रस्ते विकास महामंडळातर्फे साळाव-मुरुड रस्त्याच्या काँक्रिटीकरणात मजगाव ते विहूर दरम्यान दोन्ही बाजूंनी खणलेले रस्ते अपघाताला आमंत्रण ठरत असून वाहनचालकांची डोकेदुखी वाढली आहे. पर्यटनात होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे तासनतास खोळंबा सहन करावा लागत आहे. यामध्ये अपघाताच्या घटना घडल्या आहेत. राष्ट्रीय रस्ते विकास महामंडळातर्फे साळाव-मुरुड रस्त्याच्या काँक्रिटीकरणात कामे चांगली करण्यात येत असली तरी काशीद युटर्न, दांडा, नांदगाव, मजगाव, मजगाव गावठाण तसेच विहूर ते नबाबाचा राजवाडा दरम्यान वळणावर रस्त्याच्या कामात दोन्ही बाजूला खणलेले रस्ते,खडी वाहनचालकांची डोकेदुखी ठरत असून वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागत आहे. वेळप्रसंगी याठिकाणी अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. राष्ट्रीय रस्ते विकास महामंडळाने यात लक्ष घालून योग्य ती उपाययोजना करण्याची मागणी वाहनचालक व प्रवासी वर्गातून केली जात आहे.

कमळ नागरी पतसंस्थेला 'इंडियन को-ऑपरेटिव्ह एक्सलन्स अवॉर्ड' प्रदान

सहकार, सामाजिक क्षेत्रातील कार्याचा गौरव

| अलिबाग | प्रतिनिधी |

कमळ नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, अलिबाग या संस्थेने सहकार व सामाजिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याची राष्ट्रीय स्तरावर दखल घेण्यात आली असून, संस्थेला प्रतिष्ठेचा 'Indian Co- operative Summit & Excellence Awards २०२६ हा राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. गुरुवारी (दि. १२) नोव्हेंबर रोजी नवी दिल्ली येथील द अशोक हॉटेल, चाणक्यपुरी येथे आयोजित भव्य इंडियन को-ऑपरेटिव्ह समिट अँड एक्सलन्स अवॉर्ड्स २०२६ या सोहळ्यात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.



रिझर्व्ह बँकेचे माजी संचालक सतीश मराठे, ज्योतिंद्र मेहता, लक्ष्मी दास, गौतम ठाकूर, विद्याधर व्ही. अनास्कर, अजय झा, रोहित गुप्ता, मान्यवरांच्या हस्ते संस्थेच्या प्रतिनिधींनी हा सन्मान स्वीकारला.

या पुरस्कार सोहळ्याप्रसंगी कमळ नागरी सहकारी पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष गिरीश तुळपुळे, नंदकुमार चाळके, सतीशचंद्र पाटील, प्रवीण जैन, हिमांशू सहानी, रंजन पाटील, देवेंद्र कारुळकर उपस्थित होते. या राष्ट्रीय सोहळ्यात देशभरातील सहकारी क्षेत्रातील विविध संस्थांना ७० हुन अधिक पुरस्कार प्रदान करण्यात आले. विशेष म्हणजे, हे पुरस्कार केवळ मोठ्या आणि नामांकित सहकारी संस्थांपुरते मर्यादित न ठेवता लहान नागरी सहकारी बँका, राज्य सहकारी बँका तसेच विविध नागरी सहकारी पतसंस्थांनाही त्यांच्या उल्लेखनीय कार्यासाठी गौरविण्यात आले.

सोहळ्याला देशाच्या विविध भागांतील सहकारी बँका, पतसंस्था आणि अन्य सहकारी संस्थांचे पदाधिकारी व प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यामुळे या राष्ट्रीय सोहळ्याला सहकार क्षेत्रातील व्यापक प्रतिनिधित्व लाभले.

संस्थेच्या या यशामध्ये संस्थापक अध्यक्ष व अध्यक्ष, संचालक मंडळ, अधिकारी, कर्मचारी आणि संस्थेवर विश्वास ठेवणारे सभासद यांचे मोलाचे योगदान आहे. प्राप्त झालेला हा राष्ट्रीय पुरस्कार म्हणजे संस्थेच्या आजवरच्या कार्याची पावती असून, भविष्यात अधिक जोमाने सहकार आणि सामाजिक क्षेत्रात कार्य करण्यासाठी प्रेरणादायी ठरणार आहे. या सन्मानामुळे पतसंस्थेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, जिल्ह्याच्या सहकार क्षेत्रासाठी ही अत्यंत अभिमानास्पद आणि गौरवास्पद बाब ठरली आहे.

गवळवाडीत भक्तीमय सोहळा उत्साहात

| म्हसळा | प्रतिनिधी |

म्हसळा तालुक्यातील शहरातील प्रति पंढरपूर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या म्हसळा गवळवाडी येथील विठ्ठल-रखुमाई मंदिरात सालाबादप्रमाणे कार्तिक भागवत एकादशीचा पवित्र उत्सव अत्यंत भक्तिभावाने व उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. भक्तांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत भजन, कीर्तन व महाआरतीत सहभागी होत सर्वांनी विठ्ठल-रखुमाईचे दर्शन घेतले. यावर्षी पूजेचा मान अंकिता काते यांना मिळाला. सुधाकर जंगम गुरुजीनी केलेल्या मंत्रोपचारात त्यांच्या हस्ते विधिवत पूजा संपन्न झाली.

कारच्या धडकेत दोघे जखमी

| नवीन पनवेल | प्रतिनिधी |

दुचाकीला कारने पाठीमागून दिलेल्या धडकेत दुचाकी वरील दोघेजण जखमी झाले. या प्रकरणी एर्टिगा कार वरील चालका विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात १४ नोव्हेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. अमोल कुमार बोधिराज हे सुकापुर, सुवर्णभूमी कॉम्प्लेक्स येथे राहत असून १३ नोव्हेंबर रोजी रात्री अकराच्या सुमारास ते आणि त्यांचा भाऊ दिनेश बोधिराज हे हळदीचा कार्यक्रम असल्याने दोघेही दुचाकी घेऊन सुकापुर ते टोल बुद्रुकला गेले होते. हळदीचा कार्यक्रम उरकून ते १४ नोव्हेंबर रोजी रात्री सव्वा बाराच्या सुमारास पनवेल येथील राहत्या घरी पळस्पे फाटा ते सुकापुर या ठिकाणी येत होते. यावेळी दिनेश गाडी चालवत होता. अमोल कुमार पाठीमागे बसले होते. पहाटे पावणेतीनच्या सुमारास रॉयल एनफिल्ड शोरूम समोरील रस्त्यावर भिंगारी गाव, पनवेल येथे रस्त्यावर स्पीड ब्रेकर आल्याने दिनेशने ब्रेक दाबला आणि यावेळी पाठीमागून आलेल्या सुझुकी एर्टिगा कार क्रमांक एम एच ४६ बीए ५७६३ वरील चालकाने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. यावेळी अमोल आणि दिनेश दोघेही खाली पडले. यात दोघेही जखमी झाले. त्यांना रिक्षामधून तेथील लोकांनी एमजीएम हॉस्पिटल कामोठे येथे पाठवले. यावेळी कारचालक दोघांनाही वैद्यकीय मदत न करता निघून गेला.

रोह्यात शेतीची कामे अंतिम टप्प्यात

शेतकऱ्यांची धान्य विक्रीसाठी लगबग

| धाटाव | प्रतिनिधी |

रोहा तालुक्यात सध्या भातकापणीचा हंगाम अंतिम टप्प्यात पोहोचला असून ग्रामीण भागात शेतकऱ्यांची शेतीकामांची लगबग वाढली आहे. यंदाच्या हंगामात शेतांमध्ये पिकलेले भात कापून त्याची मळणी करण्याचे काम वेगाने सुरू आहे. घरापासून काही अंतरावर असलेल्या शेतावरील भाताचे बांधून ठेवलेले भारे डोक्यावर वाहताना कसरत करावी लागत आहे. तर तेच भारे गोल आकारात रचून मळा करीत रचण्यात शेतकरी व्यस्त आहेत.काहीठिकाणी भाताची मळणी उरकून भात बारदान्यात भरून माळ्यावरून वाहनांतून विक्रीसाठी घेऊन जात काहीठिकाणी चित्र पहायला मिळत आहे.



पावसाळ्यात घेतलेल्या मेहनतीचे फळ आता शेतकऱ्यांच्या पदरात पडू लागले आहे. अनेक गावांमध्ये भातकापणी पूर्ण झाली असून काही ठिकाणी मळणी आणि धान्य सुकविण्याची कामे सुरू आहेत. कापणी केलेले भात सुरक्षित ठेवण्यासाठी शेतकरी विशेष काळजी घेत आहेत. धान्य घरात आल्यानंतर आता शेतकऱ्यांचे लक्ष भात विक्रीकडे लागले आहे.बाजारपेठेत योग्य भाव मिळावा, यासाठी शेतकरी विविध पर्यायांचा विचार करीत आहेत. शासकीय हमीभावाने धान्य विक्री करता यावी,यासाठी आवश्यक कागदपत्रांची जुळवाजुळवही सुरू आहे.

मात्र, भातशेतीसाठी लागणारा वाढता उत्पादन खर्च,मजुरीचे वाढलेले दर, खते, बियाणे आणि औषधांच्या किमती यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित बिघडत असल्याची भावना अनेक शेतकरी वर्गाकडून व्यक्त करण्यात आली.



● मुरुड समुद्रकिनारा स्वच्छ सुंदर हिवाळी सुट्टीसाठी सज्ज झाला आहे. पर्यटकांची वाट पाहत आहे. नारळ सुपारीच्या बागा हिरवाईने सजल्या आहेत. (छायाचित्र : सुधीर नाझरे)

तळवलीच्या वारकऱ्यांची पायी दिंडी

पाताळगंगा : जिल्ह्यातील बोंबल्या विठोबाच्या साजगाव यात्रेला कार्तिकी एकादशीपासून भक्तीमय वातावरणात प्रारंभ झाला आहे. विठुरायाच्या चरणी लीन होण्यासाठी वारकरी संप्रदायाकडून पायी दिंड्यांचे आयोजन करण्यात येत आहे. याच अनुषंगाने तळवली गावातील वारकऱ्यांनी साजगाव यात्रेसाठी पायी दिंडी काढली. या पायी दिंडीचे नियोजन मधुकर मालकर, तानाजी मालकर, भरत मालकर, रामदास मालकर, पांडुरंग मालकर, भगवान मालकर, जे.के. मालकर, मोतीराम मालकर, महेंद्र मालकर, अंकुश मालकर, सागर मालकर आदींनी केले होते.

कर्नाळा अभयारण्यात पाणीसाठ्याची व्यवस्था

उन्हाळ्यात वन्यजीवांना मिळणार दिलासा



| पनवेल | प्रतिनिधी |

आगामी उन्हाळ्यात उद्भवणारी पाणीटंचाई लक्षात घेऊन कर्नाळा पक्षी अभयारण्यात वनविभागाने पाणीसाठ्याची व्यवस्था केली आहे. पावसाळ्यात डोंगराळ भागातून वाहून जाणारे पाणी अडविण्यासाठी अभयारण्यात सहा ठिकाणी सिमेंट नाला बांध उभारण्यात आले आहेत. या कामामुळे उन्हाळ्यात पक्षी आणि वन्यप्राण्यांना पिण्यासाठी पाणी उपलब्ध होणार आहे.

कर्नाळा पक्षी अभयारण्य विविध प्रजातींचे पक्षी आणि वन्यप्राण्यांचे नैसर्गिक अधिवासस्थान आहे. उन्हाळ्यात जंगलातील नैसर्गिक पाणवठे आटत असल्याने वन्यजीवांची पाण्यासाठी भटकंती होते. ही समस्या टाळण्यासाठी पावसाचे पाणी जंगलातच अडवून त्याचा साठा करण्याचे नियोजन वनविभागाने केले आहे.

अभयारण्याच्या डोंगराळ भागातून पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाणी वाहून जाते. हे पाणी अडवून ठेवण्यासाठी सहा ठिकाणी लहान सिमेंट नाला बांध बांधण्यात आले आहेत. या बंधाऱ्यांमध्ये जमा होणारा पाणीसाठा उन्हाळ्यात वन्यजीवांसाठी उपयोगी ठरणार आहे. प्रधान मुख्य वनसंरक्षक रेड्डी यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम हाती घेण्यात आला. राहुल गवई, उपवनसंरक्षक, ठाणे, मनोहर दिवेकर, कर्नाळा यांच्या मार्गदर्शनाखाली हे काम पूर्ण करण्यात आले.

वन्यजीवांचे संरक्षण करताना त्यांच्या अधिवासात पाणी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने वनविभागाने केलेली ही व्यवस्था महत्त्वपूर्ण मानली जात आहे. पावसाचे पाणी अडवून त्याचा साठा करण्याच्या या उपाययोजनेमुळे वन्यप्राण्यांना उन्हाळ्यात दिलासा मिळणार आहे.


हवेच्या गुणवत्तेची तपासणी | नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर

पहाटेच्या धुक्याआड प्रदूषणाचे साम्राज्य

| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |

निरोगी आरोग्यासाठी पहाटे उठून मोकळ्या हवेत फिरायला जाण्याचा सल्ला दिला जातो. मात्र, पनवेल महानगरपालिका क्षेत्रात सध्या पहाटेच्या वेळी वाढणारे प्रदूषण नागरिकांच्या आरोग्यासाठी चिंतेचा विषय बनले आहे. शहरातील गार्डन, टेकड्या आणि मोकळ्या जागांवर मॉर्निंग वॉकसाठी जाणाऱ्या नागरिकांना स्वच्छ हवेऐवजी प्रदूषित वातावरणाचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे आरोग्य चांगले राखण्यासाठी घराबाहेर पडणारा मॉर्निंग वॉकच धोकादायक ठरण्याची भीती व्यक्त होत आहे.

खारघर टेकडीवर पहाटेच्या वेळी फिरायला जाणाऱ्या नागरिकांनाही प्रदूषणाची तीव्रता जाणवत आहे. परिसरात धुरकट वातावरण पसरलेले असते. इतकेच नव्हे, तर टेकडीवरून समोर असलेल्या उंच इमारतीही स्पष्टपणे दिसत नसल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. यामुळे हे केवळ धुके आहे की हवेतील प्रदूषणाचे प्रमाण वाढले आहे, असा प्रश्न नागरिकांना पडला आहे.



पहाटेच्या वेळी लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत महिला आणि पुरुष मोठ्या संख्येने चालण्यासाठी घराबाहेर पडतात. अनेक नागरिक आरोग्य चांगले राहावे, श्वसनाचे विकार टाळावेत आणि दिवसभर उत्साही राहावे, या उद्देशाने नियमित मॉर्निंग वॉक करतात.

मात्र, हवेत प्रदूषित कणांचे प्रमाण वाढले असल्यास अशा नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

पनवेल, खारघर, कळंबोली आणि कामोठे परिसरात वाढते शहरीकरण, बांधकामे, वाहनांची वर्दळ आणि धुळीमुळे हवेच्या गुणवत्तेचा प्रश्न निर्माण होत आहे. पहाटेच्या वेळी प्रदूषणाची नेमकी पातळी किती असते, याची अधिकृत आकडेवारी नागरिकांसमोर येणे आवश्यक आहे.

एकीकडे पनवेल महानगरपालिका स्वच्छ आणि सुंदर शहराचा संकल्प करीत असताना दुसरीकडे नागरिकांना स्वच्छ हवा मिळणार तरी कधी, असा सवाल उपस्थित होत आहे. महानगरपालिका प्रशासनाने पहाटेच्या वेळेतील हवेच्या गुणवत्तेची तपासणी करून प्रदूषणाची कारणे शोधावीत आणि त्यावर तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

स्वच्छ हवेसाठी नागरिकांची प्रतीक्षा

शहरातील प्रदूषणाचा प्रश्न केवळ दिवसा रस्त्यांवर दिसणाऱ्या धुळीपुरता मर्यादित राहिलेला नाही. पहाटेच्या वेळीही प्रदूषित वातावरणाचा सामना करावा लागत असेल, तर नागरिकांनी आरोग्य जपण्यासाठी जायचे कुठे? पनवेल महानगरपालिका प्रशासन या गंभीर प्रश्नाकडे लक्ष देऊन नागरिकांना स्वच्छ हवा देण्यासाठी ठोस पावले कधी उचलणार, असा प्रश्न आता पनवेलकर विचारत आहेत.

अंतिम मतदार यादी २२ डिसेंबरला

मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम



| रायगड | प्रतिनिधी |

भारत निवडणूक आयोगाने मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत अनुपस्थित, स्थलांतरित, मृत आणि दुबार प्रवर्गातील मतदारांसाठी गणना अर्ज सादर करण्याची आणखी एक संधी उपलब्ध करून दिली आहे. तसेच गणना अर्ज वितरण व संकलन आणि त्यानंतरच्या पुनरीक्षण प्रक्रियेचे सुधारित वेळापत्रक जाहीर केले आहे. त्यानुसार अंतिम मतदार यादी दि. २२ डिसेंबर २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येणार असल्याची माहिती उपजिल्हा निवडणूक अधिकारी नितीन वाघमारे यांनी दिली आहे.

भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली तसेच मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यालयाकडील पत्रानुसार हे सुधारित वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. त्यानुसार गणना अर्ज तयार करणे व छपाई करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार आहे. गणना अर्जांचे वितरण व संकलन १८ ते ३० नोव्हेंबर २०२६ या कालावधीत करण्यात येईल, तर प्राप्त गणना अर्जांचा निपटारा १० डिसेंबर पर्यंत करण्यात येणार आहे. महाराष्ट्रातील पुनरीक्षण कामकाजाच्या सूचना टप्प्यातील दावे व हरकतींचा निपटारा ३१ ऑगस्ट ते १५ डिसेंबर २०२६ या कालावधीत करण्यात येणार असून, अंतिम मतदार यादी २२ डिसेंबर रोजी प्रसिद्ध होईल.

भारत निवडणूक आयोगाच्या पत्रानुसार, सध्या सुरू असलेल्या विशेष सखोल पुनरीक्षणादरम्यान ज्या मतदारांना गणना अर्ज देण्यात आले होते; मात्र त्यांची नावे अनुपस्थित, स्थलांतरित, मृत किंवा दुबार या प्रवर्गात समाविष्ट झाल्यामुळे प्रारूप मतदार यादीत समाविष्ट होऊ शकली नाहीत, अशा मतदारांना अंतिम मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी आणखी एक संधी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

यासाठी अशा सर्व मतदारांच्या मतदान केंद्रनिहाय याद्या नव्याने प्रसिद्ध करण्यात येणार आहेत. ज्या मतदान केंद्रांवरील मतदारांची नावे प्रारूप यादीत समाविष्ट झालेली नाहीत, त्या संबंधित मतदान केंद्रांचे सूचना फलक, पंचायत भवन, नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची कार्यालये तसेच गटविकास अधिकारी, पंचायत अधिकारी आणि नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिकाऱ्यांच्या कार्यालयांत या याद्या लावण्यात येतील. तसेच संबंधित मतदारांची नावे समाविष्ट न होण्याची संभाव्य कारणे नमूद करून या याद्या मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या संकेतस्थळावर वाचनीय पीडीएफ स्वरूपात उपलब्ध करून देण्यात येतील.

अशा मतदारांना त्यांच्या सध्याच्या सामान्य निवासस्थानाशी संबंधित मतदार नोंदणी अधिकारी अथवा सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी यांच्याकडे रीतसर भरलेले गणना अर्ज सादर करण्याची संधी देण्यात येणार आहे. या मतदारांचे अंशतः भरलेले गणना अर्ज मधील मतदार नोंदणी अधिकारी डॅशबोर्डवर पुन्हा तयार करण्यात येतील. जिल्हा निवडणूक अधिकारी व मतदार नोंदणी अधिकारी संबंधित मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांमार्फत अशा मतदारांशी संपर्क साधण्याचे प्रयत्न करतील. संपर्क तपशील उपलब्ध असल्यास प्रत्यक्ष किंवा व्हॉट्सॲप, ई-मेल आणि एसएमएस यांसारख्या इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे गणना अर्ज पोहोचविण्यात येतील. मतदारांना त्यांचा पूर्वीचा मतदार ओळखपत्र क्रमांक वापरून निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावरून किंवा ॲपद्वारे गणना अर्ज डाउनलोड करता येईल अथवा भरता येईल.

मतदान केंद्रस्तरीय अधिकारी विविध राजकीय पक्षांच्या मतदान केंद्रस्तरीय अभिकर्त्यांच्या समन्वयाने अशा मतदारांशी संपर्क साधतील. यासाठी घरोघरी भेटी देणे, शेजारी, कुटुंबातील सदस्य आणि निवासी कल्याण संघटना यांच्याकडे चौकशी करणे तसेच उपलब्ध संपर्क क्रमांकांचा वापर करणे अशा पद्धतींचा अवलंब करण्यात येईल. मतदारांना गणना अर्ज सादर करण्याची प्रक्रिया आणि उपलब्ध पर्यायांबाबत मार्गदर्शनही करण्यात येणार आहे.

ज्या मतदारांनी आपले निवासस्थान बदललेले नाही, असे मतदार रीतसर भरलेला व स्वाक्षरी केलेला गणना अर्ज, त्यासोबत परिशिष्ट-ब मधील नाही, असेही कळविण्यात आले आहे. निवेदन आणि यापूर्वी गणना अर्ज सादर न करू शकण्याचे कारण नमूद करून संबंधित मतदार नोंदणी अधिकारी, सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी किंवा मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्याकडे प्रत्यक्ष सादर करू शकतात. हा अर्ज मतदार स्वतः किंवा त्यांच्या कुटुंबातील सदस्यामार्फतही सादर करता येईल. अशा मतदारांसाठी ई-स्वाक्षरीसहऑनलाइन गणना अर्ज सादर करण्याची सुविधाही उपलब्ध करून देण्यात येणार आहे. दरम्यान, ज्या मतदारांनी विशेष सखोल पुनरीक्षणादरम्यान नवीन मतदार नोंदणीसाठी यापूर्वीच नमुना-६ सादर केला आहे, अशा मतदारांना निवेदनासह गणना अर्ज पुन्हा सादर करण्याची आवश्यकता नाही, असेही कळविण्यात आले आहे.

कामोठ्यात चोरट्यांचा धुमाकूळ

| पनवेल | प्रतिनिधी |

कामोठे सेक्टर ९ परिसरात चोरट्यांनी एकाच रात्री धुमाकूळ घालत दोन घरे आणि एका ज्वेलर्स दुकानाला लक्ष्य केले. मारुती आंगण सोसायटीतील दोन घरांचे दरवाजे फोडल्यानंतर चोरट्यांनी समोरील रामेश्वर कॉम्प्लेक्समधील मराठा ज्वेलर्स दुकान फोडून सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम लंपास केली. एकाच रात्री घडलेल्या या घटनांमुळे परिसरातील रहिवासी आणि व्यापाऱ्यांमध्ये घबराट पसरली आहे.

चोरट्यांनी सर्वप्रथम मारुती आंगण सोसायटीतील रूम क्रमांक १०१ आणि १०२ या दोन घरांना लक्ष्य केले. गॅस कटरच्या साहाय्याने दरवाजांच्या कड्या तोडून कुलूप बाहेर काढण्यात आले. त्यानंतर घरांमध्ये प्रवेश करून चोरी करण्याचा प्रयत्न करण्यात आला. दोन घरांना लक्ष्य केल्यानंतर चोरट्यांनी सोसायटीसमोरील रामेश्वर कॉम्प्लेक्समधील मराठा ज्वेलर्स दुकान गाठले.

दुकानाच्या सुरक्षेसाठी बसवलेले लोखंडी ग्रिल गॅस कटरने कापून चोरट्यांनी शटर उचकटले आणि दुकानात प्रवेश केला. दुकानातील सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम घेऊन त्यांनी पळ काढला. चोरी केल्यानंतर चोरट्यांनी सीसीटीव्ही कॅमेऱ्यांवर स्प्रे मारून ते निकामी करण्याचाही प्रयत्न केला.

दृष्टिहीनांसाठी मोफत शिबीर

| रायगड | प्रतिनिधी |

३ डिसेंबर रोजी साजऱ्या होणाऱ्या जागतिक दिव्यांग दिनाचे औचित्य साधून नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाईड रायगड ॲक्टिव्हिटी सेंटर, अलिबाग यांच्या वतीने दृष्टिहीन व्यक्तींसाठी मोफत वैद्यकीय तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.हे शिबीर १ डिसेंबर २०२६ रोजी सकाळा ११.०० वाजल्यापासून रायगड ॲक्टव्हिटी सेंटर या ठिकाणी आयोजित करण्यात येणार आहे. दृष्टिहीन व्यक्तींच्या आरोग्याची काळजी घेणे आणि त्यांना योग्य सुविधा उपलब्ध करून हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा जागर

■ **अमृत दुर्गोत्सवामध्ये सहभागी होण्याचे रायगडकरांना आवाहन**

| रायगड | प्रतिनिधी |

संकट रयतेवर होतं चिंता राजाला होती. दुष्काळाच्या कठीण काळात रयतेला सावरण्यापासून ते स्वराज्याला सक्षम करण्यापर्यंत, छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रत्येक कार्याच्या केंद्रस्थानी होती रयत आणि तिचं हित.

त्या रयतेच्या राजाची दूरदृष्टी, स्वराज्य उभारण्याची जिद्द आणि लोककल्याणाचा विचार आजही आपल्याला प्रेरणा देतो.यंदा दुर्ग घडवताना केवळ इतिहासाची प्रतिकृती नको, तर त्या विचारांप्रती आपली कृतज्ञता घडवू या. चला, कृतज्ञतेचा दुर्ग घडवू या! चला साकारू या गड-दुर्गांची प्रतिकृती अमृत दुर्गोत्सवामध्ये सहभागी होण्याचे अमृत संस्थेने आवाहन केले आहे.

दिवाळीच्या सुट्टीत आपल्या अंगणात, गच्चीवर किंवा सोसायटीच्या आवारात गड-दुर्गांची प्रतिकृती साकारण्याची अनेक वर्षांची परंपरा आहे. ती जपत, छत्रपती शिवाजी महाराजांचा गौरवशाली इतिहास नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाची महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनीच्या वतीने अमृत दुर्गोत्सव हा विशेष उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमात सहभागी होण्यासाठी नागरिकांनी आपल्या हाताने साकारलेल्या दुर्गाच्या प्रतिकृतीचे छायाचित्र किंवा सेल्फी काढून संकेतस्थळावर अपलोड करावे. नोंदणीची अंतिम मुदत ३० नोव्हेंबर आहे. सहभागी होणाऱ्या प्रत्येकाला मुख्यमंत्र्यांच्या स्वाक्षरीचे डिजिटल अभिनंदनपत्र देण्यात येणार आहे.

निवडक

उबाठाच्या पाठपुराव्याला यश

पनवेल : पनवेल महानगरपालिकेच्या नवीन स्वराज्य मुख्यालयासमोर भारतीय संविधानाचा गौरव अधोरेखित करणारा संविधान स्तंभ उभारण्याचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. गुरुवारी झालेल्या महानगरपालिकेच्या महासभेत संविधान स्तंभ उभारणीच्या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली. कामोठे येथील शिवसैनिक सचिन गायकवाड यांनी यासाठी सातत्याने पाठपुरावा केला होता. शिवसेना पक्षानेही ही मागणी लावून धरली होती.महापालिका गटनेत्या लीना गरड यांनी सभागृहात हा विषय ठामपणे मांडला. तसेच जिल्हाप्रमुख दीपक निकम,महानगरप्रमुख समाधान काशीद यांच्यासह सहसंपर्कप्रमुख अनिल चव्हाण, नरसेवक उत्तम मोर्बेकर, अविनाश पाटील आदी पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी या मागणीला पाठबळ दिले. सचिन गायकवाड यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांना पक्षाच्या पदाधिकाऱ्यांची साथ मिळाल्याने या विषयाला प्रशासकीय पातळीवर गती मिळाली. अखेर महासभेने संविधान स्तंभ उभारणीच्या प्रस्तावाला मंजुरी दिल्याने पनवेल महानगरपालिका मुख्यालयासमोर संविधानाचा गौरव अधोरेखित करणारे स्मारक उभारण्याचा मार्ग खुला झाला आहे. या निर्णयामुळे शिवसेना पक्षाच्या पाठपुराव्याला यश मिळाल्याची भावना कार्यकर्त्यांकडून व्यक्त होत आहे.





चिमुकल्यांचा कलाविष्कार

पनवेल : करंजाडे सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक विकास मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या भव्य इ.करंजाडे फेस्टिव्हलमध्ये शालेय विद्यार्थ्यांसह स्थानिक कलाकारांनी आपल्या कलागुणांचे दमदार सादरीकरण केले. देशभक्तीपर गीते आणि बहारदार लोकनृत्यांनी उपस्थित रसिकांना मंत्रमुग्ध केले. चिमुकल्यांच्या उत्साहपूर्ण नृत्याविष्काराला उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली. करंजाडे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच रामेश्वर आंग्रे यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या या महोत्सवाने यंदा नवव्या वर्षात पदार्पण केले आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही करंजाडे आणि परिसरातील नागरिकांचा महोत्सवाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, विविध सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. गुरुवारी झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रमात लंडन स्कूल करंजाडे, जिल्हा परिषद शाळा करंजाडे आणि अक्षर ग्लोबल स्कूलमधील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषेत देशभक्तीपर गीतांवर आकर्षक नृत्य सादर केले. त्यांच्या सादरीकरणातून देशप्रेमाची भावना व्यक्त झाली.



तळोज्यात डंपर-रिक्षाची धडक

पनवेल : क्राउन कंपनी चौक येथे डंपर आणि ऑटो रिक्षामध्ये अपघात झाल्याची घटना घडली. अपघातामुळे रिक्षा पलटी होत असल्याचे लक्षात येताच घटनास्थळी वाहतूक नियम नाचे कर्तव्य बजावत असलेल्या पोलीस कर्मचाऱ्याने तत्काळ धाव घेत रिक्षा धरून ठेवली. त्यामुळे रिक्षातील दोन महिला प्रवासी आणि चालक अशा तिघांना सुखरूप बाहेर काढण्यात यश आले. पोलीस शिपाई जाधव यांनी प्रसंगावधान राखत तातडीने मदतकार्य सुरू केले. रिक्षा पलटी होऊ नये म्हणून त्यांनी ती धरून ठेवली आणि त्यातील प्रवाशांना बाहेर काढण्यास मदत केली. यावेळी पोलीस शिपाई दराडे तसेच महाराष्ट्र सुरक्षा बलाचे जवान गणेश शिंदे यांनीही मदतकार्यात सहभाग घेतला. या अपघातात कोणालाही दुखापत झाली नाही. रिक्षाचालक आणि प्रवाशांनी कोणतीही तक्रार देण्याची इच्छा नसल्याचे सांगितल्याने रिक्षाचालक, प्रवासी आणि डंपरचालक तेथून निघून गेले. अपघाताच्या प्रसंगी क्षणाचाही विलंब न करता मदतीला धावून जाणाऱ्या वाहतूक पोलिसांच्या तत्परतेचे कौतुक होत आहे.

जंजिरा किल्ल्यात पर्यटकांना प्रवेश शुल्क माफ

| आगरदांडा | प्रतिनिधी |

जागतिक वारसा सप्ताहानिमित्त ऐतिहासिक जंजिरा किल्ल्याला भेट देणाऱ्या पर्यटकांसाठी पुरातत्त्व विभागाकडून प्रवेश शुल्क माफ करण्यात आले. या उपक्रमाचा शेकडो पर्यटकांनी लाभ घेतला. यावेळी किल्ल्याच्या प्रवेशद्वारावर पर्यटकांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले.

जागतिक वारसा सप्ताहाचे औचित्य साधून पुरातत्त्व विभागाचे कर्मचारी प्रितेश जाटव आणि कल्याण कुमार झा यांनी सकाळी किल्ल्यात येणाऱ्या पर्यटकांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत केले. या उपक्रमामुळे



पर्यटकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

यावेळी पुरातत्त्व संशोधन विभागाचे सहायक संवर्धक बजरंग येलीकर यांनी जागतिक वारसा सप्ताहाचे महत्त्व विशद केले. मुरूड हे पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठिकाण असून येथे अनेक ऐतिहासिक वारसा स्थळे आहेत. या वास्तू पाहण्यासाठी देश-विदेशातून पर्यटक येत असतात. आपल्या ऐतिहासिक वास्तू, संस्कृती आणि वारसा यांचे सौंदर्य टिकवून ठेवणे तसेच त्यांचे संवर्धन व संरक्षण करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे, असे त्यांनी सांगितले.

ऐतिहासिक वास्तू आणि वारसा स्थळे आपल्याला हजारो वर्षांपूर्वीच्या इतिहासाची ओळख करून देतात. मात्र, विविध कारणांमुळे या वास्तूंचे नुकसान होत आहे. त्यामुळे त्यांचे जतन आणि संवर्धन करण्याबाबत नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण व्हावी, या उद्देशाने जागतिक वारसा सप्ताह साजरा केला जातो, असेही येलीकर यांनी स्पष्ट केले.

यावेळी रायगड किल्ला, अलिबाग येथील कुलाबा किल्ला आणि मुरूड-राजपुरी येथील ऐतिहासिक जंजिरा किल्ल्यासह विविध स्मारके व ऐतिहासिक स्थळांवर प्रवेश शुल्क माफ करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली.

दरम्यान, सकाळपासूनच जंजिरा किल्ला पाहण्यासाठी पर्यटकांची गर्दी झाली होती. लहान मुलांसह अंदाजे एक हजार पर्यटकांनी किल्ल्याला भेट दिल्याची माहिती प्रितेश यांनी दिली.

अनधिकृत बांधकामविरोधात बेमूदत उपोषणाचा इशारा

| रोहा | प्रतिनिधी |

वरसे ग्राम पंचायत हद्दीतील असलेल्या कुंडलिका नदी पात्रातील पूररेषेत एका व्यावसायिकाने अनधिकृत बांधकाम केले आहेत. या अनधिकृत बांधकामांमुळे पावसाळ्यात या परिसराला पुराचा फटका बसण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर अतिक्रमण केलेली जागा मोकळी करण्यात संबधित प्रशासन असमर्थ ठरत असल्याने झोपण्याचा सोंग घेणाऱ्या प्रशासनाला जाग आणण्यासाठी रोहा तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषणाला इशारा मंगेश रावकर यांनी दिला आहे.

शहर व वरसे ग्रामपंचायत हद्दीत कुंडलिका नदी पात्रा-तील पूररेषेत अनेक ठिकाणी अनधिकृत बांधकाम करण्यात आले आहे. मात्र संबंधित प्रशासनाकडून राजकीय दबावापोटी या बेकायदेशीर बांधकामांवर कोणत्याही प्रकारची कारवाई होत असताना दिसत नाही.याच अनुषंगाने भुवनेश्वर हद्दीत असलेल्या कुंडलिका नदीकाठी पुररेषेत केलेल्या बेकायदेशीर बांधकाम विरोधात मंगेश रावकर यांनी लेखीपत्राद्वारे पाट बंधारे विभागा कडे तक्रार दाखल केली होती.

महात्मा जोतिराव फुले महसूल लोकअदालतीचे आयोजन

| रायगड-अलिबाग | प्रतिनिधी |

अलिबाग येथील उपविभागीय अधिकारी यांच्या न्यायालयात सोमवारी (दि०७) सकाळी ११ ते सायंकाळी ५ या वेळेत महात्मा जोतिराव फुले महसूल लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.

या लोकअदालतीच्या माध्यमातून अलिबाग व मुरुड तालुक्यांतील प्रलंबित अपिलांचा जलदगतीने निपटारा करण्याचे उद्दिष्ट असून, समेटाने मिटू शकणाऱ्या प्रकरणांमध्ये संबंधित विधिज्ञ व पक्षकारांनी लेखी म्हणणे सादर करावे, असे आवाहन उपविभागीय अधिकारी मुकेश चव्हाण यांनी केले आहे.

उपविभागीय अधिकारी, अलिबाग यांच्या न्यायालयातील प्रलंबित अपिले व दाव्यांच्या अनुषंगाने अपर जिल्हाधिकारी यांनी २७ ऑगस्ट २०२६ रोजीच्या आदेशान्वये या न्यायालयात महात्मा जोतिराव फुले महसूल लोकअदालत अभियान आयोजित करून अर्धन्यायिक प्रकरणांचा जलदगतीने निपटारा करण्याबाबत सूचना दिल्या आहेत.

त्यानुसार, तहसील कार्यालयाच्या मागील बाजूस असलेल्या उपविभागीय अधिकारी, अलिबाग यांच्या न्यायालयात ही लोकअदालत आयोजित करण्यात आली आहे. उपविभागातील अलिबाग व मुरुड तालुक्यांतील संबंधित विधिज्ञ आणि पक्षकारांनी या सुनावणीस उपस्थित राहावे. तसेच, समेटाने मिटविता येणाऱ्या प्रकरणांमध्ये आपले लेखी म्हणणे न चुकता सादर करावे, असे आवाहन उपविभागीय अधिकारी चव्हाण यांनी केले आहे.

मुरुडमध्ये विशेष कार्यशाळेचे आयोजन

● **मार्गदर्शक म्हणून ठाण्याचे अनंत अच्युत जोशी यांची उपस्थिती**

| आगरदांडा | प्रतिनिधी |

खां साहेब अबीद हुसेन स्मृती संगीत मंडळ, मुरुड यांच्या वतीने मुरुड परिसरातील हार्मोनियम वादकांसाठी विशेष हार्मोनियम वादन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. ही कार्यशाळा २२ नोव्हेंबर रोजी हिंदू बोर्डिंग, मुरुड येथे आयोजित करण्यात आली आहे.

या कार्यशाळेसाठी ठाणे येथील ज्येष्ठ हार्मोनियम मार्गदर्शक अनंत जोशी मार्गदर्शन करणार आहेत. सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत प्रथम सत्र, दुपारी १ ते २ या वेळेत भोजन विश्रांती, तर दुपारी २ ते सायंकाळी ५ या वेळेत दुसरे सत्र व समारोप होणार आहे. सकाळी १० वाजता नावनोंदणी व अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली आहे.

या कार्यशाळेत सहभागी होणाऱ्या प्रत्येक वादकाने स्वतः चे हार्मोनियम सोबत आणणे आवश्यक आहे. इच्छुकांनी १५ नोव्हेंबर २०२६ पर्यंत आयोजकांच्या ग्रुपवर नावनोंदणी करावी. कार्यशाळेला संपूर्ण वेळ उपस्थित राहणे बंधनकारक असून प्रवेश विनामूल्य आहे.

हार्मोनियम वादनातील कौशल्य वृद्धिंगत करण्याची आणि अनुभवी मार्गदर्शकांकडून तांत्रिक व व्यावहारिक ज्ञान मिळविण्याची ही उत्तम संधी असल्याने हार्मोनियम वादकांनी या कार्यशाळेत सहभागी व्हावे, असे आवाहन मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

गटशिक्षणाधिकारी हर्षदा भगत यांचे प्रतिपादन | **विद्यार्थ्यांनी साकारली ५० विज्ञान मॉडेल्स**

बालविज्ञान प्रदर्शनातून वैज्ञानिक तयार होतील

| म्हसळा | प्रतिनिधी |

म्हसळा येथील पीएमश्री जिल्हा परिषद शाळा म्हसळा क्र. १ येथे प्रथमच आयोजित करण्यात आलेल्या विज्ञान प्रदर्शनाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी तब्बल ५० विविध विज्ञान मॉडेल्स सादर करून आपल्यातील कल्पकता, जिज्ञासा आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाचे दर्शन घडविले.

विशेष म्हणजे, इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांना विज्ञान हा स्वतंत्र विषय नसतानाही



त्यांनी या प्रदर्शनात उत्साहाने सहभाग घेत विविध वैज्ञानिक संकल्पनांवर आधारित मॉडेल्स तयार केली. विद्यार्थ्यांनी आपल्या मॉडेल्सची माहिती आत्मविश्वासाने उपस्थितांना समजावून सांगितली. लहान वयातच विद्यार्थ्यांनी दाखविलेली वैज्ञानिक समज, कल्पकता आणि सादरीकरणाची हातोटी पाहून उपस्थित मान्यवरांनी त्यांचे विशेष कौतुक केले.

विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाविषयी आवड निर्माण व्हावी, त्यांच्यातील जिज्ञासू वृत्तीला चालना मिळावी, तसेच केवळ पुस्तकी ज्ञानापुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष कृतीतून विज्ञानाच्या संकल्पना समजाव्यात, या उद्देशाने या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.

पहिल्याच प्रयत्नात विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या ५० मॉडेल्समुळे शाळेच्या या उपक्रमाचे विशेष कौतुक होत आहे.या प्रदर्शनाला पंचायत समितीचे उपसभापती लहू म्हात्रे, जिल्हा परिषद सदस्य अनिल बसवत, म्हसळा नगरपंचायतीच्या उपनगराध्यक्ष राखी करंबे, पंचायत समिती सदस्या समृद्धी चाचले, गटशिक्षणाधिकारी हर्षदा भगत, धर्मा धामणकर, बी. आर. आडे, किशोर मोहिते , यांच्यासह शिक्षक, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी गटशिक्षणाधिकारी हर्षदा भगत यांनी सांगितले कि प्रथमच आयोजित करण्यात आलेल्या या विज्ञान प्रदर्शनातून विद्यार्थ्यांना आपले कौशल्य आणि कल्पकता सादर करण्यासाठी एक उत्तम व्यासपीठ उपलब्ध झाले. विद्यार्थ्यांचा मिळालेला प्रतिसाद पाहता भविष्यात शाळेमध्ये विज्ञानविषयक उपक्रमांना अधिक प्रोत्साहन मिळेल, असा विश्वास व्यक्त करून या माध्यमातून बालवैज्ञानिक तयार व्हावा हे प्रत्येक पालकाचे स्वप्न असल्याचे हर्षदा भगत यांनी सांगितले.

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२२ नोव्हेंबर

१) श्री. दिलीप चिंतामण शिंदे
अलिबाग, २२-११-१९५२
२) श्री. देविदास मोतीराम डबरी
अलिबाग, २२-११-१९५२
३) मंजुळा उत्तम ओसवाल
अलिबाग, २२-११-१९५५

कृषीवलच्या वाचकांना आवाहन



अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचाफोटोकृषीवलमध्येछापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८
(बीपीन राठवा)
९२२६०५५१५५
(अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल

आमोद ठक्करांना 'जीवन गौरव पुरस्कार

चिरनेर : शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल वीर वाजेकर महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. आमोद नवरत्न ठक्करांना कोकण मराठी साहित्य परिषद, उरण शाखेच्या वतीने प्रतिष्ठेचा जीवन गौरव पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले. कोकण मराठी साहित्य परिषद, मुख्य शाखा रत्नागिरी यांच्या मार्गदर्शनाखाली उरण शाखेच्या वतीने मधुबन कट्टा, विमला तलाव, उरण येथे हा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता.

निसर्गाच्या लहरीपणामुळे बागायतदार चिंतेत

। महाड । प्रतिनिधी ।

कोकणची राजा म्हणून ओळख असलेला हापूस आंब्यासाठी सध्याचे हवामान पोषक असल्याचे वरवर वाटत असले, तरी प्रत्यक्षात मात्र खाडीपट्ट्यातील आंबा बागायतदारांच्या काळजाचा ठोका चुकला आहे. महाड नालुक्याच्या खाडीपट्टा परिसरात सध्या कडाक्याची थंडी पडत असून, वातावरण आंब्याला मोहोर विण्यासाठी पोषक मानले जाते.

मात्र, यावर्षी हवामानातील कमालीची अस्थिरता आणि वाढत्या कीड बोगांच्या प्रादुर्भावामुळे आंबा पिक योक्यात आले आहे. नोव्हेंबर महिन्यात रात्रीचे तापमान १६ अंश सेल्सिअसच्या आसपास खाली आल्याने निसर्गतः आंब्याच्या झाडांना मोहोर येण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. थंडीचा कडाका वाढल्याने बागायतदारांच्या आशा पल्लवित झाल्या होत्या. परंतु, यावर्षी एल निनोंचा प्रभाव आणि परतीच्या पावसाच्या अनिश्चिततेमुळे निसर्गचक्र पूर्णपणे विस्कळीत झाले आहे.



मोहोर येण्याच्या प्रक्रियेला ब्रेक शेतकऱ्यांनी कर्ज काढून बागांची निगा

खाडीपट्ट्यातील सुमारे ९५ टक्के आंबा झाडांना अपेक्षित मोहोर येण्याऐवजी तांबूस रंगाची नवीन पालवी फुटली आहे. ही पालवी फुटल्यामुळे मोहोर येण्याच्या प्रक्रियेला ब्रेक मिळाला आहे. परिणामी आबा हंगाम सुरु होण्यास एक ते दीड महिना विलंब होणार आहे.

दरम्यान, हंगाम लांबणीवर पडल्यास आंबा बाजारात उशिरा येईल, ज्यामुळे सुरुवातीच्या काळातील आंब्याला जो मोठा बाजारभाव मिळतो, त्याला बागायत दारांना मुकावे लागणार आहे. खाडीप-ट्टयातील अनेक शेतकऱ्यांनी कर्ज काढून बागांची निगा राखली आहे, पहिली फवारणी सुरु आहे. मात्र आता उत्पादनावरच संकट आल्याने आर्थिक गणित कोलमडण्याची भीती आहे.

शेतकऱ्यांनी झाडांना मोहोर येईपर्यंत पाणी देणे पूर्णपणे टाळावे, जेणेकरून नवीन पालवी फुटणार नाही. तसेच, कोवळ्या पालवीचे आणि मोहोराचे संरक्षण करण्यासाठी कृषी विद्यापीठाच्या शिफारशीनुसार तातडीने योग्य कीटकनाशक,बुरशीनाशकाची फवारणी करावी, असे आवाहन कृषी तज्ज्ञांकडून करण्यात आले. .आंबा पिकावर तुडतुडे, भुरीचा प्रादुर्भावहवामानातील सर्वात मोठा धोका म्हणजे तापमानातील चढ-उतार आहे.

दिवसाचेतापमान ३१ अंशांपर्यंत वर जाते, तर रात्री कडाक्याची थंडी पडते. या विरोधाभासी हवामानामुळे मोहोरातील मादी फुलांचे प्रमाण घटून मोहोर गळण्याचा धोका निर्माण झाला आहे.

मोहोर काळा पडू लागला

थंडीसोबत पडणारे दव आणि धुक्यामुळे आंबा बागांवर तुडतुडे, फुलकिडे आणि भुरी यांसारख्या घातक रोगांचा विळखा पडला आहे. अनेक बागांमध्ये मोहोर काळा पडून गळू लागल्याने बागायतदारांची चिंता द्विगुणित झाली आहे.



तळे शाळेच्या लोकार्पणाचे आयोजन

। तळा । प्रतिनिधी ।

स्वातंत्र्यपूर्व काळातील सन १८६१ मधील राजिपमराठी शाळा, तळे येथील ऐतिहासिक जुन्या इमारतीचा नूतनीकरण व लोकार्पण सोहळा तसेच तळ्याचे भारतीय रिझर्व्ह बँकेचे पहिले भारतीय गव्हर्नर व भारताचे पहिले माजी अर्थमंत्री पद्मविभूषण डॉ. सी. डी. देशमुख यांच्या तैलचित्राचा अनावरण सोमवार (दि. २३) नोव्हेंबर रोजी सायंकाळी ४ :३० वाजता राजिप शाळा, तळे मराठी येथे हा गौरवशाली सोहळा होणार आहे.

या सोहळ्याचे उद्घाटक डॉ. प्रकाश आमटे व डॉ. मंदा आमटे हे उपस्थित राहणार आहेत. प्रविण मेहता, जिल्हाधिकारी किशन जावळे, पोलीस अधीक्षक, रायगड जिल्हा आँचल दलाल, मुख्य कार्यकारी अधिकारी, नेहा भोसले उपस्थित राहणार आहेत. या गौरवशाली सोहळ्यास सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन मुख्याध्यापिका सुप्रिया जामकर, भास्कर गोळे, सर्व शिक्षक वृंद, शाळा व्यवस्थापन समिती व सर्व पालक वर्ग यांनी केले आहे.

तुळशी विवाहाच्या खरेदीसाठी बाजारपेठेत गर्दी

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

कार्तिक शुक्ल द्वादशीच्या मुहूर्तावर तुळशी विवाहाच्या मंगलमय सोहळ्याला आजपासून सुरुवात होत आहे. तुळशी विवाहाच्या तयारीसाठी मुरूड शहरातील बाजारपेठेत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, पूजेसाठी लागणाऱ्या विविध साहित्याच्या खरेदीसाठी महिलांसह पुरुषांची मोठी गर्दी पाहायला मिळत आहे.

तुळशी विवाहासाठी आवश्यक असलेल्या ऊसाची धाडे, चिंच, आवळा, बोर आदी पूजेच्या साहित्याची खरेदी करण्यासाठी महिलांची विशेष लगबग सुरू आहे.

तुळशी विवाह हा धार्मिक आणि पारंपरिक महत्त्व असलेला



सोहळा असल्याने घरोघरी लग्नाची तयारी सुरू झाली आहे. तुळशी वृंदावन सजविणे, पूजेची तयारी करणे आणि विवाह सोहळ्यासाठी आवश्यक साहित्य जमविण्याची धावपळ सुरू आहे. या निमित्ताने बाजारपेठेत खरेदीचा उत्साह दिसून येत असून, सर्वत्र भक्तीमय आणि मंगलमय वातावरण निर्माण झाले आहे.

मनुबाई रटाटे यांचे निधन

। धाटाव । प्रतिनिधी ।

भिकुराम रटाटे आणि जनार्दन रटाटे यांची मोठी बहीण मनुबाई रटाटे यांचे वयाच्या ६९ व्या वर्षी नुकतेच निधन झाले. त्यांच्या निधनामुळे सबंध रटाटे कुटुंबासह धाटाव गावावर शोककळा पसरली आहे. त्यांच्या पश्चात दोन भाऊ, भाचे, सुन, नातवंडे असा परिवार आहे.



त्यांचे दशक्रिया विधी मंगळवार दि.२४ नोव्हेंबर तर उत्तरकार्य विधी गुरुवार दि.२६. नोव्हेंबर रोजी धाटाव येथील राहत्या घरी करण्यात येणार असल्याचे त्यांच्या नातेवाईकांनी सांगितले आहे.

मुरूडमध्ये विठूनामाचा जयघोष

● कार्तिकी एकादशीला भाविकांची मांदियाळी

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

मुरूड शहरातील जुनी पेठ येथील सुमारे २०० वर्षांची ऐतिहासिक परंपरा असलेल्या भैरव-विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात कार्तिकी एकादशी भक्तीमय वातावरणात साजरी करण्यात आली. प्रतिपंढरपूर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या मंदिरात शुक्रवारी पहाटेपासूनच विठ्ठलभक्तांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. दिवसभर विठूनामाचा जयघोष, भजन आणि कीर्तनाने मंदिर परिसर दुमदुमून गेला होता. पहाटे दुग्धाभिषेकासह विविध धार्मिक विधी करण्यात आले होते.



पुजेचा मान अच्युत चव्हाण व अनुराधा चव्हाण यांना मिळाला. मंदिर देवस्थानाचे अध्यक्ष प्रा. डॉ. विश्वास चव्हाण, संदीप राजपूरकर, प्रकाश चव्हाण, संजय नाईक, दीपक राजपुरकर, दिलीप जामकर यांच्यासह सर्व सभासदांनी उत्सवाचे योग्य नियोजन केले होते.

साप्ताहिक राशिभविष्य दि. २२ नोव्हेंबर ते २८ नोव्हेंबर २०२६

ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग
मोबा.९४०४७९१७९८

सन्मानात वाढ होईल

मेष : हा साप्ताह मेषराशीधारकांना थोड्या वेगळ्या पद्धतीने जाणार आहे. आपण उत्साहीत असाल, प्रत्येक कार्याला सामोरे जाऊन सामना कराल, जेणेकरून यश मिळण्याची शक्यता देखील वाढेल. आपल्याला कुटुंबातील वडीलधाऱ्या व्यक्तीपासून तसेच समाजातील सन्माननीय व्यक्तीकडून आपल्याला सन्मान मिळेल. आपण त्यांना उतराई व्हाल आणि त्यांच्यासाठी तुम्ही खूप चांगले कार्य कराल. यामुळे उलट तुमच्या सन्मानात वाढ होणार आहे. अचानक तुमची प्रगती होईल. कामामध्ये जास्त व्यस्त राहिल्याने आपल्याला स्वतः साठी वेळ काढणे जवळजवळ अशक्य होईल. तथापी, आपण स्वत:साठी देखील थोडा वेळ घालवला पाहिजे जेणेकरून आपल्याला आराम मिळेल. **महिलांना :** आपल्या मार्गाने येणारी कोणतीही संधी हातांनी जाऊ देऊ नका जेणेकरून या दरम्यान, आपल्यासाठी प्रगतीची कोणतीही संधी सुटणार नाही. थोडा व्यायाम करा, जेणेकरून कोणत्याही शारीरिक समस्या टाळता येतील. **शुभ दिनांक :** २३,२६.

कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या

वृषभ : हा साप्ताह वृषभराशीसाठी चालू कालावधीत नोकरदारवर्गास आपली बदली झाल्याची खात्री होईल. या स्थलांतरणामुळे आपण आपल्या नियमित जागेपासून बरेच दूर जाऊ शकता ज्यामुळे आपल्याला काही काळ आपल्या कुटुंबापासून दूर जावे लागू शकते. घरातील नातेसंबंधातील कोणतेही अंतर टाळण्यासाठी आपण आपल्या वतीने प्रयत्न केले पाहिजेत. वेळोवेळी कुटुंबास चांगली भेट दिली पाहिजे. विविध प्रकारची आव्हाने आपणासमोर येऊ शकतात, त्यांना योजनाबद्ध पद्धतीने सामोरे जा. आपली बाजू सावरण्याचा प्रयत्न करा. कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या. घरातील मंडळींना खुश करण्याचा कल ठेवा. सरकारी नियम व कायदा कटाक्षाने पाळा. आप्तेष्टांशी सामंजस्याने वागावे. कलाक्षेत्राला चांगले प्रोत्साहन मिळेल. महिलांच्या अंगभूत गुणांना वाव मिळेल. **महिलांना :** प्रकृतीस्वास्थ्य जपा. खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. जोडीदाराची साथ मिळेल. विशेषतः पोटासंबंधीच्या तक्रारींकडे अधिक लक्ष द्या. कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या. जोडीदाराची साथ मिळेल. **शुभ दिनांक :** २४,२८.

घरगुती कामांना महत्त्व द्या

मिथुन : हा साप्ताह आपले ग्रहमान पाहता मिथुनराशीसाठी वेगळा ठरू शकतो. ग्रहमान बऱ्यापैकी असले तरी आपल्या योग्य प्रयत्नांनी आपण यशाची वाटचाल करू शकाल. नोकरदारांना दिलासा मिळेल. वरिष्ठांची मर्जी सांभाळता येईल. कामकाजात स्वतःला झोकून द्या. सरकारी नियमांचे पालन करा. घरगुती कामांना विशेषतः घरसजावटीच्या कामांना पुढे ढकलणे योग्य राहील. आर्थिक व्यवहारात प्रगती कराल. आपल्या बोलण्यावर मात्र योग्य नियंत्रण ठेवणे हितकारक राहील. आर्थिक बाजू ठीक राहील. रविवारी आणि मंगळवारी तुमच्या कार्याचा विस्तार होईल. आत्मविश्वास वाढेल. या आठवड्यात सकारात्मक बदल जाणवेल. नव्या नोकरीची संधी चालून येईल. मंगळवारनंतर धनलाभ होण्याची दाट शक्यता आहे. विद्यार्थ्यांच्या अभ्यासात प्रगती दिसेल. **महिलांना :** आपल्या स्वतःच्या किंवा एखाद्याच्या उपचारांवर पैसे खर्च करावे लागतील. महिलावर्गाचे दिवस आनंदात जाणार आहेत प्रेम प्रकरणा पासून लांब राहावे, पतिराजांच्या तब्बेतीची विशेष काळजी घ्यावी, त्यांना व्यसनांपासून लांब ठेवावे. **शुभ दिनांक :** २५,२७.

रखडलेली कामे पूर्ण होतील

कर्क : हा साप्ताह कर्करराशीधारकाने या आठवड्यात आपल्याला आरोग्याबद्दल खूप जागरूक रहावे लागेल. हा आठवडा तुमच्यासाठी शुभ संधी उपलब्ध करुन देईल. आठवड्याचे पहिले दोन दिवस तुम्हाला लाभदायक ठरतील. दररोज योग आणि ध्यान करत रहा. या रशिधारकाना व्यवसायात चांगले यश मिळेल. वरिष्ठांच्या सहकार्याने हाती घेतलेलं काम वेळेत पूर्ण होईल. मित्रांची साथ मिळाल्याने नवा उद्योग सुरू करण्याच्या दिशेने पाऊल टाकाल. आरोग्याची काळजी घ्या. तुमचा आत्मविश्वास खूपच वाढेल. नोकरीत चांगले काम केल्याने वरिष्ठांकडून आणखी जबाबदारी देण्यात येईल. नोकरीत प्रगती होईल. आठवड्याच्या शेवटी कालावधी व्यवसायासाठी लाभदायक असेल. रखडलेली कामे पूर्ण होतील. नवीन काम हाती घ्याल. **महिलांना :** आर्थिक परिस्थिती अधिक चांगली करण्यासाठी तुम्ही प्रयत्नशील व्हाल. या आठवड्यात नोकरीशी संबंधित एखादा मोठा निर्णय घ्याल. या आठवड्यात व्यवसायात चांगली वाढ होईल. अन्नदान करा. जागरणाचा त्रास होऊ शकतो. आपल्या नात्यातील सलोखा वाढता राहील. **शुभ दिनांक :** २२,२८.

व्यवसात चांगले यश मिळेल

सिंह : हा साप्ताह सिंहराशीसाठी आनंदी करणारा असेल. व्यवसायातील प्रलंबित कामे पूर्ण होतील. नोकरीत प्रगती होईल, पदोन्नती मिळेल. या आठवड्यात व्यवसायात चांगले यश मिळून धनलाभ होईल. आठवड्यात मंगळ आणि गुरू हे तुमचा आत्मविश्वास वाढवतील. व्यवसात चांगले यश मिळेल आणि मोठा धनलाभ होण्याची शक्यता आहे. या आठवड्यात नोकरीच्या नव्या संधी उपलब्ध होतील. गरीबांना अन्नदान करा. मित्रांच्या मदतीने रखडलेले काम पूर्ण होईल. बुधवारनंतर उत्पन्नाचे नवे स्त्रोत तयार होतील. शनिवारी काळ्या रंगाचे वस्त्रदान करा. नोकरी बदलण्याचा विचार मनात येईल. पण कृती करू नका. बुधवार आणि शनिवारी तुमच्या योजना, प्रकल्प यशस्वी होण्याच्या दिशेने मार्गस्थ होतील. गरीबांना अन्नदान करा. वडिलधाऱ्यांचे आशीर्वाद घ्या. **महिलांना :** मुलांचे कर्तृत्व तुमच्या डोळ्यांचे पारणे फेडेल. आपल्या सोबत आजूबाजूच्या लोकांचा सहभाग आपल्याला प्रेरणादायी असेल. घराची डागडुजी करून घ्याल. मानसिक व शारीरिक स्वास्थ्य चांगले राहील. **शुभ दिनांक :** २५,२८.

नवीन संकल्पनांचा वापर करा

कन्या : हा साप्ताह ग्रहमान पाहता कन्याराशीसाठी सगल्या गोष्टी घेण्यासाठी तुमचे मन सज्ज राहील. आणखी पैसा कमावण्यासाठी तुमच्याजवळील नावीन्यपूर्ण संकल्पनांचा वापर करा. हा आठवडा कामाचा ताण कमी होईल. त्यामुळे तुम्ही कुटुंबासोबत चांगला वेळ घालवू शकाल. प्रेमिक एखाद्या सहलीच्या ठिकाणी जाऊन त्यांच्या प्रेमी जीवनात आनंद आणतील. काम लवकर पूर्ण करून लवकर घरी या कालावधीत तुमच्यासाठी उत्तम राहील. तुमचा/ तुमची जोडीदार तुम्हाला जाणवून देईल की पृथ्वीवरच खरा स्वर्ग आहे. आपल्या घरातील कुणी सदस्य या कालावधीत तुमच्याशी प्रेमाने जोडलेली काही समस्या शेअर करू शकतो. तुम्ही त्यांना योग्य सल्ला दिला पाहिजे. तुम्ही ऊर्जेने भारलेले असाल त्यामुळे तुम्ही जे काही कराल त्यासाठी तुम्हाला नेहमीपेक्षा निम्माच वेळ लागेल. **महिलांना :** हा कालावधी तुमच्यासाठी खूपच लाभदायक आणि यश मिळवून देणारा ठरेल. तुमच्या वैवाहिक आयुष्यातील प्रियाराधन, पाठलाग, लाडीगोडी या सगळ्याच्या आठवणी जागवून तुम्ही ताजेतवाने व्हाल. **शुभ दिनांक :** २३,२६.

मोठी खरेदी करण्याची शक्यता

तुळ : हा साप्ताह तुलराशीसाठी आठवड्याच्या उत्तरार्धासाठी उल्हसित करणाऱ्या आणि मनोरंजनाच्या कार्यक्रमाची व्यवस्था कराल. प्रेमातील असीम आनंद अनुभवण्यासाठी कोणाचा तरी शोध घ्याल. मदतीसाठी तुमच्याकडे पाहणाऱ्या लोकांना तुम्ही मदत कराल. कालावधी उत्तम आहे या दिवसांत तुमचा प्रियकर, जोडीदार तुमच्या कुठल्यातरी गोष्टीवर खूप आणि मनमोकळा हसेल. नोकरीच्या नव्या संधी चालून येतील. उद्योगात चांगला लाभ होईल. नवा उद्योग सुरू करण्यासाठी हालचाल कराल. या कालवधीत आपल्या मनातील विचारांना पूर्णत्व देण्याच्या दृष्टीने हालचाल केली तर आपणाला सहज यश मिळेल कुटुंबातील वयोवृद्ध व्यक्तींच्या तब्येतीची काळजी घेणे हिताचे राहील. आपण वहान चालवत असाल तर काळजी घेऊन ते चालवा खाण्यापिण्यातील अतिरेक टाळा. **महिलांना :** कुटुंबातील सर्व सदस्यांना जपण्याचा प्रयत्न करा. मानसिक एकाग्रता वाढवून अध्यात्मात मन रमवा. आरोग्य प्रश्नात वेळीच लक्ष घाला. घरात मोठी खरेदी करू शकाल. **शुभ दिनांक :** २५,२७

धाडसी प्रयोग टाळा

वृश्चिक : हा साप्ताह वृश्चिकराशीसाठी समाधान कारक असणार आहे. संपत्ती विषयक प्रश्न आपल्या घरातून हळू हळू सुटू लागतील. घरातील विरोधक ही आपल्याशी या बाबत बोलण्यास तयार होतील. त्यामुळे यावेळेचा सदुपयोग करा. आपली उधारी आता वसूल होणार आहे. त्याचे टेंशन घेऊ नका. पुरेसा पैसा हाती येईल. सप्ताहाची सुरुवात ग्रहांची अनुकूलता असली तरीसुद्धा धाडसी प्रयोग टाळा. व्यावसायिक क्षेत्रात स्वतच्या कौशल्याचा वेगळा ठसा उमटवता येईल. दुहेरी वाटेवरून आपली वाटचाल घसरू देऊ नका. जुन्या गोष्टी विसरणे हिताचे राहील. नोकरदार व्यक्तीला मिळणारी बढती लांबणीवर जाईल. ज्येष्ठांचा पाठिंबा असला तरी थांबावे लागेल. सध्या कोणालाही दुखवू नका. ठरवलेले काम करून घेण्याचा प्रयत्न करा. योग्य व अचूक नियोजन केल्यास यशाची खात्री मिळेल. **महिलांना :** महिलावर्गाने पैशाच्या बाबतीत अनोळखी व्यक्तीवर विश्वास ठेवू नका. मैत्रीच्या नात्यात व्यक्तीगत स्वार्थ साधू नका. सामाजिक कार्यात आपला सहभाग मर्यादित ठेवा. आपल्या वैवाहिक जोडीदाराची मानसिकता हट्ट स्वरूपाची राहील. **शुभ दिनांक :** २४,२८

घरगुती वातावरण आनंदीमय राहील

धनु : हा साप्ताह धनुराशीसाठी प्रेम, आशा, विश्वास, सद्भावना, आशावादी आणि निष्ठा अशा सकारात्मक भावना स्वीकारण्यासाठी तुमच्या मनाला उद्युक्त करा. एकदा का अशा भावनांनी तुमच्या मनाचा ताबा घेतला की, कोणत्याही परिस्थितीत तुमचे मन आपसूकपणे सकारात्मक विचार करेल. तुमच्या जवळ आज पैसा ही पर्याप्त असेल आणि या सोबतच मनात शांती असेल. कुटूंबातील सदस्यांसोबत संमेलन, एकत्रित कार्यक्रम केल्याने प्रत्येकाचा मूड चांगला बनेल. जे लोक आत्तापर्यंत सिंगल आहे त्यांची भेट आज कुठल्या खास व्यक्तीसोबत होण्याची शक्यता आहे. परंतु, गोष्टीला पुढे वाढवण्याच्या आधी हे नक्कीच जाणून घ्या की, ती व्यक्ती कुणासोबत नात्यामध्ये नसावी. उतावीळपणे कोणताही निर्णय घेऊ नका, अन्यथा त्यामुळे आयुष्यात नंतर पश्चाताप करावा लागेल. **महिलांना :** महिलावर्गाने भावंडांविषयी किंतु-परंतु मनात ठेवू नका. घरगुती वातावरण आनंदीमय राहील. सांस्कृतिक कार्यक्रमांना तुमचा प्रतिसाद राहील. आध्यात्मिक जीवनात दिव्य अनुभूती येईल. तब्येतीत सुधारणा होईल. **शुभ दिनांक :** २५, २९.

धनाची बचत करा

मकर : हा सप्ताह मकर राशीसाठी आजा मात्र सगळे शांत आणि प्रसन्न असेल. आपल्या गोष्टींना महत्व देण्यासाठी आज तुम्ही मनातील गोष्टी बोलू शकतात. माझा तुम्हाला सल्ला राहील की, असे करू नका. आयुष्याला गृहित धरून वागू नका, जीवनात योग्य काळजी घेणे हे एक कसब आहे हे लक्षात असू द्या. भविष्यात जर तुम्हाला आर्थिक रूपात मजबूत बनायचे आहे तर, आजपासूनच धन बचत करा. आपल्या जीवनसाथीच्या आरोग्याची काळजी करावी लागेल आणि वैद्याकीय मदतीची गरज भासेल. तुमच्या स्वप्नातील राजकुमारीशी तुमची भेट झाल्यामुळे तुमचा आनंद गगनात मावणार नाही, तुमचे हृदय धडधडेल. जर तुमच्या व्यस्त दिनचर्येनंतर ही आपल्यासाठी वेळ मिळत आहे तर, तुम्ही या वेळेचा सदुपयोग करणे शिकले पाहिजे. असे करून आपल्या भविष्याला तुम्ही सुधारू शकतात. तुम्ही तुमच्या जोडीदाराने केलेल्या प्रेमाच्या वर्षावामुळे आयुष्यातील सगळे कष्ट विसरून जाल. **महिलांना :** महिलावर्गाला सासुरवाडीकडून काही शुभसंकेत मिळतील. घरातील वृद्ध व्यक्तींच्या तब्येतीत सुधारणा होईल. योग साधनेला महत्त्व द्या. **शुभ दिनांक :** २५,२८.

उधारीचे व्यवहार बंद ठेवा

कुंभ : या साप्ताहात लोक तुमच्या बाबतीत काय विचार करतात त्याची चिंता करू नका जर तुम्ही योग्य असाल तर तुमचे कुणीच काहीच बिघडवू शकत नाही. शारीरिक ताकद अजमावून पाहू नका. नंतर संधी मिळणार आहे. फक्त थोडा संयम ठेवावा लागेल. वयात आलेल्यानी इतरांनसारख लग्न म्हणजे भांडणं असा वाईट विचार करू नका. संगतीचा परिणाम अधोगतीत तर होणार नाही ना हे पाहणे गरजेचे ठरेल. आर्थिक व्यवहारात प्रत्येक पाऊल जपून टाकणे महत्वाचे ठरणार आहे. आपण खोटे बोलण्यापासून आणि खोटे बोलणाऱ्यापासून लांब राहणे आपल्या भविष्यासाठी चांगले आहे. या कालावधीत कौटुंबिक कलह निर्माण करू नका. व्यवसायात जम बसेपर्यंत घाई करू नका. उधारीचे व्यवहार सध्या बंद ठेवा. रोख स्वरूपात असणारी गुंतवणूक फायदा मिळवणारी असेल. **महिलांना :** भावंडांची जबाबदारी पार पाडावी लागेल. सांस्कृतिक कार्यक्रमाची गोडी वाढेल. बारीकसारीक दुखण्याचा बाऊ करणे टाळा. संसर्गजन्य आजारापासून तब्बेत सांभाळा कौटुंबिकदृष्ट्या शुभ गोष्टींचा ओघ राहील. स्वःचे आरोग्यतंत्र सांभाळणे आवश्यक ठरेल. **शुभ दिनांक :** २२, २६.

वेळेला महत्त्व द्या

मीन : हा साप्ताह मीनराशीसाठी बिनभरवशाच्या व्यक्तीवर अवलंबून राहू नका. कामाच्या ठिकाणी वेळेला महत्त्व द्या. सुधारित घटनांचाक्रम नीट लावून घ्या. लेखनकार्याची आवड निर्माण होईल. कामानिमित्त वाढणारा संवाद तुमच्या वक्तृत्वाची दाद देईल. कर्जबाजारीपणा कमी होईल. आर्थिक साहाय्य उत्तम राहील. सामूहिक गोष्टींसाठी ठरवलेले नियोजन उत्तम जमेल. महिलाना स्थावर मालमत्तेचे नियोजन करताना कागदपत्रांची नीट तपासणी करा. आपल्या कडे यणाऱ्या पैशांची आवक वाढणार आहे, मात्र खर्चावर नियंत्रण ठेवणे भाग आहे. आपल्या मनाप्रमाणे कामे सुरळीत होणार आहेत. घरासाठी खर्च होईल. जागा जमीन यांचा व्यवहार करत असाल तर फायदा होईल. मोठी पार्टी चालून येईल थोडे कामाच्या पाठी लागा. अवतीभवतीचे चित्र मनासारखे असेल. **महिलांना :** आपल्या नियोजनात अचूकपणा असेल तर कर्जफेड उत्तम प्रकारे कराल. सामाजिक क्षेत्रात काही चांगल्या घटनांमुळे आनंद वाढता राहील. वैवाहिक जीवनात मनासारखे वातावरण राहील. आहारावरील नियंत्रण सोडू नका. प्रकृती जपा. **शुभ दिनांक :** २३,२७.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे चांधई, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आहे, या मिळकतीचे मालक जगदीश गजानन हातमोडे, नंदकुमार गजानन हातमोडे व संजय गजानन हातमोडे यांचेकडुन आमचे अशिलांनी विकत घेणेचे ठरविले आहे.

अ.क्र.	सर्व्हे क्रमांक / भुमापन क्रमांक	क्षेत्रफळ हे. आर. पॉ.	आकारणी रु.पै.
०१	५३/१९	००.५६.०० या एकूण क्षेत्रापैकी ००.३८.००	३.४०

सबब सदर वर वर्णन केलेली मिळकतीबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास, त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून, ०७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- २२ नोव्हेंबर २०२६

ॲड.शरद आर.सावंत
बी. कॉम. एल. एल. बी.
पत्ता - सदनिका नंबर ०२, तळमजला,
बी विंग, विहंग को. ऑ. हौ. सो. लि.
कोतवालनगर कर्जत
ता. कर्जत, जि. रायगड - ४१०२०१
मो. नं. ९५२७२८२५२५

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे कोंदिवडे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे मालक हरिश्चंद्र लक्ष्मण देशमुख यांचे कडून विकत घेणे बाबत ठरविले आहे.

सर्व्हे नंबर	हिस्सा नंबर	क्षेत्र हे. आर.	आकार रु. पै.
३९	३/अ	०.३७.४०	१.८९

सबब सदर मिळकतीच्या व्यवहाराबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिध्द झाले पासून ०७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी.

वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार आमचे पक्षकारांकडून त्या मिळकतीचे मालकाबरोबर, पुर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : २२/११/२०२६

ॲड.सी.बी.ओसवाल
बी.कॉम.एल.एल.बी.
दिनकर- निमकर अपार्टमेन्ट
बाजारपेठ कर्जत, ता. कर्जत,
जि. रायगड - ४१०२०१.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत तीचे विद्यमान मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तरी नमुद मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:-

मौजे - जामरूंग, तालुका - कर्जत, जि. - रायगड येथील जमिन मिळकत

मालकांचे नाव	सर्व्हे नं.	हिस्सा नं	एकुण क्षेत्र (हे.आर.पॉ.)	आकार रू. पै.
जगन्नाथ चिंधु बिबवे	१५	०	०.०९.४० हे. आर	०.४४
	१६	०३	०.१५.०० हे. आर	०.२७
	१६	१३	०.१५.०० हे. आर	०.०८

सदरची जमीन मिळकत ही वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून ती विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकत या तद्भुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्जीलिन वगैरे कोणतेही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दि. २२/११/२०२६

खरेदीदारा तर्फे वकील
ॲड. तनुजा पंढरीनाथ पिंपरकर/भोईर
पत्ता. ओम श्री चंद्रोदय को-ऑप हौसिंग
गाळा क्रमांक ०७ विठ्ठल नगर ता.कर्जत, जि.रायगड
मो. ७५५८६२०१९५

जाहिर नोटीस

सर्वश्री श्रीविठ्ठल दर्शनेच्छुक व यात्राप्रेमी जनतेस कळविणेत येते की, सालाबाद प्रमाणे मौजे वरसोली ता.अलिबाग जि. रायगड येथील श्रीविठ्ठलाची यात्रा कार्तिक उत्पत्ति एकादशी शुक्रवार दि.०४-१२-२०२६ ते कार्तिक अमावस्या मंगळवार दि.०८-१२-२०२६ अखेर ५ दिवस भरणार आहे. यात्रेच्या निमित्ताने व्यापार उदिम करणारे दुकानदार, फेरीवाले, उसाचे चरक, हॉटेल व इतर सर्व धंदेवाले याना कळविणेत येते की,

१) दि. २७-११-२०२६ यात्रेपूर्वी कमीत-कमी ७ दिवस अगोदर जागा मिळणे संबधीचे अर्ज ग्रामपंचायतीकडे दिले पाहिजेत, ज्यांचे अर्ज दिलेल्या मुदतीत येतील त्यांचाच प्रामुख्याने विचार केला जाईल. चालू वर्षी कोणताही व्यवसाय सुरु करण्यापूर्वी ग्रामपंचायतीने व देवस्थान ट्रस्टने ठरविलेली कराची रक्कम भरुन लेखी पावती घेऊनच असा व्यवसाय सुरु करणेचा आहे.

२) पंचायतीची परवानगी व दोघांच्या कराची पावती भरल्याशिवाय व्यवसाय किंवा धंदा सुरु केल्यास तो बंद करणेचा अगर त्यावर ३ पट कर आकारण्याचा पंचायतीचा व देवस्थान ट्रस्टचा अधिकार राहिल. तसेच कोणत्याही दुकानदारास व धंदेवाल्यास दि. ०८-१२-२०२६ रोजी रात्रौ १२ वाजेपर्यंत यात्रा चालू असेपर्यंत दुकाने काढण्याची नाहीत.

३) कोणत्याही दुकान, हॉटेल मालकांनी अगर फेरीवाल्यांनी व इतर धंदेवाल्यांनी दि. ०४-१२-२०२६ रोजी दुपारी १२ वाजेपर्यंत पंचायत व देवस्थान ट्रस्ट कराची रक्कम भरणा करुन दिलेल्या जागेवर स्वत: दुकाने मांडण्याची आहेत. जे इसम वेळेवर येणार नाहीत. त्यांची कोणत्याही प्रकारची तक्रार ऐकली जाणार नाही. तसेच दिलेल्या जागेवर स्वतःच व्यवसाय करणेचा आहे, इतर तिऱ्हाईत इसमास जागा दिल्यास ग्रामपंचायत/ देवस्थान ट्रस्ट दुकान बंद करणेचा किंवा ३ पट जादा कर आकारण्याचा. व त्याबाबत वाद करण्याचा प्रयत्न केल्यास पोलीस कारवाई करण्याचा अधिकार ग्रामपंचायत/ देवस्थान ट्रस्टचा आहे.

४) सार्वजनिक सुरक्षिततेच्या दृष्टीने यात्रेच्या परिसरात यात्रेच्या मुदतीत फटाके, दारुकाम उडविण्यास व फुगे भरणाऱ्या गॅस व इतर कोणत्याही स्फोटक वस्तूंचा वापर करण्यास सक्त मनाई आहे.

५) ध्वनी प्रदुषण रात्रौ.१०.०० या वेळेत दिलेल्या मर्यादेत ठेवण्याची आहे. त्याची मर्यादा ओलांडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपणावर राहिल.

६) हॉटेल व इतर व्यवसायिकांनी यात्रेत व्यवसाय करण्यापूर्वी किंवा नंतर रितसर परवाना व हॉटेल व्यवसायासाठी वापरात येणाऱ्या गॅस सिलेंडरचा वापर करण्याचा परवाना मा. तहसिलदार सो. अलिबाग यांचेकडून घेण्याचा आहे. सदर परवाना शिवाय यात्रेत त्याचा वापर करता येणार नाही. याची संबधितांनी नोंद घेणेची आहे.

७) यात्रे निमित्त पंचायतीने/ देवस्थान ट्रस्ट यानी ठरविलेले दर या प्रमाणे आहेत.

१	मिठाईच्या एका तराजूच्या दुकानास	५५०/-रू
२	उसाचे चरकास, यांत्रिक चरक	६००/ रु. १०००/ रु.
३	हॉटेलवाले व भेळवाले १० फूटाच्या गाळयाला	११००/-रु व त्यापुढे
४	रिंग स्टॉल रनिंग फूट	८०/- रु फूट
५	कटलरी दुकानास जागा व धंदयाचे स्वरुप पाहून तसेच जादू करमणुक सिनेमा व इ. बाबतीत त्यांच्या कार्यक्रमांच्या जागेवर साहित्यावर व्यापार धंद्यावर तसेच मागील वर्षाची आकारणी लक्षात घेऊनच कर आकार करील.	१००/- रु व त्यापुढे
६	वेणीवाली/हारवाले, गजरेवाले	११०/रु च्या पुढे
७	आईस्क्रीम हातगाडी/इतर हातगाडी	१७५/रु.
८	पानगादी व इतर	१७५/रु.

९) यात्रेची संपूर्ण व्यवस्था, देखभाल व रचना व त्यातील सोयीनुसार फेरबदल, वैयक्तिक बाबी, जागा देणे श्रीविठ्ठल यात्रा व्यवस्थापन बघत असून व नाहरकत दाखले देण्याचे हक्क ग्रामपंचायतीकडे आहेत.

१०) यात्रेच्या जागेत व आजुबाजूच्या परिसरात यात्रेच्या कालावधीमध्ये बॅनर व कटआऊट वै. लावण्यापूर्वी ग्रामपंचायतीची व देवस्थान ट्रस्टची पूर्व परवानगी घेणे बंधनकारक आहे. तसेच त्याचा असणारा कर भरणेचा आहे. तशी परवानगी न घेता बॅनर, कटआऊट लावल्यास ते काढून घेतले जातील याची सर्वांनी नोंद घ्यावी.

टिप : यात्रा ५ दिवस भरणार आहे.

श्री.विनायक द.पडवळ विश्वस्त **श्री.सुरेंद्र शां. घरत** विश्वस्त **श्री.विष्णू भा.वानखेडे** ग्रामपंचायत अधिकारी **श्रीमती.प्रतिमा ज्ञा.पाटील** प्रशासक
श्रीविठ्ठल देवस्थान ट्रस्ट, वरसोली — ग्रामपंचायत वरसोली

जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने असे कळविण्यात येते की, मौजे ढवर ता. अलिबाग जि.रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. बाबु नारायण पोईलकर (जैनरे) रा.सहाणगोठी पो.कुरुळ, ता.अलिबाग, जि. रायगड यांच्या नांवे असलेली सामाईक मालकी हक्काची व त्यांचे ताबे कब्जातील व वहिवाटीतील खालील वर्णन केलेली भातशेती मिळकत माझे स्नेही यांना कायमस्वरूपात विकत देण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाचा साठेकरार विद्यमान मालकांबरोबर झालेला आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भुमापन क्रमांक व उपविभाग क्र.	क्षेत्र (हे. आर)	आकार (रू.पै.)
ढवर ता.अलिबाग जि.रायगड	२१९	०-३९-५० पो.ख.०-०२-५० एकुण क्षेत्र ०-४२-००	१०.३७

वर नमुद मिळकतीपैकी श्री. बाबु नारायण पोईकर वैगरे यांच्या अविभक्त मालकी हिश्श्याच्या भातशेती मिळकतीबाबत

सदर मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. तरी याउपरही सदरहु मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासुन चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. जर विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे गृहित धरून माझे स्नेही वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

तारीख :- २१/११/२०२६

सही /-
श्री. किशोर वामन तेलंगे
पत्ता : श्री साई कन्सल्टंन्सी, दुय्यम निबंधक अलिबाग
कार्यालयासमोर गाळा क्र.३, ता.अलिबाग, जि.रायगड
मो. नं. ९८२२३४८१७३, ८८०५३२८६४६

जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने असे कळविण्यांत येते की, मौजे वावे, ता. मुरुड, जिल्हा रायगड येथील खालीलप्रमाणे हक्क नोटीस वर्णन असलेली जमीन मिळकत आमचे अशिलांनी संबंधित कब्जेदार इकबाल अ. रहिमान शिरशिकर व सगीरा इकबाल शिरशिकर यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे.

गट क्र.	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रु.पै.	गांव
६९/२	एकुण क्षेत्र ०.५०.००	०.४७	वावे, ता. मुरुड

वरील वर्णन केलेल्या जमीन मिळकतीपैकी संबंधित कब्जेदार व विक्रेते इकबाल अ. रहिमान शिरशिकर व सगीरा इकबाल शिरशिकर यांच्या मालकी हक्काचे एकूण क्षेत्र ०.५०.०० हे. आर., आकार रु. ०.४७ पैसे इतके असून, सदर संपूर्ण ५० गुंठे क्षेत्राची जमीन मिळकत आमच्या अशिलांनी खरेदी करण्याचे निश्चित केले आहे.

सबब सदर वरील वर्णनाची संपूर्ण क्षेत्राच्या जमिन त्यामधील तदंगभूत वस्तु मिळकतीवर अगर तिच्या कोणत्याही भागावर कोणाचाही गहाण, दान, बोजा, बक्षीस, फरोक्त, पोटगी, चार्ज, संपादन, भाडेपट्टा, वहिवाट, साठेकरार, लिज, तबदील, ट्रस्ट, वारसा या प्रकारचा अगर अन्य कोणत्याही व कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास संबंधितांनी आपापल्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे मुदतीत खालील सही करणारे ॲडव्होकेट यांचे पत्यावर सकृतदर्शनी लेखी पुराव्यासहित रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. याप्रमाणे कोणाचीही, कसलीही हरकत अगर तक्रार आली नाही तर सदर मिळकत निर्वेध, बोजाविरहित व खरेदी घेण्यास योग्य आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणाऱ्या तक्रारी अगर हरकती आमचे अशिलांवर कोणत्याही व कसल्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत व संबंधितांनी आपापल्या तथाकथित हरकती, तक्रारी कायमच्या सोडून दिल्या आहेत, असे समजण्यात येईल हे सर्व लोकांस कळावे.

ठिकाण : नांदगाव, मुरुड-जंजिरा
दिनांक : २२/११/२०२६

सही/-
अलिया मेहबूब सिर्सीकर
ॲडव्होकेट
रा. मु. पो. नांदगाव (सिर्सीकर कॉम्प्लेक्स),
ता. मुरुड, जि. रायगड-४०२४०१.

सोशल वर्कर पाहिजे.

वात्सल्य ट्रस्ट शिशुगृह अलिबाग येथे पूर्ण वेळ महिला सोशल वर्कर पाहिजे. MSW पदवी तसेच संगणक व इंग्रजी भाषा येणे आवश्यक.

योग्य उमेदवारास मुलाखती साठी बोलावण्यात येईल. इच्छुक उमेदवारांनी आपला अर्ज त्वरित खालील पत्त्यावर पाठवावा.

संस्थेचा पत्ता :- वात्सल्य ट्रस्टघर नंबर १५१०/२ब. मयूर बेकरी च्या मागे ता.अलिबाग जिल्हा रायगड ४०२२०१. मोबाईल ८५५४८८४००४

जाहीर हरकत

या जाहीर हरकतीने तमाम जनतेस कळविण्यात येते की,

आमचे अशिल १)श्री.किशोर एकनाथ पाटील २) श्री.जितेंद्र एकनाथ पाटील, ३)श्रीमती गुलाब एकनाथ पाटील , नं.१ ते ३ रा.विश्वेश्वर नगर, नंदीमाळ नाका, पेण, ता.पेण, जि.रायगड ४) सौ.सुवर्णा सचिन पाटील, रा.रांजणखार, चिंचवली पो.नारंगी, ता.अलिबाग जि.रायगड तर्फे जाहीर हरकत देतो ती खालीलप्रमाणे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	सर्व्हे नंबर	क्षेत्र (हे.आर)	आकार
पेण, ग्रामीण ता.पेण	२९१/अ	०-९३-०० पो.ख. ०-४२-०० एकूण १-३५-००	१.९४

सदर पैकी पश्चिम दिशेकडील ०-८०-०० हे.आर. या जाहीर हरकतीचा विषय आहे.

वरील मिळकतीबाबत आमचे अशिलांनी १)श्री.रामचंद्र नारायण मनोहर, २)श्री.सदाशिव नारायण मनोहर, ३)श्री.मधुसूदन नारायण मनोहर यांच्या विरूद्ध अलिबाग येथील दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर यांच्या कोर्टात रे.मु. नं.१०५/२०२५ चा दावा दाखल केलेला आहे. तो दावा अजुनही प्रलंबित आहे.

तरी वरील मिळकती संदर्भात कुणीही कसलाही व्यवहार अगर विक्री, साठेकरार, बयाणा करार वगैरे कोणताही व्यवहार करू नये. जर असा कोणताही व्यवहार केल्यास आमचे अशिल संबंधी सर्वा विरूद्ध दिवाणी व फौजदारी स्वरूपाच्या कोर्ट कारवाया करतील याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : २१/११/२०२६

सही/-
ॲड.महेश एस.म्हात्रे
ऑफिस नं.१, शिवराम भास्कर बिल्डींग,
बाजारपेठ रोड, केळकर नाका, अलिबाग
मो नं. ९२२६८४७०७७

जाहीर नोटीस

निशानी नं. २३/५
प्रोसेस जमा

वादीचे वकिल-ॲड. महेश एस्.म्हात्रे
दिवाणी चौ. अर्ज क्र.२०/२०२६

अलिबाग येथील मे.सिव्हील जज सिनिअर डिव्हीजन सो.यांचे कोर्टात

हरी जाखु पाटील मयत तर्फे वारस — अर्जदार
विरुद्ध
कमळाकर शंकर पवार, वगैरे — सामनेवाला

प्रति,
सामनेवाला नं. १) कमळाकर शंकर पवार,
रा. मांडवी मोहल्ला, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड.

यांसी,

या जाहीर नोटीसने तुम्हांस कळविण्यात येते की,

अर्जदार हरी जाखु पाटील मयत तर्फे वारस यांनी अलिबाग येथील दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर. यांच्या न्यायालयात दिवाणी चौ. अर्ज नं. २०/२०२६ चा अर्ज स्पेशल दिवाणी मुकदमा नं.८४/२००९ पुन्हा फौलावर घेण्याकरिता दाखल केला आहे. सदर केसचा तुम्हास समन्स काढले असता तुम्ही सदरच्या पत्यावर सापडले नाहीत. या कारणाने परत आले आहेत. सबब मे. कोर्टाने तुम्हांस जाहिर नोटीसीद्वारे समन्स काढण्याचा आदेश केला आहे.

तरी तुम्हांस कळविण्यात येते की, दिनांक २३/११/२०२६ रोजी तुम्ही मा. दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर अलिबाग मा. गवारे साहेब यांच्या न्यायालयात सकाळी १०.३० वाजता स्वतः अगर वकीला मार्फत हजर होवुन तुमचे म्हणणे व कागदपत्रे दाखल करावीत. जर तुम्ही वरील तारखेस व वेळेत मा. न्यायालयात हजर राहिला नाहित तर मा. कोर्ट तुमच्या विरुद्ध हुकुम करुन तुमच्या गैरहजेरीत अर्जदाराचे अर्जाचे कामकाज चालविण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर जाहिर नोटीस माझ्या सहीनीशी व मा.कोर्टाच्या शिक्यानिशी आज रोजी दिली.

अलिबाग
ता. १८/१०/२०२६

सही /-
क.लिपिक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अलिबाग रायगड

सही/-
अधिक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अलिबाग रायगड

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमच्या अशिलांनी खाली वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक १. आशा मोहन भिसे व २. रुपेश मोहन भिसे, रा.नागाव ता.अलिबाग, जि. रायगड यांचेकडून विकत घेणेचे ठरलेले आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

-: मिळकतीचे वर्णन :-

मौजे	भुमापन क्र. व उपविभाग नं.	क्षेत्र (हे.आर)	आकार (रू.पैसे)
नागाव, ता.अलिबाग	५७७	०-१४-००	३.१२

वर नमुद केलेली मिळकत व त्यामधील असलेले नागाव ग्रामपंचायत घर क्र.१३८१ क्षेत्र ५२५ चौ. फुट. अशी सर्व मिळकत या जाहीर नोटीसचा विषय आहे.

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध बोजा, अथवा गहाण, दान लिज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेन्टेनन्स् मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (१४) चौदा दिवसांचे आत आणून द्यावी. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लिअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशील सदर व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यांत येईल, हे सर्वांस कळावे.

सही/-
अलिबाग, — **ॲड. आर.बी.कोसमकर**
दि. २१-११-२०२६. — चिरायु ब्राम्हण आळी, अलिबाग
ता.अलिबाग, जि.रायगड

IIFL FINANCE

आयआयएफएल फायनान्स लिमिटेड CIN: L67100MH1995PLC093797
नोंदणीकृत कार्यालय: आयआयएफएल हाऊस, सन इन्फोटेक पार्क, रोड क्र. 16व्ही, प्लॉट क्र. बी-23, ठाणे औद्योगिक क्षेत्र, वागळे इस्टेट, ठाणे – 400604 दूरध्वनी: 022-41035000 • फॅक्स: 022-25806654
टोल-फ्री: 1860-267- 3000 ई-मेल: gold-helpline@iifl.com • वेबसाइट: www.iifl.com

सार्वजनिक सूचना – तारण ठेवलेल्या सोन्याच्या मालमत्तेचा लिलाव

याद्वारे संबंधित कर्जदार/कर्जदारांना, त्यांच्या कायदेशीर वारसांना तसेच सर्वसामान्य जनतेला सूचित करण्यात येते की, एक भारतीय रिझर्व्ह बँकेत नोंदणीकृत बिगर-बँकिंग वित्तीय कंपनी (एनबीएफसी), आयआयएफएल फायनान्स लिमिटेड ("आयआयएफएल") येथे नमूद केलेल्या कर्ज खात्यांमध्ये तारण ठेवलेल्या सोन्याच्या तारणमालमत्तेचा सार्वजनिक लिलाव आयोजित करीत आहे. संबंधित कर्जदारांनी लिलावाच्या सूचना व उपलब्ध पत्रव्यवहार माध्यमांद्वारे पाठविण्यात आलेल्या स्मरणपत्रांनंतरही आपल्या कर्जाची परतफेड किंवा खाते नियमित केलेले नसल्यामुळे, भारतीय रिझर्व्ह बँकेने वेळोवेळी जारी केलेल्या लागू निर्देशांनुसार ("आरबीआय निर्देश"), कर्ज करारातील अटी व शर्ती तसेच आयआयएफएलच्या संचालक मंडळाने मंजूर केलेल्या सुवर्ण कर्ज (गोल्ड लोन) धोरणानुसार हा लिलाव करण्यात येणार आहे.

लिलावाची तारीख, वेळ आणि ठिकाण: सार्वजनिक लिलाव दि. **०१.१२.२०२६** रोजी **सकाळी १०:०० वाजल्यापासून** पुढे नमूद आयआयएफएल शाखेत आयोजित करण्यात येईल – **मुंबई एनएम – पेण नगरपालिकेची इमारत जीएल: आयआयएफएल फायनान्स लिमिटेड, पेण नगरपालिका इमारत, तळमजला, गाळा क्रमांक ३०/३१, पिन – ४०२१००.**
हा लिलाव त्याच जिल्ह्यातील कर्ज वितरण करणाऱ्या शाखांच्या कर्ज खात्यांशी संबंधित आहे.

सुवर्ण कर्ज (गोल्ड लोन) खात्यांचा तपशील: कर्ज खात्यांचे क्रमांक – GL40692484, GL43664317, GL44152117, GL48275633, GL41731519, GL41577483, GL46967143, GL44191777, GL42740123, GL46380663, GL45826184, GL43762967, GL45404724, GL43261210, GL46860768, GL44146144, GL37395178, GL45825488, GL44517642, GL44355525, GL39691235, GL41219566, GL48511165, GL49035331, GL40458604, GL39271287, GL44146848, GL38882792, GL47928327, GL48446682, GL45875029, GL46013997, GL45114173, GL46903369, GL45963985, GL39990529, GL46766492, GL43312915, GL42623649, GL45966866, GL46379369, GL48195412, GL47220433, GL46014269, GL43724106, GL40290234, GL43181913, GL47318007, GL46031401, GL50217605, GL43121099, GL44275114, GL48048671, GL46480916, GL45255017, GL43788593, GL44330685, GL44240100, GL48403112, GL49404960, GL48403234, GL49454420, GL43712182, GL49424340, GL41849404, GL43530608, GL42404024, GL45772582, GL41363132, GL44699789, GL41009035, GL44202185, GL46675831, GL40662112, GL40894796, GL44162624, GL49369856, GL44611532, GL42004189, GL44584244, GL42349623, GL45042086, GL44909346, GL40356078, GL47455380, GL48212145, GL46927226, GL42671429, GL45879906, GL47921869, GL45525501, GL45980439, GL42154921, GL44640343, GL44590848, GL41095048, GL47913724, GL49277822, GL42548938, GL47220347, GL42458461, GL46051011, GL49942363, GL43961348, GL45722907, GL47176610, GL46479257, GL48204387, GL47320385, GL45506332, GL44255295, GL42266989, GL41860492, GL48066431, GL48108390, GL44763283, GL47110690, GL44492619, GL43503017, GL48218139, GL42790238, GL41953282, GL42702135, GL47577734, GL47219248, GL44533668, GL43716416, GL45668534, GL44253649, GL48736774, GL47014388, GL43998641, GL46383775, GL45967532, GL44791682, GL43279611, GL48201772, GL48123367, GL49397408, GL43986820, GL41347720, GL49434773, GL46822646, GL46822306, GL47015558, GL48978136, GL46536341, GL45722615, GL40886330, GL48422987, GL43841125, GL41369991, GL43567908, GL44278312, GL49265663, GL43280911, GL42038537, GL47631991, GL48977449, GL41987051, GL43878666, GL44206509, GL45113914, GL46723433, GL44238544, GL47587338, GL44321466, GL41800949, GL41733080, GL42939932, GL42510418, GL40109954, GL43274820, GL45814153, GL44492359, GL48229862, GL46030678, GL42701986, GL42260401, GL45088831, GL47081728, GL40989119, GL43546198, GL43557553, GL43493981, GL43493588, GL44790403, GL41028990, GL45976609, GL49011502, GL43424313, GL44800012, GL45374108, GL42823111, GL42349928, GL46621469, GL43957949, GL44663251, GL44206286, GL47713226, GL44264453, GL41012264, GL47620538, GL46014415, GL47458548, GL45805809, GL44707116, GL47821524, GL47819033, GL49003903, GL48394926, GL49374478, GL44716622, GL42183650, GL42365339, GL46824718, GL47915323, GL43165285, GL40205868, GL42441776, GL40215567, GL46613043, GL39901155, GL41567929, GL42483513, GL47317127, GL47051263, GL43793578, GL40238190, GL46378036, GL47908783, GL46052199, GL44706158, GL44161017, GL42952723, GL44400869, GL41723039, GL44225264, GL42621776, GL40984833, GL43898281, GL47591145, GL46883529, GL43313775, GL47531973, GL43825449, GL43448551, GL45630835, GL47957184, GL44611892, GL40813907, GL43448292, GL43037512, GL49056264, GL44698671, GL46234740, GL43666169, GL46707301, GL42195587, GL44065095, GL48557337, GL46631265, GL46918096, GL44819146, GL43333251, GL40013358, GL46176058, GL47848404, GL47041615, GL44030751, GL45707017, GL48406897, GL48956267, GL47952408, GL47080909, GL41617221, GL41102570, GL41754374, GL40148646, GL52012633, GL49055305, GL49403251, GL37407642, GL44551628, GL48232027, GL39677288, GL44507285, GL44225655, GL44622264, GL38066454, GL44208067, GL36617017, GL44698521, GL45543409, GL48348031, GL44693038, GL43488138, GL45917759, GL40074691, GL44657426, GL46600143, GL44616493, GL41900896, GL43952166, GL49083445, GL42658716, GL46491068, GL44365725, GL49470297, GL46407500, GL40136224, GL44086420, GL43778620, GL49919795, GL44270053, GL42205567, GL46860383, GL47932797, GL47671503, GL46487210, GL49196998, GL41126289, GL44014181, GL46845487, GL39813394, GL43978979, GL46600204, GL43594731, GL49122221, GL49052220, GL43875635, GL43784634, GL44225433, GL50590082, GL48740620, GL47598715, GL42573350, GL47765558, GL49131881, GL46342704, GL50341216, GL48176778, GL44089634, GL45859393, GL44204877, GL44032995, GL45167616, GL46914652, GL46911164, GL47564401, GL52527935, GL46470882, GL41234539, GL45055471, GL45196134, GL41115340, GL44001811, GL42839747, GL48942476, GL48365337, GL46574267, GL45816915, GL44298880, GL50516703, GL46484433, GL50665400, GL51163604, GL43501035, GL41339199, GL41982391, GL40880602, GL46905315, GL44650381, GL48948533, GL44523126, GL44511613, GL45407715, GL46804590, GL50746067, GL48951279, GL48630304, GL43550899, GL45062367, GL48727069, GL51753283, GL43583034, GL39899862, GL46447062, GL43480344, GL51525877, GL47238594, GL48288411, GL45071102, GL45764326, GL44755623, GL41780958, GL45778845, GL47011830, GL40336938, GL46411756, GL42650682, GL51748182, GL44225812, GL44210050, GL43098587, GL43268339, GL46366377, GL45198353, GL47395071, GL45887245, GL49050547, GL47000246, GL47937497, GL44235034, GL47852438, GL46393867, GL46267871, GL48265512, GL46758457, GL43316994, GL47364645, GL43942863, GL44674300, GL43123456, GL43327115, GL46898351, GL48423849, GL48424404, GL40836739, GL48218064, GL48950670, GL44641227, GL43994783, GL46359034, GL44255358, GL43661073, GL46305675, GL43124922, GL43169693, GL43308125, GL50236655, GL44824230, GL47341445, GL47835356, GL41858158, GL46837453, GL43416603, GL43763916, GL46674971, GL43920172, GL46169981, GL46567310, GL46675898, GL49405972, GL43169429, GL44402410, GL48189375, GL42753872, GL46030602, GL48938610, GL47148737, GL47041797, GL46394524, GL46031002, GL43767473, GL45516510, GL44075191, GL44632213, GL42758333, GL44072008, GL40980962, GL44632362, GL45753143, GL47953957, GL45343306, GL46221901, GL47138708, GL42755499, GL42801822, GL42435388, GL43652738, GL49039429, GL43018622, GL43169118, GL47206582, GL47012858, GL43078122, GL41777398, GL43285011, GL43637038, GL45711610, GL50311669, GL44488186, GL44158946, GL48339078, GL43891362, GL46405908, GL44229204, GL45847297, GL48884097, GL43108101, GL47023091, GL44744124, GL40943062, GL40580765, GL42978361, GL46381359, GL46016503, GL47981974, GL45652981, GL47181472, GL45873992, GL42916376, GL46720098, GL44621633, GL47665591, GL44596354, GL43812882, GL41664249, GL47945797, GL47349360, GL47946340, GL49118182, GL46382235, GL43467546,



राशीभविष्य

- **मेष** : कौटुंबिक कलह त्रासदायक ठरेल. नोकरीत अडचणी निर्माण होतील. कुलदेवतेची उपासना करावी.
- **वृषभ** : ज्येष्ठांचं मार्गदर्शन कामी येईल. कामाचा ताण कमी होईल. भागीदारी व्यवसायात प्रगती होईल.
- **मिथुन** : छोट्या व्यावसायिकांना दिलासा मिळेल. प्रवास शक्यतो टाळावा. नुकसानीबाबत काळजी घ्यावी.
- **कर्क** : अपेक्षित वार्ता कानी येईल. आर्थिक व्यवहार लाभदायक ठरतील. स्थावर, वाहन सौख्य लाभेल.
- **सिंह** : कारकिर्दीत नव्या जबाबदाऱ्या येतील. पती-पत्नीत मतभेद संभवतात. नव्या योजना मार्गी लागतील.
- **कन्या** : उत्साहवर्धक घटना घडतील. विद्यार्थ्यांना स्पर्धांमध्ये यश मिळेल. उत्तम धनप्राप्तीचे योग आहेत.
- **तूळ** : सरकारी कामं मनाजोगी होतील. आर्थिक बाबतीत स्थैर्य लाभेल. स्थापत्य क्षेत्रात अनुकूलता राहील.
- **वृश्चिक** : वरिष्ठांची नाराजी वेळीच दूर करा. प्रकृतीच्या तक्रारी उद्भवतील. कौटुंबिक समाधान प्राप्त होईल.
- **धनु** : व्यवसायात नवे करार होतील. थोरामोठ्यांचा सहवास लाभेल. यंत्र, वाहनांचा वापर जपून करावा.
- **मकर** : चिंतेचं वातावरण राहील. नोकरीत वरिष्ठांच्या नाराजीची शक्यता आहे. विचारपूर्वक पावलं टाकावी.
- **कुंभ** : वास्तवाचं भान ठेवायला हवं. इतरांना आश्वासनं देताना विचार करावा. मानसिक अस्वास्थ राहील.
- **मीन** : कौटुंबिक प्रश्नातून मार्ग निघेल. अनावश्यक खर्च टाळायला हवा. विद्यार्थ्यांना सुयश लाभेल.

२२ नोव्हेंबर

दिनविशेष

१९५९: ज्येष्ठ नाटककार पार्श्वनाथ आळतेकर यांचे निधन.
२००५: एंजेला मर्केल जर्मनीच्या प्रथम स्त्री चान्सेलर झाल्या.
२०१३: आंध्र प्रदेशच्या किनारपट्टीला 'हेलेन' या वादळाचा मोठा फटका. वादळाचे सात बळी.
२०१४: जामा मशिदीचे इमाम सय्यद अहमद बुखारी यांनी त्यांचा मुलगा शाबान याला नायब इमाम म्हणून नियुक्त केले.
२०१५: भारताने आशिया करंडक ज्युनियर हॉकी स्पर्धेत अंतिम फेरी गाठली.

स्किल डेव्हलपमेंट

ब्रेक के बाद

घरच्या जबाबदाऱ्या, मुलांचं पालनपोषण अशा अनेक कारणांसाठी महिलांना करिअरमधून ब्रेक घ्यावा लागतो. मात्र या जबाबदाऱ्या संपल्या, मुलं जाणती झाली की महिला नव्याने कामाला सुरूवात करतात. अर्थात मधल्या काळात बरेच बदल झालेले असतात. आपला या क्षेत्राशी संपर्क तुटलेला असतो. कामाचं स्वरुप बदललेलं असतं. अशा स्थितीत लगेच नोकरी मिळत नाही. ब्रेकनंतर करिअरची सुरूवात करताना पूर्वतयारी करायला हवी. नोकरीच्या दृष्टीने स्वत:ला तयार करायला हवं. स्वत:चं नाणं खणखणीत वाजवण्यासाठी काय करता येईल? जाणून घेऊ.

* नोकरीसाठी स्वत:ला सज्ज करण्याआधी स्वत:मध्ये आत्मविश्वास निर्माण करा. यासाठी काही नवी कौशल्यं विकसित करता येतील. आपण पुन्हा एकदा जोमाने काम करू, हा विश्वास तुमच्यात असायला हवा.

(क्रमश:)

टेक नॉलेज

फिटनेससाठी स्मार्ट मिरर

मुलामुलींनो, सध्या अनेकजण फिटनेसबाबत जागरूक झाले आहेत. विविध कंपन्या फिटनेस बँड्स बनवतात. हे बँड आपली आरोग्यविषयक माहिती साठवून ठेवतात. अमेरिकेतल्या 'मिरर' नावाच्या कंपनीने आरशासारखं उपकरण तयार केलं आहे. हा स्मार्ट मिरर आहे. हा मिरर फिटनेसबाबत मार्गदर्शन करणार आहे. हा स्मार्ट मिरर स्मार्टफोनला कनेक्ट करून वापरता येईल. स्मार्ट मिररसाठी खास ॲपही तयार करण्यात आलं आहे. या ॲपद्वारे व्यायामाचा प्रकार निवडता येईल. यात जॉगिंग, योगा, जीम, स्ट्रेंग्थ ट्रेनिंग असे बरेच पर्याय आहेत. यात कॅमेरा, ऑडियो सिस्टिम आणि स्पीकर्स आहेत.

या स्मार्ट मिररमध्ये एलईडी डिस्प्ले बसवण्यात आला आहे. हा मिरर युजरला व्यायाम करण्याची प्रेरणा देईल. व्यायामाच्या वेळेची आठवणही करून देईल. तुम्ही किती वेळ व्यायाम करायला हवा हे ही सांगेल. या मिररच्या स्क्रीनवर वेगवेगळे व्यायामप्रकार सुरू राहतील. हे व्यायाम बघून तुम्हीही व्यायाम करू शकता. या मिररमध्ये युजरच्या सुरक्षेची पुरेपूर काळजी घेण्यात आली आहे.

आरोग्यमंत्र

उत्तम आरोग्यासाठी...

थंडी पडण्यास सुरूवात झाली की, व्यायाम करणाऱ्यांची संख्या वाढत जाते. पहाटे वा सकाळी अनेकजण फिरायला बाहेर पडलेले पहायला मिळतात. भरभर चालणं, धावणं, सायकलिंग असे व्यायामही अनेकजण आवर्जून करतात. विशेष म्हणजे एरव्ही व्यायामाबाबत फारसं सजग नसलेले थंडीत मात्र आवर्जून व्यायामावर भर देतात. याचं महत्त्वाचं कारण या दिवसात केलेला व्यायाम अधिक आरोग्यदायी ठरतो, असा समज आहे.



खरं तर व्यायाम नियमितपणे केला पाहिजे. काही साध्या-सोप्या व्यायाम प्रकारांनीही उत्तम आरोग्य प्राप्त करता येतं. यात सूर्यनमस्काराचा समावेश होतो. शालेय जीवनापासून सूर्यनमस्काराचं महत्त्व सांगितलं जातं. नियमित सूर्यनमस्काराने अनेक विकार दूर ठेवता येतात. मुख्यत्वे या व्यायामामुळे पोटातील सर्व अवयव व्यवस्थित कार्य करतात. अन्नपचन व्यवस्थित होते तसंच शौचासही साफ होते. त्यामुळे पोटदुखी तसंच अन्य विकार दूर ठेवता येतात. स्त्रियांमधील मासिक पाळीच्या तक्रारी दूर होतात. तसंच गर्भाशय व्यवस्थित राहण्यास मदत होते. त्याच बरोबर पाठदुखी, कंबरदुखी, गुडघेदुखी असे विकार टाळता येतात. दृष्टी उत्तम राहणं, मेंदूची कार्यक्षमता उत्तम राहणं यासाठीही सूर्यनमस्कार फायदेशीर ठरत असल्याचं तज्ज्ञांचं मत आहे. मधुमेह, रक्तदाब या विकारतही सूर्यनमस्कारामुळे लाभ मिळतो. मात्र, अशा व्यक्तिंनी तज्ज्ञांच्या सल्ल्याने तसंच मार्गदर्शनाखाली सूर्यनमस्कार घालायला हवेत.

पंचांग

रविवार, २२ नोव्हेंबर २०२६
पराभवनाम संवत्सर शके १९४८, कार्तिक शु. १३, चंद्रराशी : मेष, नक्षत्र : अश्विनी, योग : व्यतिपात, सूर्योदय ६.५२, सूर्यास्त ५.५७

फॉरवर्ड्स

बुझ ज़ाते हैं दियें तेल क़ी कमी से भीं...

हर बार क़ुसूर हवा क़ा नहीं होता...!

फिटनेस

व्यायामामुळे झालेली झीज करून काढण्यासाठी शरीराला वेळ मिळायला हवा. त्यामुळे आठवड्यातला एक दिवस आराम करायला काहीच हरकत नाही. मात्र ही विश्रांती कशी घ्यायची, या वेळात नेमकं काय करायचं, काय करायचं नाही याविषयी...

* विश्रांतीमुळे शरीर अधिक उत्साहाने काम करू लागतं. अविरत व्यायामामुळे शरीरातले बदल पटकन टिपता येत नाहीत. आठवड्यातले सहा दिवस तुम्ही भरपूर व्यायाम करता. त्यामुळे एका दिवसाच्या विश्रांतीने तुमच्या फिटनेसमध्ये खंड पडत नाही.

(क्रमश:)

करिअरवाटा

सेवाभावातून कारकिर्द

बदलत्या आणि आधुनिक जमान्यात विविध क्षेत्रांचा विस्तार होत असताना त्याला सेवा क्षेत्रही अपवाद राहिलेलं नाही. याही क्षेत्रात रोजगाराच्या नवनव्या संधी निर्माण होत आहेत. या क्षेत्रात कारकिर्दीच्या संदर्भात काही बाबी अवश्य लक्षात घ्याव्या. मुख्यत्वे अमेरिका आणि ब्रिटनमधील या क्षेत्राची संकल्पना भारतात चांगलीच मूळ धरू लागली आहे. पॅरेंटस केअर आऊटसोर्सिंग ही अशीच एक संधी. सायकॉलॉजी, फिजिओथेरपी, जेरॅटॉलॉजी, फिजिकल सायन्स, अलाइड हेल्थ सायन्स यामध्ये मास्टर्स डिग्री मिळवणारे या क्षेत्रात उत्तर करियर करू शकतात. घरातील आजारी, एकट्या वृध्द व्यक्तिंची काळजी घेण्याची जबाबदारीही पार पाडता येते. अर्थात यात वृध्दांच्या आरोग्याची काळजी घेण्याबरोबरच त्यांची मानसिकता लक्षात घेऊन संवाद साधण्याचं कौशल्य असावं लागतं. तसं असेल तर 'एल्डरली केअर स्पेशालिस्ट' म्हणून काम करता येतं. सद्यस्थितीत दिल्ली, मुंबईबरोबरच पुणे, बंगळुरू, चेन्नई, हैदराबाद, मेरठ, अहमदाबाद, नाशिक तसंच नागपूरमध्येही 'एल्डरली केअर सर्व्हिस' ची आवश्यकता भासत आहे. यासाठी खास अभ्यासक्रम पूर्ण करण्याची किंवा प्रशिक्षणाची आवश्यकता असतेच असं नाही. सामाजिक कार्याची आवड, सहनशीलता आणि दुसऱ्यांना समजून घेण्याची, त्यांच्याशी मनापासून मैत्री करण्याची आवड असणाऱ्यांसाठी हे क्षेत्र खुलं आहे.



खेचाखेची

डॉक्टर

डॉक्टर (आपल्या मित्राला) : तुला खरं सांगतो, मी या उगाचच करण्यात येणाऱ्या शस्त्रक्रियेच्या विरोधात आहे. मी याचं समर्थन कधीच करु शकणार नाही.

मित्र : मग तू शस्त्रक्रियेचा निर्णय कधी घेतोस?

डॉक्टर : मला पैशाची गरज भासते तेव्हा!

वेगळं काही

इंडोनेशियातल्या पश्चिम जावा परिसरातल्या बांडुंग शहरात मुलांना स्मार्टफोन आणि टीव्हीपासून लांब ठेवण्यासाठी अनोखा उपक्रम राबवण्यात आला आहे. इथल्या मुलांना कोंबडीची पिल्लं, रोपटी तसंच बिया दिल्या जात आहेत. मुलांनी स्मार्टफोन बाजूला ठेऊन कोंबडीच्या पिलांची आणि या रोपट्यांची देखभाल करावी, या उद्देशाने हा उपक्रम राबवण्यात आला आहे. प्रशासनाने इथल्या बारा शाळांमध्ये कोंबडीची दोन हजार पिल्लं आणि १५०० रोपटी तसंच बियांचं वाटप केलं आहे. मुलांना आणि त्याच्या पालकांना ही संकल्पना भावली. स्मार्टफोनवर वेळ घालवण्यापेक्षा कोंबडीच्या पिल्लांची तसंच रोपट्यांची देखभाल करणं कधीही चांगलं, असं त्यांचं म्हणणं आहे.

फॅशन पॅशन

साड्यांना द्या ट्रेंडी लूक

लग्नसमारंभ म्हटला की भारीच्या, आकर्षक, नाविन्यपूर्ण साड्यांची खरेदी आलीच. त्यात मुख्यत्वे बनारसी तसंच सिल्कच्या साड्यांचा समावेश होतो. मात्र, हौसनं घेतलेल्या अशा साड्या नवीन असताना वापरल्या तरी नंतर पडून राहतात. पडून राहणाऱ्या या साड्यांमध्ये जीव गुंतल्यामुळे देऊन टाकणंही शक्य होत नाही. अशा वेळी रिसायकलिंगद्वारे त्यांना ट्रेंडी लूक देण्याचा प्रयत्न करता येईल. कसा ते पाहू...



* बनारसी साडीचा काठ जाड असतो. तो नको असेल तर बॉर्डर कापून उरलेला भाग दुपट्टा म्हणून कॅरी करता येईल. हा दुपट्टा सिल्कच्या प्लेन ड्रेसवर खुलून दिसतो. हे दुपट्टे तुम्ही घरी बनवू शकता.
* भरजरी साड्यांचे गाऊन्स शिवून घेता येतील. लग्न, रिसेप्शनसाठी हा छान पर्याय आहे. रिच, एथनिक लूकसाठी बेस्ट!
* या साड्यांपासून ट्रेंडी ब्लाऊज शिवता येतील. ते लेहंग्यावर किंवा घेरदार स्कर्टसवर शोभून दिसतील. प्लेन साडीवरही हे ब्लाऊज घालू शकता. या कॉन्ट्रास्ट ट्रेंडच्या जमान्यात हटके लूक मिळवून देईल.
* काही वेगळं ट्राय करायचं तर साड्यांपासून ट्राउझर्स किंवा पलाझो शिवता येतील. त्यावर क्लासिक व्हाईट शर्ट मस्त लूक देईल.

सुडोकू १७८

			९				४	
६	३				४			
					७	२	१	
		४			१	६		
२			८		५			७
		७	६			५		
	१	८	३					
			४				३	१
	४				६			


टीप -

* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह्न ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

सुडोकू १७७ चे उत्तर

६	२	७	५	३	९	४	१	८
४	५	८	२	६	१	९	३	७
९	१	३	८	७	४	६	५	२
८	६	१	९	४	७	३	२	५
५	९	४	१	२	३	८	७	६
७	३	२	६	५	८	१	४	९
२	७	९	४	१	६	५	८	३
१	८	५	३	९	२	७	६	४
३	४	६	७	८	५	२	९	१

शब्दकोडे क्रमांक १७८



आडवे शब्द :-


१) परस्परांमधील देवघेव व्यापार
४) सुधा
६) अकस्मात
१०) आश्रय
११) माफी असावी
१२) बर्फाळ प्रदेशातील एक प्राणी
१४) मद्य
१६) पाताळातील एका मुख्य नागाचे नाव
१८) उत्कर्षाचा काळ
२१) पोळी भाजण्याचे पात्र
२३) अथवा, किंवा
२४) गव्हाचे जाडसर पीठ
२५) वजन, बोजा
२७) देवाची रथातून काढलेली मिरवणूक
२८) संगीतातील एक राग
३०) मिळालेले, प्राप्त
३१) संतापी
३३) अंत:करण
३४) पटल
३६) रक्ताचा रंग
३७) मध
३९) पुन्हा पुन्हा (हिं.)
४०) वेळ
४२) अग्नी, जाळ, दाह
४३) कवी
४६) वन, रान
४८) लिंबाच्या रसाचे पेय
५०) उंटाच्या पाठीवरील उंचवटा
५२) गणपती
५५) लोणी
५६) मयूर
५७) नातेवाईक
५९) आपला नसलेला, परकीय
६१) श्रीमंत
६३) खोडण्याचे साधन
६५) चार आठवड्याचा काळ
६६) शिव! शिव!
६८) खांदा, खांद्याचे हाड
६९) दोरा
७०) एकावर एक रचलेले
७२) वर्ष, साल
७३) तादाम्य
७५) भांडण
७६) शपथ
७७) मीठ
७८) ज्वारीची वाळलेली खुंटे
७९) समुद्रकिनारा

उभे शब्द :-

१) दु:ख
२) वरवधूची मिरवणूक
३) रक्षण करणारा
४) ओंगळ केसाळ मोठा प्राणी
५) सिद्ध
७) नोकर
८) न्यूनता, उणीव
९) दिमाख, ऐट
१३) मकबरा
१५) दिपक
१७) माफी मागणारा
१९) उपस्थित
२०) नगरपाल
२२) पाय
२६) पडदा
२८) गळ्यामागचा अवयव
२९) उपयोग
३२) पळून जाणे
३३) सहाय्य
३५) झाकणाचे पात्र
३५अ) गावाची हद्द
३७) सुसर
३८) रंगविलेले
३९) पोते
४१) घर
४२) आजूबाजूला
४४) कार्य
४५) बाहू
४७) नगरवासी
४९) हिम
५१) कोकणातील एक दैवत
५२) विधवा
५३) मेणा, पालखी
५४) लोणच्यातील द्रवमसाला
५८) थंडावा
५९) पंख
६०) मजुर, कारखान्यात काम करणारा
६२) पुरुष
६४) केसांची कपाळावर आलेली लट
६७) विरोध, प्रतिबंध
६८) मालाची विक्री
६९) सापाची एक जात
७१) गावाखालची जमीन
७२) क्वचित बहुधा
७३) सवय, राबता
७४) पाढ्यातील सहा
७६) वजन, बोजा

(उत्तर उद्याच्या अंकात)

मागील शब्दकोड्याचे उत्तर



समाधानातच आनंद!

माणसाचे जीवन अधिक सुंदर होण्यासाठी नेहमी मोठ्या यशाची, भरपूर संपत्तीची, प्रतिष्ठेची किंवा भौतिक सुखसुविधांची आवश्यकता असतेच असे नाही. अनेकदा आपल्या आसपास असणाऱ्या साध्या गोष्टींमध्येही आनंदाचे मोठे विश्व दडलेले असते. मात्र, त्या आनंदाचा अनुभव घेण्यासाठी मन शांत, विचार स्वच्छ आणि दृष्टिकोन सकारात्मक असणे आवश्यक असते. माणूस आयुष्यभर काहीतरी मिळविण्याच्या प्रयत्नात धावत असतो; परंतु या धावपळीत त्याच्या हातात आधीपासून असलेल्या आनंदाच्या क्षणांकडे त्याचे दुर्लक्ष होते. अधिक मिळविण्याच्या इच्छेपेक्षा जे मिळाले आहे त्याचे मोल समजून घेण्याची जाणीव निर्माण झाली, तर जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलू शकतो.



सुनील गवळी

आपल्या मनाची एक विशेष प्रवृत्ती असते. एखादी घटना घडली की आपण तिला त्वरित चांगले किंवा वाईट असे लेबल लावतो. एखाद्याने आपल्याशी अपेक्षेप्रमाणे वर्तन केले नाही, तर आपण त्याच्याविषयी नकारात्मक निष्कर्ष काढतो. एखादे काम मनासारखे झाले नाही, तर संपूर्ण दिवस निराशेत घालवतो. प्रत्यक्षात प्रत्येक घटनेमागे काही परिस्थिती, काही मर्यादा आणि काही अनपेक्षित कारणे असू शकतात. प्रत्येक गोष्टीचा त्वरित निर्णय देण्याऐवजी थोडे थांबून तिच्याकडे समजूतदारपणे पाहण्याची सवय लावली, तर मनावरील ताण कमी होतो. याचा अर्थ चुकीला योग्य ठरविणे किंवा अन्याय सहन करणे असा नाही. योग्य-अयोग्य यातील फरक ओळखत असतानाही प्रत्येक प्रसंगाला भावनिक प्रतिक्रिया न देता विवेकाने प्रतिसाद देणे, हीच मानसिक परिपक्वता आहे.

आपल्या अस्वस्थतेचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे मनाची सतत सुरू असलेली विचारप्रक्रिया. भूतकाळातील चुका, झालेला अपमान, अपूर्ण राहिलेल्या अपेक्षा आणि भविष्यकाळातील अनिश्चितता यांमध्ये मन सतत हेलकावे खात असते. जे घडून गेले ते बदलता येत नाही आणि जे अद्याप घडलेले नाही त्यावर पूर्ण नियंत्रण ठेवता येत नाही. मात्र, वर्तमान क्षणात आपण काय करू शकतो, याचा निर्णय नक्कीच घेऊ शकतो. म्हणूनच स्वतःला वारंवार वर्तमानात आणणे आवश्यक आहे. जेवताना जेवणाचा आनंद घेणे, संवाद साधताना समोरच्या व्यक्तीचे बोलणे लक्षपूर्वक ऐकणे, काम करताना त्या कामात पूर्णपणे सहभागी होणे आणि निसर्गाच्या सान्निध्यात असताना त्याचा अनुभव घेणे, या साध्या कृती मनाला स्थिरता देतात.

एकाच वेळी अनेक कामे करण्याचा प्रयत्न म्हणजे कार्यक्षमता नव्हे. उलट त्यामुळे लक्ष विचलित होते, कामाचा दर्जा कमी होतो आणि मानसिक थकवा वाढतो. एकावेळी एकच काम पूर्ण एकाग्रतेने करण्याची सवय माणसाला अधिक परिणामकारक बनवते. विद्यार्थ्यांनी अभ्यास करताना, शिक्षकांनी अध्यापन करताना, पालकांनी मुलांशी संवाद साधताना आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांनी निर्णय घेताना ही एकाग्रता महत्त्वाची आहे. काम किती केले यापेक्षा ते किती गुणवत्तापूर्ण केले, याला अधिक महत्त्व असते. मनाची ऊर्जा अनेक दिशांना विखुरण्याऐवजी योग्य ठिकाणी केंद्रित केली, तर साध्या प्रयत्नांतूनही मोठे परिणाम साधता येतात.

नातेसंबंधांच्या बाबतीतही साधेपणाचे तत्त्व तितकेच महत्त्वाचे आहे. आज संपर्काची साधने वाढली आहेत; परंतु मनापासून संवाद साधणारी माणसे कमी होत असल्याची जाणीव अनेकांना होते. शेकडो परिचित असण्यापेक्षा काही व्यक्तींशी विश्वासाचे, जिव्हाळ्याचे आणि प्रामाणिक नाते असणे अधिक मोलाचे आहे. एखाद्याला वेळ देणे, त्याचे म्हणणे न तोडता ऐकणे, त्याच्या अडचणी समजून घेणे आणि गरजेच्या वेळी त्याच्या पाठीशी उभे राहणे, या कृती नात्यांना अर्थ देतात. प्रत्येक भेट ही केवळ औपचारिकता न राहता एक मानवी अनुभव बनली पाहिजे. कारण माणसाच्या आयुष्यात काही भेटी पुन्हा घडतीलच याची खात्री नसते. म्हणून समोरच्या व्यक्तीला योग्य तो सन्मान आणि आपुलकी देण्याची संधी वर्तमानातच स्वीकारली पाहिजे.

मनातील लोभ, राग आणि अज्ञान या तीन प्रवृत्ती माणसाच्या विवेकावर पडदा टाकतात. लोभामुळे उपलब्ध असलेल्या गोष्टींचे समाधान वाटत नाही. रागामुळे विचार करण्याची क्षमता क्षीण होते आणि अज्ञानामुळे स्वतःच्या मर्यादा समजत नाहीत. या प्रवृत्तींवर मात करण्यासाठी स्वतःचे निरीक्षण करणे आवश्यक आहे. राग आला तर त्वरित प्रतिक्रिया देण्याऐवजी काही क्षण शांत राहणे, एखादी गोष्ट मिळाली नाही तर तिच्यामुळे स्वतःचे संपूर्ण आयुष्य अपयशी ठरले असे न मानणे आणि स्वतःला सर्व काही माहीत आहे असे समजण्याऐवजी शिकण्याची तयारी ठेवणे, ही आत्मविकासाची सुरुवात आहे. स्वतःवर विजय मिळविण्याची प्रक्रिया दुसऱ्याला हरविण्यापेक्षा अधिक महत्त्वाची आहे.

कृतज्ञता ही आनंदी जीवनाची अत्यंत प्रभावी मानसिक शक्ती आहे. आपल्याकडे काय नाही, याचा विचार करताना आपण अनेकदा आपल्याकडे काय आहे, हे विसरतो. कुटुंबातील माणसे, अन्न, आरोग्याची उपलब्धता, शिक्षणाची संधी, काम करण्याची क्षमता, निसर्गाचे सौंदर्य आणि एखाद्याने दिलेली छोटीशी मदत या सर्व गोष्टींचे महत्त्व आपण सहज विसरतो. दिवसाच्या शेवटी स्वतःला एक प्रश्न विचारावा, आज माझ्या आयुष्यात कोणत्या तीन गोष्टी चांगल्या घडल्या? या प्रश्नाचे उत्तर शोधताना मनात समाधानाची भावना निर्माण होऊ शकते. कृतज्ञता म्हणजे प्रयत्न सोडणे नव्हे, तर पुढील प्रयत्न करताना आतापर्यंत मिळालेल्या गोष्टींचे मूल्य जाणणे होय.

साधेपणा म्हणजे गरिबी, महत्त्वाकांक्षेचा अभाव किंवा प्रगतीपासून दूर राहणे नव्हे. साधेपणा म्हणजे जीवनातील अनावश्यक गुंतागुंत कमी करून महत्त्वाच्या गोष्टींना प्राधान्य देणे. किती वस्तू आपल्याजवळ आहेत यापेक्षा त्यांचा आपल्या जीवनात किती उपयोग आहे, किती लोक आपल्याला ओळखतात यापेक्षा किती लोक आपल्यावर विश्वास ठेवतात आणि आपण किती मोठे पद मिळविले यापेक्षा त्या पदावर असताना किती प्रामाणिकपणे काम केले, हे अधिक महत्त्वाचे आहे. बाह्य यशाबरोबरच अंतर्मनाची समृद्धी जपली गेली पाहिजे.

याच संदर्भात शांततेचा अर्थही समजून घेणे आवश्यक आहे. शांतता म्हणजे समस्या नसणे नव्हे, तर समस्या असतानाही विचार करण्याची क्षमता टिकवून ठेवणे. शांतता म्हणजे प्रत्येक गोष्ट सहन करणे नव्हे, तर कोणत्या वेळी बोलावे, कोणत्या वेळी थांबावे आणि कोणत्या वेळी ठाम भूमिका घ्यावी, याचे भान असणे. काही वेळा मौन हे दुर्बलतेचे लक्षण नसते; ते अनावश्यक वाद टाळण्याचे शहाणपण असते. त्याचप्रमाणे काही वेळा स्पष्टपणे बोलणे हीच जबाबदारी असते. म्हणूनच शांत मन आणि जागरूक विवेक यांची सांगड घालणे आवश्यक आहे.

या विचारांचा सर्वाधिक उपयोग आपल्या पुढील पिढीच्या जडणघडणीत होऊ शकतो. मुलांना केवळ स्पर्धा, गुण, क्रमांक आणि यश यांच्या मागे धावायला शिकविण्यापेक्षा स्वतःला समजून घेणे, अपयश स्वीकारणे, इतरांच्या भावनांचा आदर करणे, निसर्गाशी नाते जोडणे आणि स्वतःच्या कृतींची जबाबदारी घेणे शिकविले पाहिजे. मुलांच्या मनात शांतता, एकाग्रता, कृतज्ञता आणि संवेदनशीलता विकसित झाली, तर त्यांचे व्यक्तिमत्त्व केवळ बुद्धिमान नव्हे तर संतुलितही बनेल. शिक्षणाचे अंतिम उद्दिष्ट केवळ माहिती मिळविणे नसून समजूतदार, विवेकी आणि संवेदनशील माणूस घडविणे हे असले पाहिजे.

दिवसातून काही मिनिटे स्वतःसाठी राखून ठेवणे ही सुद्धा एक महत्त्वाची जीवनशैली होऊ शकते. शांतपणे बसणे, श्वासाकडे लक्ष देणे, दिवसभरातील कृतींचे निरीक्षण करणे, चुकांमधून शिकणे आणि उद्याच्या दिवसासाठी सकारात्मक संकल्प करणे यामुळे स्वतःशी संवाद साधण्याची संधी मिळते. प्रत्येक वेळी बाहेरच्या जगात उत्तरे शोधण्यापेक्षा काही प्रश्नांची उत्तरे आपल्या अंतर्मनातही शोधता आली पाहिजेत. आपण कशासाठी धावत आहोत, आपल्या जीवनात खरोखर महत्त्वाचे काय आहे आणि आपल्या उपस्थितीमुळे इतरांच्या जीवनात काय सकारात्मक बदल घडतो आहे, याचा विचार माणसाला अधिक अर्थपूर्ण जीवनाकडे घेऊन जातो.

शेवटी, जीवन सुंदर बनविण्यासाठी जग बदलण्यापूर्वी स्वतःचा दृष्टिकोन बदलण्याची तयारी आवश्यक असते. प्रत्येक दिवस परिपूर्ण असेलच असे नाही, प्रत्येक व्यक्ती आपल्या अपेक्षेप्रमाणे वागेलच असे नाही आणि प्रत्येक प्रयत्नाला यश मिळेलच असेही नाही. तरीही मनात आशा, कृतीत प्रामाणिकपणा, वर्तनात नम्रता आणि विचारांत स्पष्टता ठेवता येते. दुसऱ्याशी तुलना करण्याऐवजी स्वतःच्या कालच्या स्थितीपेक्षा आज अधिक समजूतदार होण्याचा प्रयत्न करता येतो. कारण खरे समाधान हे बाह्य परिस्थितीच्या पूर्ण नियंत्रणात नसून त्या परिस्थितीकडे आपण कशा प्रकारे पाहतो, यावरही अवलंबून असते.

आयुष्य मोठे करण्यापेक्षा ते अर्थपूर्ण करणे अधिक महत्त्वाचे आहे. मनात अनावश्यक विचारांचा गोंधळ कमी झाला, अपेक्षांचे ओझे हलके झाले, नात्यांमध्ये प्रामाणिकपणा वाढला आणि प्रत्येक क्षणाबद्दल कृतज्ञता निर्माण झाली, तर साधे जीवनही असामान्य आनंद देऊ शकते. माणसाने जग जिंकण्याच्या प्रयत्नात स्वतःचे मन हरवू नये; कारण जगाकडून मिळणारे यश क्षणिक असू शकते, परंतु स्वतःच्या अंतर्मनाशी निर्माण झालेले समाधान ही आयुष्यभराची खरी संपत्ती असते.

शांतता शोधण्यासाठी जगापासून दूर जाण्याची गरज नाही; तर जगात राहूनही स्वतःच्या मनाशी मैत्री करण्याची कला आत्मसात करावी लागते. **

'बाप' जोवनाचा आधारवड



काळजाच्या कप्प्यात जपलेला त्यागाचा हिमालय काही माणसे काळाच्या पडद्याआड जातात, पण त्यांच्या अस्तित्वाचा सुगंध आणि आठवणींची शिदोरी आयुष्यभर सोबत राहते. विशेषतः 'बाप' नावाचे आभाळ जेव्हा डोक्यावरून हरपते, तेव्हा त्याच्या कष्टांची आणि निःशब्द त्यागाची खरी किंमत लेकरांना उमगते. आईच्या वात्सल्यावर साहित्याची असंख्य पाने रंगली गेली; मात्र बापाच्या कठोर दिसणाऱ्या, पण आतून मेणाहून मऊ असलेल्या प्रेमाला शब्दांचे कोंदण फारसे लाभलेच नाही. आईच्या डोळ्यांत मायेचा झरा वाहतो, तर बापाच्या तळहातावरील घट्टे त्याच्या रक्ताचे पाणी केल्याची साक्ष देतात. स्वतः तळपत्या उन्हात उभा राहून लेकरांना सुखाची शीतल सावली देणारा आणि स्वतःच्या स्वप्नांना मूठमाती देऊन मुलांच्या पंखांना आकाश देणारा बाप, हा खऱ्या अर्थाने कुटुंबाच्या संसाररथाचा अदृश्य सारथी असतो!

माझ्या आयुष्यातील बापाची आठवण म्हणजे सुखदुःखांच्या असंख्य धाग्यांनी विणलेली एक भावस्पर्शी गाथा आहे. नव्वदच्या दशकातील ती गुलाबी थंडीची पहाट आजही डोळ्यांसमोर जसच्या तशी तरळते. अंगणात पारिजातकाच्या फुलांचा पडलेला सडा आणि पहाटे चार वाजता सोळाव्या वर्षी सायकलवरून शालेय जीवनातील सुरू होणारा माझा प्रवास! गोळवण ते गुरामवाडी ८ किलोमीटरची सायकल स्वारी आणि पुढे एस.टी. बसने गुरामवाडी ते मालवण असा २५ किलोमीटरचा खडतर प्रवास... आयुष्याची दिशा शोधण्यासाठी सुरू असलेल्या या धडपडीत, माझ्या पाठीवर कौतुकाची थाप देणारा माझा बाप मात्र नियतीने माझ्यापासून हिरावून घेतला होता.

धनंजय शेटये

घनदाट जंगलात उंचावर लाकडाचा माचा बांधून, महाकाय लाकडांचे चिरकाम करण्याची जीवघेणी मेहनत माझ्या बापाने केवळ आमच्या शिक्षणासाठी केली. मोलमजुरी केल्यावर स्वतःच्या हक्काचे मिळणारे जेवण आणि न्याहारीही न खाता, ती लेकरांसाठी घरी आणणारा माझा बाप म्हणजे त्यागाचा अखंड वाहणारा जिवंत झरा होता. दुपारच्या विश्रांतीत तीन किलोमीटरची तंगडतोड करत घरी यायचे, लेकरांच्या मुखात प्रेमाचा घास भरवायचा आणि पुन्हा कामावर धावत जायचे... स्वतः उपाशी राहून मुलांचे पोट भरणाऱ्या त्या हातांची श्रीमंती जगातील कोणत्याही कुबेराच्या संपत्तीपेक्षा कैक पटीने मोठी होती.

पण नियतीला आमचे हे सुख फार काळ पाहवले नाही. मूत्रपिंडाच्या दुर्धर विकाराने वयाच्या अवघ्या ४८ व्या वर्षी माझ्या बापाला आमच्यातून हिरावून नेले. तो काळ माझ्या आयुष्यातील सर्वात मोठा कसोटीचा होता. दहावीच्या बोर्डाची परीक्षा सुरू होती; हातात लेखणी होती, पण माझे मन मात्र के.ई.एम. रुग्णालयातील वॉर्ड क्रमांक १२ मध्ये अडकले होते. कृत्रिम श्वासावर सुरू असलेली बापाची ती प्राणज्योत आणि आयसीयूच्या काचेपलिकडून त्यांच्याकडे पाहणारी माझी हतबल, केविलवाणी नजर... तो प्रसंग आठवला की आजही काळीज चिरल्यासारखे होते. त्या कोवळ्या वयात मृत्यूचा नेमका अर्थ कळला नव्हता, पण बाप हरवण्याची जी पोकळी निर्माण झाली, ती मात्र जन्मभराची झाली.

कधीकाळी अठरा विश्वे दारिद्र्यामुळे आणि परिस्थितीच्या हतबलतेमुळे मी बापावर रागावलो होतो. आज त्या क्षणांची आठवण झाली की पश्चात्तापाच्या अश्रूंनी डोळे भरून येतात. बापाने आपल्या तुटपुंज्या परिस्थितीत आमच्यासाठी जे काही केले, त्याची जाणीव त्यांच्या जाण्यानंतर झाली. खरंच, बाप जिवंत असेपर्यंत त्याच्या कष्टांची खोली आपल्याला कळत नाही; पण ते छत्र हरवल्यावर आयुष्याच्या प्रत्येक वळणावर त्यांची उणीव प्रकर्षाने जाणवते. त्यांची शिस्त, संस्कार आणि विचारांची श्रीमंतीही विलक्षण होती. नववीत बीजगणिताचे कमी गुण लपवल्यामुळे त्यांच्या हातून बसलेली ती चपराक आजही माझ्या गालावर आणि मनावर कोरलेली आहे. ती शिक्षा नव्हती, तर माझ्या उज्ज्वल भविष्याची काळजी करणाऱ्या बापाच्या मनातील प्रेमाची ती एक कठोर अभिव्यक्ती होती. संपूर्ण वाडीतील लोकांची आंतरदेशीय पत्रे लिहून देणारे त्यांचे मोत्यांसारखे सुंदर हस्ताक्षर आणि प्रगल्भ लेखनशैली यांचा वारसा मला त्यांच्याकडूनच लाभला. गरिबीच्या शृंखलांनी त्यांच्या बुद्धिमत्तेला मर्यादा घातल्या; अन्यथा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे तेज निश्चितच एका मोठ्या क्षितिजावर तळपले असते.

खाकी हाफ पॅन्ट, साधा हाफ शर्ट आणि खांद्यावरचा एक मळकट टॉवेलएवढाच काय तो त्यांच्या साधेपणाचा संसार! स्वतःच्या सुखाचा विचार न करता कुटुंबासाठी चंदनासारखे झिजणाऱ्या त्या देवमाणसाने आम्हाला केवळ जन्म दिला नाही, तर आयुष्याच्या वाटेवरच्या काट्याकुट्यांतून चालण्याचे बळ दिले.

आजही जेव्हा मी मध्यरात्री तीन वाजता उठून डोंबिवलीहून पहिली लोकल पकडतो आणि तब्बल ३४ स्थानकांचा प्रवास करतो, तेव्हा शरीर थकते, पावले दमून जातात; पण मनाला एकच अमोघ प्रेरणा मिळते ''माझ्या बापाने आयुष्यभर केलेल्या रक्ताच्या पाण्यापुढे माझे हे कष्ट काहीच नाहीत!''

आज बाप सोबत नाही, त्यांचा तो मायाळू स्पर्श नाही, पाठीवर कौतुकाची थाप नाही; पण त्यांच्या आठवणींचा महाकाय वटवृक्ष माझ्या मनात आजही तितक्याच दिमाखात उभा आहे. त्याच वटवृक्षाच्या सावलीत माझ्या जगण्याला खरा अर्थ मिळतो आणि संकटांच्या वादळाशी लढण्याचे सामर्थ्यही! बाप म्हणजे केवळ रक्ताचे नाते नसते; तो लेकरांच्या स्वप्नांसाठी स्वतःची राख करून प्रकाश देणारा आयुष्यभराचा नंदादीप असतो. त्याचे प्रेम कधीही शब्दांत व्यक्त होत नाही, कारण ते त्याच्या घामाच्या प्रत्येक थेंबात, कष्टाच्या प्रत्येक जखमेत आणि निःशब्द त्यागाच्या प्रत्येक क्षणात दडलेले असते. अनमोल आठवणींचे ऋण या जन्मी तरी फेडणे अशक्य असते. आभाळाएवढे प्रेम करणारा बाप हरवला की माणूस जगासाठी मोठा होतो; पण मनाच्या एका कोपऱ्यात मात्र तो कायमचा पोरका राहतो! ●



समुद्राचे पाणी, मनुष्यासाठी जलसंजीवनी?

श्री.अनिकेत शेटे

महाराष्ट्रात आज अनेक भागांना पाणीटंचाईच्या संकटाचा सामना करावा लागत आहे. मोठ्या शहरांपासून छोट्या गावांपर्यंत पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनत आहे. धरणांमधील पाणीसाठ्यात होणारी घट, पावसाचे अनिश्चित स्वरूप आणि भूजलपातळीत होणारी घसरण यामुळे भविष्यातील जलसुरक्षेचा प्रश्न अधिकच गंभीर बनला आहे. अशा परिस्थितीत पारंपरिक जलस्रोतांबरोबरच पाण्याचे नवे पर्यायी स्रोत शोधण्याची गरज निर्माण झाली आहे.

याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सरकारने इस्रायलच्या धर्तीवर समुद्राच्या खाऱ्या पाण्याचे गोड्या पाण्यात रूपांतर करणारे प्रकल्प कोकण किनारपट्टीवर उभारण्याचा गांभीर्याने विचार करायला हवा.

इस्रायलसारख्या पाणीटंचाईग्रस्त देशाने आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने समुद्राच्या पाण्याचा मोठ्या प्रमाणावर वापर करून जलसुरक्षेच्या क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती केली आहे. भारतातही चेन्नईसारख्या शहरांमध्ये हे तंत्रज्ञान यशस्वीपणे वापरले जात आहे. महाराष्ट्रात मुंबईतील मनोरी येथे दररोज २०० दशलक्ष लिटर पाणी तयार करण्याची क्षमता असलेला प्रकल्प उभारला जात आहे. म्हणजेच हे तंत्रज्ञान आपल्यासाठी नवीन किंवा केवळ प्रायोगिक स्वरूपाचे राहिलेले नाही.

मग रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड आणि पालघर या किनारपट्टीच्या जिल्ह्यांमध्ये स्थानिक गरजेनुसार असे प्रकल्प का उभारू नयेत? मोठ्या शहरांसाठी मोठ्या क्षमतेचे, तर पाणीटंचाईचा सामना करणाऱ्या गावांसाठी कमी क्षमतेचे सामायिक प्रकल्प उभारता येऊ शकतात. सुरुवातीला काही निवडक गावांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर असे प्रकल्प सुरू करून त्यांची उपयुक्तता तपासता येईल.

अर्थात, अशा प्रकल्पांसाठी मोठी प्रारंभिक गुंतवणूक, विजेचा खर्च, देखभाल आणि समुद्रात सोडल्या जाणाऱ्या अतिक्षारयुक्त पाण्याचे पर्यावरणपूरक व्यवस्थापन ही आव्हाने आहेत. त्यामुळे सौरऊर्जेचा वापर, आधुनिक आणि पर्यावरणीय निकषांचे काटेकोर पालन यांना प्राधान्य द्यावे लागेल. लोकसंख्या, पाण्याची गरज आणि आर्थिक व्यवहार्यता लक्षात घेऊनच प्रकल्पांसाठी योग्य ठिकाणांची निवड करणे आवश्यक आहे.

समुद्राच्या पाण्याचे शुद्धीकरण हा महाराष्ट्राच्या जलसंकटावरील एकमेव उपाय नक्कीच नाही; मात्र पावसाचे पाणी साठवणे, जलसंधारण, भूजल पुनर्भरण आणि सांडपाण्याचा पुनर्वापर या उपायांना पूरक असा हा एक महत्त्वाचा पर्यायी जलस्रोत ठरू शकतो.

मात्र मूळ समस्येकडे दुर्लक्ष करून चालणार नाही!

आज निर्माण झालेल्या जलसंकटाला केवळ 'अल निनो' हे एकमेव कारण नाही. त्यामागे अनेक नैसर्गिक चक्रांमध्ये आवाजवी मानवी हस्तक्षेप आणि पाण्याच्या वापराबाबतची अनास्थाही तितकीच जबाबदार आहे. वाढत्या पाणीऊपशामुळे अनेक भागांतील भूजल-पातळी खालावली आहे. ठराविक नगदी पिकांसाठी मोठ्या प्रमाणात पाण्याचा वापर केला जातो. पाण्याचा अपव्यय आणि योग्य नियोजनाचा अभाव यामुळे उपलब्ध जलसंपत्तीवर अतिरिक्त ताण निर्माण झाला आहे.

नद्या, नाले आणि इतर नैसर्गिक जलस्रोत प्रदूषित केले जात आहेत. त्यांच्या प्रवाहात अडथळे निर्माण केले जात आहेत. बेसुमार वृक्षतोड आणि पावसाचे पाणी जमिनीत मुरवण्याकडे झालेले दुर्लक्ष यामुळे भूजल पुनर्भरणाची नैसर्गिक प्रक्रिया बाधित झाली आहे. परिणामी धरणांवर आणि कृत्रिम जलसाठ्यांवर आपले अवलंबित्व वाढत गेले. पावसाच्या अनियमिततेबरोबरच या सर्व घटकांचा एकत्रित परिणाम आजच्या जलसंकटात दिसून येत आहे.

अशा परिस्थितीत समुद्राचे खारे पाणी गोडे करण्याचा पर्याय स्वीकारणे म्हणजे चुकीच्या जलव्यवस्थापनातून निर्माण झालेल्या समस्येवर तंत्रज्ञानाच्या मदतीने तोडगा शोधण्यासारखे आहे. त्यामुळे या तंत्रज्ञानाकडे अंतिम उपाय म्हणून नव्हे, तर वाढत्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर आवश्यक ठरू शकणारा पूरक पर्याय म्हणून पाहिले पाहिजे.खरा आणि दीर्घकालीन उपाय निसर्गाने आपल्याला दिलेल्या गोड्या पाण्याच्या स्रोतांचे संवर्धन करण्यातच आहे. पावसाचे पाणी शक्य तितके जमिनीत मुरवणे, नद्या आणि नैसर्गिक जलस्रोत स्वच्छ व प्रवाही ठेवणे, पाण्याचा काटकसरीने वापर करणे, पाण्याच्या उपलब्धतेनुसार पीकपद्धतीत बदल करणे आणि मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड करून त्यांचे संगोपन करणे या गोष्टींना प्राधान्य द्यावे लागेल.

कारण समुद्राचे पाणी गोडे करण्यासाठी तंत्रज्ञान विकसित करता येईल; पण पावसाचे नैसर्गिक चक्र, जमिनीची पाणी साठवण्याची क्षमता आणि निसर्गाचे संतुलन यांची जागा कोणतेही तंत्रज्ञान घेऊ शकत नाही.

पाणी उपलब्ध झाले तरी त्याची किंमत विसरता कामा नये!

समजा, भविष्यात समुद्राच्या खाऱ्या पाण्याचे मोठ्या प्रमाणावर गोड्या पाण्यात रूपांतर करणे शक्य झाले आणि ते राज्यातील विविध भागांपर्यंत पोहोचवण्याची यंत्रणाही उभी राहिली, तरी एक महत्त्वाचा प्रश्न उरतोच. एवढे प्रयत्न आणि मोठा खर्च करून उपलब्ध झालेले पाणी आपण जबाबदारीने वापरणार आहोत का?

पाणी मुबलक प्रमाणात उपलब्ध होऊ लागले की त्याची किंमत कमी होण्याची आणि पुन्हा मनमानी वापर सुरू होण्याची शक्यता नाकारता येत नाही. आज ज्या चुकीच्या सवयींमुळे नैसर्गिक जलस्रोतांवर संकट ओढवले आहे, त्याच सवयी नव्या तंत्रज्ञानामुळे मिळणाऱ्या पाण्याच्या बाबतीतही कायम राहिल्या, तर या प्रयत्नांचा अपेक्षित फायदा होणार नाही.

शेवटी, निसर्गाने आपल्याला पावसाच्या रूपाने गोडे पाणी, तसेच नद्या, तलाव, विहिरी आणि भूजलाचे अमूल्य स्रोत दिले आहेत. मात्र त्यांचे संवर्धन करण्यात आपण कमी पडलो आणि आता समुद्राच्या खाऱ्या पाण्यावर प्रक्रिया करून पाणी मिळवण्याची वेळ आपल्यावर येत आहे. त्यामुळे समुद्रजल शुद्धीकरणातून मिळणारे पाणी म्हणजे अमर्याद वापर करण्याचा परवाना नव्हे. ते मिळवण्यासाठी लागणारे तंत्रज्ञान, ऊर्जा, पैसा आणि श्रम लक्षात घेता त्याचा वापर अधिक जबाबदारीने व्हायला हवा.

समुद्राकडून पाणी मिळवण्याची वेळ आपल्यावर येऊ नये, अशी काळजी घेणे हा पहिला प्रयत्न असावा; आणि अशी वेळ आलीच, तर मिळालेल्या प्रत्येक थेंबाची किंमत ओळखणे ही आपली जबाबदारी असावी!

कारण पाण्याचा स्रोत बदलला म्हणून पाण्याबाबतची आपली मानसिकता बदलली नाही, तर कोणतेही तंत्रज्ञान आपल्याला जलसंकटातून कायमस्वरूपी बाहेर काढू शकणार नाही! ●

विठ्ठलाच्या विटेवरून माणुसकीचा प्रवास!



पंडित भीमसेन जोशी यांच्या स्वरातून उमटणारा 'माझा भावे तुझे चरणी' हा भक्तिभाव मनाला अंतर्मुख करतो. कार्तिकी एकादशीला लाखो वारकरी विठुरायाच्या दर्शनासाठी पंढरपूरला पोहोचतात. कुणी सुख-समृद्धीसाठी, कुणी पावसासाठी, तर कुणी कुटुंबाच्या कल्याणासाठी विठ्ठलाकडे साकडे घालतो. मात्र, या श्रद्धेच्या प्रवासात आपण एक प्रश्न स्वतःला विचारायला हवा. ज्या विठ्ठलाच्या चरणी आपण नतमस्तक होतो, त्याच्या शिकवणीतील माणुसकी आपल्या आचरणात किती उतरते?

विजयकुमार कट्टी

पंढरपूरच्या विठ्ठलमूर्तीचे वैशिष्ट्य म्हणजे कमरेवर हात ठेवून विटेवर उभे असलेले रूप. वारकरी परंपरेतील पुंडलिकाच्या कथेनुसार, आई-वडिलांच्या सेवेत मग्न असताना भगवान श्रीकृष्ण भेटायला आले. पुंडलिकाने सेवा अर्धवट न सोडता देवाला उभे राहण्यासाठी वीट दिली. भक्ताच्या सेवाभावाने प्रसन्न होऊन देव त्या विटेवर उभे राहिले, अशी श्रद्धा आहे. या कथेतून मिळणारा संदेश महत्त्वाचा आहे. कर्तव्य पार पाडणे हीदेखील भक्तीच आहे. देवाच्या दर्शनासाठी आपली जबाबदारी सोडण्याची गरज नाही; उलट आपल्या कर्तव्यामध्येच ईश्वरसेवेचा अनुभव घेता येतो.

महाराष्ट्राच्या संतपरंपरेने या विचाराला व्यापक रूप दिले. संत ज्ञानेश्वरांनी सर्व जीवांतील चैतन्याचा विचार मांडला. संत जनाबाईंनी दैनंदिन श्रमांत विठ्ठलाचा सहवास अनुभवला. संत चोखामेळ्यांच्या जीवनातून सामाजिक विषमतेविरुद्धचा प्रश्न अधोरेखित झाला, तर संत तुकारामांनी दया, परोपकार आणि अंतःकरणाच्या शुद्धतेचे महत्त्व सांगितले. या परंपरेचा गाभा समता, सेवा आणि करुणा हा आहे. वारीकडे पाहिले तरी सामूहिक जीवनाचे सुंदर उदाहरण दिसते. दिंडीतील शिस्त, एकमेकांना दिलेली साथ, प्रसादाचे वाटप आणि टाळ-मृदंगाच्या तालातील एकसुरता यातून सहकार्य आणि सामूहिक जबाबदारीची शिकवण मिळते. वारी पंढरपुरात संपते; पण तिच्यातून मिळालेली मूल्ये आपल्या दैनंदिन जीवनात पुढे चालू राहायला हवीत. आपल्या संस्कृतीत 'वसुधैव कुटुम्बकम' आणि 'सर्वे भवन्तु सुखिनः' यांसारख्या विचारांतून व्यापक कल्याणाची भावना व्यक्त झाली आहे. तुळशीचे पूजन, वृक्षांशी जोडलेल्या परंपरा, गोवर्धन पूजा, नदीपूजन आणि अन्नदान यांतून निसर्ग, पशुपक्षी, जलस्रोत आणि समाज यांच्याशी असलेले आपले नाते अधोरेखित होते. श्रद्धा तेव्हाच अर्थपूर्ण ठरते, जेव्हा ती निसर्गाचे संरक्षण आणि सर्व जीवांप्रती संवेदनशीलता निर्माण करते. याच दृष्टिकोनातून आपल्या रोजच्या सवयींकडे पाहण्याची गरज आहे. वापरून झालेली पुस्तके, कपडे किंवा घरातील वस्तू आपण सहजपणे कचरा समजतो. मात्र, एखादे जुने पुस्तक दुसऱ्या मुलाच्या ज्ञानाचा स्रोत होऊ शकते; वापरलेल्या वस्तूंची दुरुस्ती किंवा पुनर्वापर शक्य असतो. वस्तू फेकण्यापूर्वी तिचा दुसऱ्याला उपयोग होऊ शकतो का, हा विचार करणे म्हणजे संसाधनांचा आदर करणे.

हीच संवेदनशीलता माणसांबाबतही आवश्यक आहे. वय वाढले म्हणून ज्येष्ठ नागरिकांचे महत्त्व कमी होत नाही. त्यांचे अनुभव, आठवणी आणि कौशल्ये ही समाजाची मौल्यवान संपत्ती आहे. जुन्या पुस्तकांना नवे वाचक मिळावेत, त्याचप्रमाणे ज्येष्ठांच्या अनुभवांना नव्या पिढीचे श्रोते मिळायला हवेत. अशा संवादातून पिढ्यांमधील नाते अधिक दृढ होऊ शकते. कार्तिकी एकादशीला आपण विठ्ठलाकडे पावसासाठी साकडे घालतो; पण पाण्याचा प्रत्येक थेंब जपतो का? समृद्धी मागतो; पण संसाधनांचा अपव्यय टाळतो का? कुटुंबाच्या कल्याणासाठी प्रार्थना करतो; पण घरातील ज्येष्ठांना वेळ देतो का? सर्वांच्या सुखासाठी प्रार्थना करतो; पण आपल्या परिसरातील झाडे, पक्षी आणि प्राणिमात्रांच्या अस्तित्वाचा आदर करतो का? यंदाच्या कार्तिकी एकादशीला विठुरायाकडे केवळ आपल्या इच्छा पूर्ण होण्याची प्रार्थना न करता, आपल्याला अधिक संवेदनशील, कर्तव्यदक्ष आणि सहृदय बनवण्याचे साकडे घालूया. देवाच्या चरणी भाव अर्पण करूया; पण त्या भावाचे रूपांतर आपल्या कृतीतून माणुसकीत करूया. कारण वारी संपली तरी माणुसकीची वारी कधीच संपता कामा नये! ●

कोकणच्या पार्श्वभूमीवरील....

निसरड

निसरड, या उषा परब लिखित, सात कथांच्या संग्रहाला ज्येष्ठ साहित्यिक मधु मंगेश कर्णिक, यांची 'लक्षवेधक कथा' या शीर्षकाची प्रस्तावना लाभली आहे. कोकण मराठी साहित्य परिषदेच्या कार्यामुळे उषा परब यांच्यासारख्या विविध प्रकारचे साहित्य लिहिणाऱ्या लेखिकेला वाटचाल करता आली. ''त्यांच्या मते, साहित्यकाराला समाजाशी समांतर चालावं लागतं. समाजाची सुखदुःख, स्पंदनं संवेदनापूर्वक न्याहाळावी लागतात. ही न्याहाळणी करताना, अनुभवही त्याच्याशी जोडावे लागतात. तरच सकस निर्मितीचं बीज त्यांच्या मनोभूमीमध्ये पडतं. त्यातून येणारं साहित्याचे पीकही सकस निघतं. समक्ष अनुभव, परोक्ष अनुभूती आणि प्रतिभाविष्कार म्हणजेच प्रत्ययकारी साहित्य! असं साहित्य लिहिण्याची क्षमता उषा परब यांच्या कथांमध्ये दिसते. उषा परब यांनी 'मनोगत' मांडले आहे. निसरड म्हणजे शेवाळलेली, गुळगुळीत चिखलाची जागा. समर्पक, रंगीत मुखपृष्ठ संतोष घोंगडे यांचे आहे.



नैवेद्याचं पान, या पहिल्या कथेत भीक मागणाऱ्या मुकीचे जीवनदर्शन होते. गावातील नदीच्या पुलावर ती गाडीवाल्यांकडे याचना करत, काही मिळते का पाहते. दुपारी पुलावरून खाली, तिला काही म्हशी नदीत डुंबताना दिसतात. तिलाही आंघोळ करावीशी वाटते, नदीच्या पात्रातून बाहेर येताना, तिच्या ढोपराला जखम होते. रस्त्याला लागून नारळ, केळींच्या बाजूला, एका शेडमध्ये ती सावलीसाठी बसते. ते एक स्मारक असते. तिथला कचरा साफ करून, झाडाचा पाला जखमेवर लावून तिथेच आडवी होते. बागेच्या गेटमधून म्हातारा बाबूगडी बाहेर येतो. सोमवारी मालकाच्या आदेशानुसार स्मारक स्वच्छ करून दिवा लावतो. दरवर्षी आईच्या पुण्यतिथीला मालक येतो. मुकीला पाहून त्याच्या मनात दया निर्माण होते. बाबू तिला बागेत आसरा देतो. बागेचा रंगेल मालक येतो. मुकीला पाहून, त्याची कामवासना जागी होते. तो तिच्यावर बलात्कार करतो. नंतर बाबू येऊन म्हणतो, आईच्या पुण्यतिथी दिनी भिकाऱ्याच्या रूपात आई आली असावी. हे ऐकून मालकाचा मूड जातो. आईच्या स्मारकावर फुले न वाहताच तो दुचाकीवरून निघून जातो. क्रियाकर्म, या कथेतील खांडकर आपल्या पत्नीसाठी शिरा करून, मनोरुग्णालयात जातात. परंतु पत्नीचा प्रतिसाद त्यांच्या बोलण्याला मिळत नाही. अधूनमधून त्या दोघांच्या चौकशीसाठी, बहीण, द्वारका गावावरून येते. खांडकर एका निमशहरी गावात, मोठ्या घरात आनंदाने पत्नीसह राहत असतात. मुलगा सुरेंद्रच्या नावावर, त्यांनी हे घर केलेले असते. सुरेंद्र आपल्या पत्नीसह बंगलोरला राहत असल्याने आणि अधूनमधून घरी येत असल्याने सर्वकाही मजेत होते. एकदा सुरेंद्र गावाला आलेला असताना, आई-बाबांना म्हणतो, आपण घरात सुधारणा करू. त्यांना दूरवर एका चाळीमध्ये, अंधारी, गैरसोयीची छोटी जागा घेऊन देतो. दीर्घकाळ गेल्यावरही सुरेंद्र दुरुस्ती झाल्याचे कळवत नसल्याने, खांडकर पत्नीसह आपल्या घरी गेले, तेव्हा ते घर सुरेंद्रने दुसऱ्याला विकल्याचे समजते. हा मानसिक धक्का न पेलल्याने सुनंदाबाई आजारी पडतात. त्यांना मनोरुग्णालयात दाखल करावे लागते. जाब विचारण्यासाठी खांडकर बंगलोरला जातात, तेव्हा त्यांच्या मुलाने, तेथील ब्लॉक विकून, मोठा ब्लॉक घेतल्याचे समजते. सुरेंद्रने आपल्या आई-वडिलांचे त्यांच्या हयातीतच 'क्रियाकर्म' केल्याचे जाणवते. माणूस मम्मी, या कथेत चिनू आपल्या काकूकडे दीर्घकाळानंतर, बदललेल्या परिस्थितीत आली आहे. तिचे बाबा अपघातात गेल्यामुळे, तिच्या आईने दुसरे लग्न केले आहे. नवीन घरात मोठा भाऊ आहे. मात्र नव्या बाबांशी ती एकरूप झालेली नाही. त्यामुळे तिच्या बदललेल्या मनोवृत्तीचा काकूंना अंदाज येतो. काकूंचे पती आणि मुलगा बाहेरगावी असल्यामुळे, काकू सर्व वेळ चिनूसाठी देतात. तिचा मूड बदलण्याचा प्रयत्न करीत आहेत.पाळलेल्या कुत्रीला चार पिल्ले झाली आहेत. मात्र कुत्री गायब झाल्यामुळे, चार पिल्लांच्या काळजीमुळे चिनू कासावीस झाली आहे. हॅलो मी बोलतेय, या कथेतील सुजाताचे उशिरा लग्न झाले आहे. पतीसह ती आपल्या आईकडेच राहत आहे. तिला सासरी जायचे आहे. परंतु आई तिला जाऊ देत नाही, कारण तिला तिची काळजी वाटते. याबाबत ती उमाशी वारंवार फोनवर बोलून तिचा सल्ला व मदत घेते. सुजाता सासरी गेल्यानंतर सुजाताची आई अस्वस्थ होते, आत्महत्या करते.

सिंधुदुर्ग जिल्ह्यात शासनाने पर्यटनाला प्राधान्य दिल्याने, गेल्या काही वर्षात, तेथे पर्यटन व्यवसाय बहरला. यामधूनच 'क्रोकोडाइल्स पॉइंट' ही कथा साकारली. नदीकाठी राहणाऱ्या हुशार भास्करने, मुलांच्या मदतीने, वेगळाच लाभदायक व्यवसाय सुरू केला. त्याने शीळ घातली की, शेजारच्या नदीतल्या सुसरी मोठ्या संख्येने येऊन घिरट्या मारतात. जिवंत कोंबड्या फस्त करता येत असल्याने त्या खुश, श्रीमंत पर्यटक खुश आणि या करमणुकीतून मोठ्या रकमेचे बिल दिवसभरात वसूल झाल्याने भास्करही खुश! 'हकडेन आड तकडेन विहीर' या कथेतील, दूर गावी राहणाऱ्या विधवा रत्नाक्काला, तिचा धाकटा भाऊ शाम्या नवीन फटफटी दाखवायला येतो. मोठ्या बहिणीला अगत्याने, फटफटीवरून काही दिवस माहेरी घेऊन जातो. रत्नाक्काला मुलाशी, सुनेशी फारसे बोलता येत नाही. तिला माहेरी कशाला बोलावले याचा अंदाज नसतो. कारण आई गेल्यानंतर तिचे माहेर बंद झाले होते. भावजयी आणि वडील तिचे कौतुक करतात. गोडधोडाचे जेवण होते. रात्री कातळावरची पिढीजात जागा सरकार विमानतळासाठी विकत घेत असल्यामुळे आणि तू लग्न होऊन सासरी गेल्यामुळे आपला हक्क सोडून दे, असे तिला रात्री गप्पा मारताना सांगून, तिचा अंगठा कागदपत्रांवर घेतला जातो. नंतर आपल्याला फसवले गेल्याची जाणीव तिच्या मैत्रिणींशी बोलताना तिला येते. घरी गेल्यावर मुलाला हे कळल्यावर तो आईला यथेच्छ बोलतो. माहेर-सासरकडून विधवा रत्नाक्काची फरपट होते. भारतात स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी विविध कायदे होऊनही, त्यांची अंमलबजावणी होत नसल्याने विधवा, निरक्षर स्त्रियांचे होणारे शोषण या कथेतून प्रकटते. थीम, या कथेतील पुरुषपात्रविरहित नाटक बसवताना, जमलेल्या समवयस्क मैत्रिणींचे विविध अनुभव मांडले आहेत. नाटकातल्या गमतीजमती एकमेकींना सांगतात आणि आनंद घेत, जेवण करतात. नाटकाची तालीम होतानाच तेथे एक वेगळेच नाट्य घडून येते.

उषा परब यांनी लिहिलेल्या या सात कथा, एका कथेचा अपवाद वगळता, दीर्घ आहेत. अनेक नाट्यपूर्ण प्रसंग कथांमध्ये समाविष्ट आहेत. त्यामुळे कथा वाचनीय, दीर्घकाळ लक्षात राहणाऱ्या आहेत. कथांना लेखिकेच्या जिल्ह्याची उत्तम पार्श्वभूमी लाभली आहे. या कथा सर्वच स्त्रियांच्या विविध समस्यांची प्रखर जाणीव करून देतात. मात्र काही कथांतील मैत्रिणींचे मोबाईलवरील संभाषण, वाचणे काहीसे कंटाळवाणे होते. ''निसरड'' जशी निसर्गात असते, तशीच मानवी जीवनातही असते. त्यामुळे सर्वांनीच जपून पाऊल टाकणे गरजेचे! ●

पुस्तक परीक्षण
प्रा. शाम जोगळेकर
मो. ९२७३३४३१७७

पुस्तकाचे नाव : निसरड
लेखिका : प्रा.उषा परब, सावंतवाडी
९४२३८७८८२८
प्रकाशक: डिंपल पब्लिकेशन, वसई.
प्रथमावृत्ती : एप्रिल २०२६
पृष्ठे १६८.
मूल्य रु.२८०/-

भन्नाट प्रश्न, वैज्ञानिक उत्तरे

आपल्याला जांभई का येते?

त्यादिवशी सचिन आणि मनिषा 'ज्ञानदीप'मध्ये आले, तेव्हा समाधानकाका आरामखुर्चीत पुस्तक वाचत होते. उत्तराकाकी टेबलावर काही कागदपत्रं पाहत होत्या.

''काका, आज एक भन्नाट''

सचिनचं वाक्य पूर्ण होण्याआधीच समाधानकाकांनी तोंड मोठ्ठं उघडलं, ''आऽऽऽऽ...!'' एक भली मोठी जांभई दिली.

मनिषा हसत म्हणाली, ''काका, आम्ही आल्याचा एवढा कंटाळा आला का?''

''अजिबात नाही!'' समाधानकाका म्हणाले.

तेवढ्यात सचिननेही तोंड उघडलं.

''आऽऽऽऽ...!''

आता सगळेच हसले.

''हाच तर माझा आजचा प्रश्न आहे!'' सचिन म्हणाला. ''काकांना जांभई आली आणि लगेच मलाही आली. एकाला जांभई आली की दुसऱ्यालाही का येते?''

''त्याचं उत्तर शोधण्याआधी,'' मनिषा म्हणाली, ''जांभई मुळात येतेच कशासाठी?''


''अगदी योग्य प्रश्न. जांभई म्हणजे आपण नकळत तोंड मोठं उघडतो, खोल श्वास घेतो, जबड्याचे आणि चेहऱ्याचे काही स्नायू ताणले जातात आणि नंतर श्वास सोडतो. हा काही सेकंदांचा अनैच्छिक क्रियाक्रम आहे,'' उत्तराकाकी म्हणाल्या.

''पण तो का होतो?''

''त्याचं एकच, पूर्णपणे निश्चित उत्तर विज्ञानाकडे अजून नाही. जांभईचा संबंध झोप आणि जागेपणाच्या अवस्थांमधील बदलांशी दिसतो. झोप येताना जांभई येते; पण सकाळी उठल्यावरही येऊ शकते. कंटाळा, थकवा किंवा दीर्घकाळ एकसारखी क्रिया करतानाही ती येऊ शकते.''

''म्हणजे जांभई आली की झोप आली, असं समजायचं?''

''नेहमीच नाही. जांभई झोप येत असल्याची खूण असू शकते. पण 'जांभई आली म्हणजे आता झोप येणारच' असा नियम नाही. शरीर एका अवस्थेतून दुसऱ्या अवस्थेत जात असतानाही जांभई येऊ शकते. त्यामुळे तिचा संबंध जागरूकतेच्या अवस्थेतील बदलांशीही आहे.''



विद्यालंकार घारपूरे

सचिन म्हणाला, ''शरीरात ऑक्सिजन कमी झाला की जास्त हवा आत घेण्यासाठी जांभई येते, असं मी ऐकलंय.''

''तो जुना आणि लोकप्रिय समज आहे,'' समाधानकाका म्हणाले.

''म्हणजे चुकीचा?''

उत्तराकाकी म्हणाल्या, ''प्रयोगांनी या गृहितकाला भक्कम आधार दिलेला नाही. श्वासातून मिळणाऱ्या ऑक्सिजनचं प्रमाण बदललं किंवा कार्बन डायऑक्साइडचं प्रमाण वाढवलं तरी जांभईचं प्रमाण अपेक्षेप्रमाणे बदलत नाही. त्यामुळे हे स्पष्टीकरण अपुरं आहे.''

मनिषाने विचारलं, ''मग जांभईचा उपयोग काय?''

''त्याबद्दल संशोधन सुरू आहे. काही संशोधकांच्या मते ती मेंदूच्या जागरूकतेच्या अवस्थेतील बदलांशी संबंधित असावी. मेंदूच्या तापमाननियमनाशी तिचा संबंध असावा, अशीही कल्पना आहे. पण ती अंतिम कारणमीमांसा नाही.''

सचिन म्हणाला, ''आता मूळ प्रश्न. काकांना जांभई आली आणि लगेच मलाही का आली?''

''याला संसर्गजन्य जांभई म्हणतात,'' उत्तराकाकी म्हणाल्या.

''संसर्गजन्य? म्हणजे जांभईचा व्हायरस असतो की काय?''

मनिषा म्हणाली, ''तसं असतं तर जांभईची लस शोधली नसती का शास्त्रज्ञांनी?''

''इथे 'संसर्गजन्य' हा शब्द रोगाच्या अर्थाने नाही. दुसऱ्याला जांभई देताना पाहिल्यावर आपल्यालाही जांभई येण्याची शक्यता वाढते. कधी जांभईचा आवाज ऐकूनसुद्धा असं होऊ शकतं.''

''म्हणजे मी डोळे बंद केले आणि कान झाकले तर मला जांभई येणार नाही?''

उत्तराकाकी म्हणाल्या, ''तसंही निश्चित नाही. काही लोकांना जांभईबद्दल बोललं, जांभई देणाऱ्या माणसाचं चित्र पाहिलं किंवा जांभईबद्दल वाचलं तरी जांभई येऊ शकते!''

सचिन काही क्षण उत्तराकाकींकडे पाहत राहिला.

''मग'' वाक्य पूर्ण करण्याआधीच त्याने पुन्हा जांभई दिली, ''आऽऽऽऽ...!''

मनिषा हसली. ''काकी, तुमचा प्रयोग पुन्हा यशस्वी!''

''थांब,'' सचिन म्हणाला. ''तुलाही येईल.''

''मला काही''

मनिषाचं वाक्य अर्ध्यावर थांबलं. तिने पटकन हात तोंडावर ठेवला.

''आऽऽऽऽ...!''

चौघेही हसले.

''पण हे घडतं कसं?'' मनिषाने विचारलं.

''आपला मेंदू दुसऱ्या व्यक्तीच्या कृतींकडे नुसता निष्क्रियपणे पाहत नाही. इतरांच्या हालचाली, चेहरे आणि कृती पाहताना आपल्या मेंदूतील संबंधित संवेदना आणि हालचालींशी जोडलेल्या प्रणाली सक्रिय होऊ शकतात. संसर्गजन्य जांभईमागे अशा सामाजिक आणि मेंदूतील प्रतिसादांचा सहभाग असावा. मात्र तिची अचूक मेंदू-यंत्रणा अजून पूर्णपणे समजलेली नाही.''

''मी ऐकलंय की ज्या माणसात सहानुभूती जास्त असते, तो दुसऱ्याची जांभई पाहून स्वतः जांभई देतो.''

''असा संबंध काही अभ्यासांत सुचवला गेला आहे,'' उत्तराकाकी म्हणाल्या, ''पण जांभई दिली म्हणजे तो माणूस सहृदय आणि दिली नाही म्हणजे असंवेदनशील, असा निष्कर्ष अजिबात काढायचा नाही. वय, लक्ष, परिस्थिती आणि व्यक्तीपरत्वे फरक पडतो. वेगवेगळ्या अभ्यासांचे निष्कर्षही एकसारखे नाहीत.''

''म्हणजे जांभईवरून माणसाच्या स्वभावाची परीक्षा घेता येणार नाही?''

''अजिबात नाही!'' उत्तराकाकी म्हणाल्या.

सचिन म्हणाला, ''आमच्या आजोबांना जांभई आली की ते तोंडासमोर बोटांनी टिचकी वाजवतात. काही लोक असं का करतात?''

समाधानकाका म्हणाले, ''आता विज्ञानाच्या प्रयोगशाळेतून आपण लोकपरंपरेकडे आलो.''

''म्हणजे टिचकी वाजवण्यामागे विज्ञान नाही?''

''जांभई थांबवण्यासाठी किंवा शरीरात विशिष्ट बदल घडवण्यासाठी तोंडासमोर टिचकी वाजवल्याचा मान्यताप्राप्त वैज्ञानिक फायदा नाही,'' उत्तराकाकी म्हणाल्या. ''अशा सवयी वेगवेगळ्या समाजांत परंपरेने तयार झालेल्या असू शकतात.''

''पण जांभई देताना आई तोंडावर हात ठेवायला सांगते. तीही फक्त परंपरा?''

''त्यात मात्र व्यावहारिक बाजू आहे. तोंड मोठं उघडून जांभई देणं इतरांसमोर असभ्य मानलं जातं, त्यामुळे तोंड झाकणं सामाजिक शिष्टाचार आहे. जांभईच्या वेळी खोकला किंवा शिंक आली तर सूक्ष्म थेंब पसरू नयेत यासाठीही तोंड झाकणं योग्य.''

सचिनने हात तोंडासमोर धरला. ''पुढची जांभई आली तर पूर्ण शिष्टाचार पाळून!''

मनिषा म्हणाली, ''गेल्या दहा मिनिटांत आपण 'जांभई' शब्द इतक्या वेळा उच्चारलाय की आज दिवसभर किती जांभया येतील कोणास ठाऊक!''

समाधानकाकांनी पुस्तक बाजूला ठेवलं. ''खरं सांगू? मला पुन्हा येतेय... आऽऽऽऽ...!''

सचिन आणि मनिषा एकमेकांकडे पाहून हसू लागले.

दारातून बाहेर पडताना मनिषाला विज्ञानखेळघराचा नेहमीचा फलक दिसला 'इथे प्रश्न विचारण्यास मनाई नाही!'

सचिन म्हणाला, ''पण आजच्या प्रश्नाने आपल्या सर्वांना उत्तरासोबत जांभईही मोफत दिली!'' आणि ते दोघे हसत बाहेर पडले. ●

निवडक



पेझारी येथे किल्ले स्पर्धा संपन्न

श्रीगाव : अलिबाग तालुक्यातील पेझारी येथे टी हीरोज यांच्या वतिने दरवर्षी प्रमाणे किल्ले स्पर्धा आयोजित केली होती या स्पर्धेत प्रथम क्रमांक स्मित प्रशांत पाटील यास १५०० रूपये व सन्मानचिन्ह, द्वितीय क्रमांक साईराज पाटील यास १००० रूपये व सन्मानचिन्ह, तृतीय क्रमांक सोहम नितीन पाटील यास ८०० रूपये व सन्मानचिन्ह, चतुर्थ क्रमांक सार्थ पाटील यास ५०० रूपये व सन्मानचिन्ह, पाचवा क्रमांक विलास म्हात्रे यास ५०० रूपये व सन्मानचिन्ह,सहावा क्रमांक आरूष निलेश पाटील यास ५०० रूपये व सन्मानचिन्ह तसेच सर्व सहभागी स्पर्धकांचा भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी टी हीरोजचे सर्वेसर्वा रोहित पाटील व इतर सदस्यांनी अथक परिश्रम घेतले किल्ले स्पर्धा आयोजित केल्याबद्दल टी हीरोजचे पेझारी ग्रामस्थांनी आभार मानून त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.



महाराष्ट्राच्या मयंक चुलेटची दमदार खेळी!

मुंबई : आर्यन्स बुद्धिबळ अकादमीच्या वतीने महाराष्ट्र बुद्धिबळ संघटनेचे कार्यकारी अध्यक्ष सिद्धार्थ मयूर यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित स्वर्गीय भारतबाई हलकुडे मेमोरियल अनस्टॉपेबल एलबीएचएम १७०० रेटिंगखालील बुद्धिबळ स्पर्धेत महाराष्ट्राच्या मयंक चुलेट याने विजेतेपद पटकावले. मनसुखभाई कोठारी नॅशनल स्कूल, कोंढवा, पुणे येथे सुरू असलेल्या या स्पर्धेच्या नवव्या व अंतिम फेरीत मयंक चुलेटने श्रद्धा पाडवेकरचा पराभव करत एकूण ८ गुणांसह निर्विवाद विजेतेपदावर आपले नाव कोरले. प्रद्युम्न मिश्रा याने सोहम लांगोरे याच्याशी बरोबरी साधत ७.५ गुण मिळवले. ५४.५बुकोल्झ कट गुणसरासरीच्या आधारे त्याने द्वितीय स्थान पटकावले. कर्नाटकच्या समर्थ चौगुले याने महाराष्ट्राच्या लव्य अग्रवाल याच्याशी बरोबरी साधत ७.५गुण मिळवले.५१.५बुकोल्झ कट गुणसरासरीच्या आधारे त्याने तृतीय क्रमांक मिळवला. यावेळी स्पर्धा आयोजन समितीच्या अध्यक्षा वंदना हलकुडे, आयोजन सचिव नागनाथ हलकुडे, स्पर्धा संचालक योगेश महामुनी, प्राचार्या वर्षा कोकिळ, मुख्य पंच आयए नितीन शेणवी, उपमुख्य पंच आयए आम्रीश तल्लू, राजेंद्र माने, मॅनवेल दास, मदन जुनेजा आदी मान्यवर उपस्थित होते. स्पर्धेतील विजेत्या मयंक चुलेट याला आकर्षक करंडक व ६०,०००रुपये, उपविजेत्या प्रद्युम्न मिश्रा याला करंडक व ४०,००० रुपये, तर तृतीय क्रमांकाच्या समर्थ चौगुले याला करंडक व २०,००० रुपये अशी पारितोषिके प्रदान करण्यात आली.



फुटबॉल मैदानावर सडनडेथचा थरार

पुणे : ढोबेवाडी येथील पीडीएफए फुटबॉल मैदानावर पीडीएफए प्रेसिडंटस् करंडक आंतर-क्लब फुटबॉल स्पर्धेत सडनडेथचा थरार चांगलाच रंगला. पुणे जिल्हा फुटबॉल संघटनेतर्फे आयोजित या स्पर्धेच्या दुसऱ्या बाद फेरीत स्निग्मय पुणे एफसीने स्पोर्ट्स मेनियाला ९-८ ने नमवले, तर पुणेरी वॉरियर्स एफसीसह दुर्गा स्पोर्ट्स अकॅडमी, इंद्रायणी स्पोर्ट्स क्लब आणि आयएयफा या संघांनी उपांत्यपूर्व फेरी गाठली. या स्पर्धेच्या दुसऱ्या बाद फेरीत रोहीत रावत आणि प्रविण कावडे यांनी केलेल्या गोलांच्या जोरावर पुणेरी वॉरियर्स एफसीने ईगल एफसीचा २-१ आस पराभव केला. अबुबाकार मणीयार याने केलेल्या एकमेव गोलाच्या जोरावर दुर्गा स्पोर्ट्स अकॅडमीने भारती एफसी संघाचा १-० असा पराभव केला. शुभम पोटघन याने केलेल्या गोलपूर्ण कामगिरीने इंद्रायणी स्पोर्ट्स क्लबने जायंट्स एफसी ब संघाचा १-० असा पराभव केला. आयएयफा संघाने बोपोडी एलएफए एफसीचा ३-० असा सहज पराभव केला. सामन्यात शुभम महापडी, रियान यागीद्री आणि वेदांत मुतेकर यांनी प्रत्येकी एकेक गोल केला. चुरशीने लढल्या गेलेल्या सामन्यात स्निग्मय पुणे एफसी संघाने सडनडेथमध्ये स्पोर्ट्स मेनिया संघाचा ९-८ असा पराभव करून उपांत्यपूर्व फेरी गाठली. स्निग्मय संघाकडून आणि स्पोर्ट्स मेनिया संघाकडून खेळाडूंनी गोल केले.

विन टेंपलने करंडकावर कोरले नाव

पुणे : पिंपरी चिंचवड शहर क्रिकेट असोसिएशनतर्फे आयोजित पिंपरी चिंचवड करंडक आंतरक्लब खुल्या गटाच्या टी-२० क्रिकेट स्पर्धेत हरी सावंत याने केलेल्या अष्टपैलु कामगिरीच्या जोरावर विन टेंपल क्लबने बजरंग दल संघाचा चार गडी राखून पराभव करत विजेतेपद संपादन केले. हिंजेवाडी येथील फोर स्टार क्रिकेट मैदानावर पहिल्यांदा खेळणाऱ्या बजरंग दल संघाचा डाव १८.२ षटकात ८३ धावांवर संपुष्टात आला. सुशांत कांबळे आणि ओंकार यादव यांनी थोड्याफार धावा केल्या. विन टेंपल संघाच्या हरी सावंत याने १६ धावांत तीन गडी बाद केले. वेरून चोदरी यानेसुध्दा १८ धावांत तीन गडी बाद केले. राकेश जे. आणि रोहीत चौधरी यांनी प्रत्येकी दोन गडी बाद करून बजरंग दलाचा डाव झटपट गुंडाळला. हे लक्ष्य विन टेंपल क्लबने ६ गडी गमावून पूर्ण केले. हरी सावंत याने नाबाद ४३ धावांची खेळी केली. याशिवाय ललित मुसळे आणि विहान बागड यांनीही धावांचे योगदान देऊन संघाचे विजेतेपद निश्चित केले.

वेलिंग्टन कसोटी तिसरा दिवस

भारताच्या ४८६ धावा

२ धावांनी गिलचे शतक हुकले | ऋषभ पंतचीही आक्रमक खेळी

। वेलिंग्टन । वृत्तसंस्था ।

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील पहिला कसोटी सामना वेलिंग्टनमध्ये सुरू आहे. या सामन्यातील खेळाचे तीन दिवस पूर्ण झाले आहेत. भारतीय संघाने आपली स्थिती लक्षणीयरीत्या मजबूत केली आहे. पहिल्या डावात भारतीय फलंदाजांनी उत्कृष्ट कामगिरी केली आहे. भारताने ४ विकेट्स गमावून ४८६ धावा केल्या आहेत.दरम्यान, तिसऱ्या दिवशी फलंदाजीसाठी आलेल्या ऋषभ पंतनेही आक्रमक खेळी करत ५५ चेंडूंमध्ये आपले अर्धशतक पूर्ण केले. तो ५५ धावांवर नाबाद आहे. या खेळीसह त्याने एम.एस. धोनी आणि ॲडम गिलख्रिस्ट यांसारख्या दिग्गजांना मागे टाकत एक ऐतिहासिक कामगिरी केली आहे.



ऋषभ पंतची आक्रमक फलंदाजी

वेलिंग्टन कसोटीच्या तिसऱ्या दिवसाच्या अंतिम सत्रात टीम इंडियाने वर्चस्व गाजवले आणि आपली आघाडी १०० पेक्षा जास्त धावांपर्यंत वाढवली. मात्र, या सत्रात भारतीय संघाला दोन मोठे धक्के बसले. शतक पूर्ण केल्यानंतर केएल राहुल १३६ धावांवर बाद झाला, तर कर्णधार गिल दिवसाचा खेळ संपण्यापूर्वी ९८ धावांवर बाद झाला. आता चौथ्या दिवशी सर्वांचे लक्ष ऋषभ पंतवर असेल, ज्याने तिसऱ्या दिवसाच्या शेवटच्या सत्रात आक्रमक फलंदाजी करत ५५ धावा केल्या.

शुभमन गिलने शतकाची संधी गमावली

भारतीय डावाच्या १२५ व्या षटकाच्या चौथ्या चेंडूवर नाट्यमय पुनरागमन झाले, जेव्हा जेकब डफीच्या एका अप्रतिम चेंडूने शुभमन गिलच्या बॅट आणि पॅडमधील फटीतून मार्ग काढत यष्टींना धडक दिली. गिलने संयम आणि आक्रमकतेचा मिलाफ दाखवत १४६ चेंडूंचा सामना केला आणि ९ चौकार व २ उत्तुंग षटकारांच्या मदतीने ९८ धावा केल्या. शतकापासून काही पावलं अर्थात केवळ २ धावा दूर असताना सर्वबाद झाल्यानंतर गिल अत्यंत निराश आणि संतप्त दिसत होता. दरम्यान, दुसरीकडे डफीने आकाशाकडे पाहत सुटकेचा निःश्वास सोडला आणि त्याच्या चेहऱ्यावर स्मितहास्य पसरले.

डफीने आधीच १८० धावा दिल्या

हा सामना जेकब डफीसाठी एक दुःस्वप्न ठरला होता, ज्याला भारतीय फलंदाजांनी पूर्णपणे धुवून काढले होते. डफीने आपल्या २८ षटकांच्या स्पेलमध्ये १८० धावा दिल्या होत्या, पण अखेरीस त्याने दिवसाच्या शेवटच्या षटकात भारतीय कर्णधार शुभमन गिलची मोलाची विकेट घेऊन आपला सर्व थकवा आणि निराशा दूर केली. तिसऱ्या दिवसाच्या खेळाच्या अगदी शेवटच्या क्षणी पडलेल्या या महत्त्वपूर्ण विकेटमुळे दिवसाच्या अखेरीस न्यूझीलंड संघाला निश्चितच काहीसा दिलासा मिळाला.

तिसऱ्या दिवसाचे पहिले सत्र भारतीय संघाचे

केएल राहुल आणि देवदत्त पडिक्कल यांनी तिसऱ्या दिवसाच्या पहिल्या सत्रात शानदार फलंदाजी करत दुसऱ्या विकेटसाठी शतकी भागीदारीसह एकूण ८० धावा केल्या. या सत्रात देवदत्त पडिक्कलने आपले अर्धशतक पूर्ण केले, तर राहुलही शतकाच्या जवळ पोहोचला. या सत्रात दोघांनी सुरुवातीला सावध फलंदाजी केली आणि नंतर खराब चेंडूंवर चौकार मारून त्याचा फायदा उचलला. तिसऱ्या दिवसाच्या खेळाचे दुसरे सत्रही भारतीय संघासाठी चांगले गेले, ज्यात टीम इंडियाने देवदत्त पडिक्कलच्या रूपाने केवळ एक गडी गमावला आणि एकूण १०५ धावा केल्या. दुसऱ्या सत्राच्या सुरुवातीलाच केएल राहुलने आपले शतक पूर्ण केले, तर त्यानंतर लगेचच पडिक्कल ८० धावांवर बाद झाला. चौथ्या क्रमांकावर फलंदाजी करणाऱ्या कर्णधार गिलने राहुलला चांगली साथ दिली आणि धावगती स्थिर ठेवली.

रोहा तालुका प्रीमियर लीग पर्व-५ चा थरार

१४ डिसेंबरपासून रंगणार!

- क्रिकेटप्रेमींमध्ये उत्सुकता शिगेला
- खेळाडूंना आपले कौशल्य दाखविण्याची सुवर्णसंधी!

। धाटाव । प्रतिनिधी ।

रोहा तालुका क्रिकेटप्रेमींसाठी आनंदाची पर्वणी ठरणारी रोहा तालुका प्रीमियर लीनचे आयोजन १४ डिसेंबरपासून करण्यात आले आहे.क्रिकेटप्रेमी मित्र परिवार रोहा यांच्या वतीने रोहा तालुका प्रीमियर लीग २०२६ या भव्य क्रिकेट स्पर्धेचे आयोजन सोमवार १४ डिसेंबर ते रविवार २० डिसेंबर २०२६ या कालावधीत करण्यात आले आहे. सामाजिक कार्यात जिल्ह्यात नावलौकिक असलेले प्रमोदशेठ अनंत म्हसकर यांच्या पुरस्काराने ही स्पर्धा आयोजित करण्यात येत आहे.

रोहा तालुक्यातील क्रिकेट खेळाडूंना आपले कौशल्य दाखविण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध व्हावे,स्थानिक खेळाडूंना प्रोत्साहन मिळावे तसेच तालुक्यातील क्रिकेटचा दर्जा उंचावावा,या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.या स्पर्धेचे सामने रोहा रॉयल्स ग्राउंड, धावीर मंदिरामागे, रोहा येथे खेळविण्यात येणार आहेत.

रोहा तालुका प्रीमियर लीगचे हे पाचवे पर्व असून, मागील चार वर्षांपासून या स्पर्धेला क्रिकेटप्रेमी आणि खेळाडूंचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.यंदाही मोठ्या उत्साहात ही स्पर्धा पार पडणार असून, तालुक्यातील क्रिकेटप्रेमींसाठी ही पर्वणी ठरणार आहे.स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी क्रिकेटप्रेमी मित्र परिवाराचे सर्व सदस्य मेहनत घेत आहेत. या स्पर्धेसाठी रोहा तालुका क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष व पदाधिकारी यांचे विशेष सहकार्य लाभत आहे.

१४ डिसेंबरपासून सुरू होणाऱ्या या क्रिकेट महोत्सवाचा आनंद लुटण्यासाठी रोहेकर क्रिकेटप्रेमी सज्ज झाले आहेत.रोहा तालुका प्रीमियर लीग पर्व-५ मुळे रोह्याच्या क्रीडाक्षेत्रात क्रिकेटचा उत्सव अनुभवायला मिळणार आहे.

शांभवी क्षीरसागरचे दुहेरी सुवर्णयश

मांद्रे (गोवा) : कोल्हापूरच्या शांभवी क्षीरसागरने आपला दबदबा कायम राखत ४१व्या राज्य नेमबाजी स्पर्धेतील दहा मीटर एअर रायफल प्रकारात दोन सुवर्णपदके जिंकण्यात यश मिळवले. जागतिक ज्युनियर स्पर्धेत विश्वविक्रमी कामगिरी केलेल्या शांभवीने राज्य स्पर्धेत महिला तसेच ज्युनियर गटात अव्वल क्रमांक मिळवला. शांभवीने या वर्षाच्या सुरुवातीस झालेल्या जागतिक ज्युनियर स्पर्धेत दहा मीटर एअर रायफलच्या मिश्र सांघिक स्पर्धेत अभिनव शॉसह ५०५.८ गुणांचा जागतिक विक्रम केला होता. त्यापूर्वीच्या कैरो स्पर्धेत दिव्यांशू देवांगणसह विश्वविक्रमी कामगिरी केली होती. तिने कामगिरीचा हाच धडाका राज्य स्पर्धेतही कायम राखला. तिने प्राथमिक फेरीत ६२९.१ गुण मिळवले होते.

रायझिंग स्टार्स क्रिकेट स्पर्धेत भारताने नेपाळचा पाडला फडशा

। दोहा । वृत्तसंस्था ।



कर्णधार तिलक वर्मा (११३ चेंडूंत १०७ धावा) आणि यष्टिरक्षक फलंदाज कुमार कुशाग्र (१०२ चेंडूंत ११७ धावा) यांच्या झंझावाती शतकांच्या जोरावर भारत-अ संघाने आशिया चषक रायझिंग स्टार्स ५० षटकांच्या स्पर्धेतील सलामीच्या सामन्यात नेपाळचा तब्बल ३०६ धावांनी धुव्वा उडवला. प्रथम फलंदाजी करताना भारताने ९ बाद ३३२ धावांचा डोंगर उभारला. प्रत्युत्तरात भारतीय वेगवान गोलंदाजांच्या भेदक माऱ्यासमोर नेपाळचा संपूर्ण संघ अवघ्या २६ धावांत गारद झाला.

नाणेफेक गमावल्यानंतर प्रथम फलंदाजीसाठी उतरलेल्या भारत-अ संघाची सुरुवात काहीशी अडखळती झाली. सुरुवातीच्या विकेट्स गमावल्यानंतर कर्णधार तिलक वर्मा आणि कुमार कुशाग्र यांनी डावाची जबाबदारी स्वीकारली.

या जोडीने तिसऱ्या विकेटसाठी तब्बल २०६ धावांची भागीदारी केली. तिलकने ११३ चेंडूंत सहा चौकार आणि चार षटकारांच्या मदतीने १०७ धावा केल्या. कुशाग्रने त्याच्याही पुढे जात १०२ चेंडूंत १० चौकार आणि पाच षटकारांसह ११७ धावांची धमाकेदार खेळी केली. डावाच्या अखेरीस सूर्यांश शेडगेने आक्रमक फलंदाजी करत अवघ्या १४ चेंडूंत नाबाद ३६ धावा फटकावल्या. त्यामुळे भारत अ संघाला ५० षटकांत ९ बाद ३३२ धावांपर्यंत मजल मारता आली. नेपाळकडून डावखुरा फिरकीपटू ललित राजबंशी आणि लेगस्पिनर संदीप लामिछाने यांनी प्रत्येकी तीन विकेट्स घेतल्या. नंदन यादवने दोन विकेट्स मिळवल्या.

३३३ धावांच्या मोठ्या लक्ष्याचा पाठलाग करताना नेपाळच्या फलंदाजांची भारतीय वेगवान गोलंदाजांसमोर अक्षरशः दाणादाण उडाली. हर्षित राणा आणि प्रिन्स यादव यांनी नव्या चेंडूवर स्विंग आणि वेगाचा प्रभावी वापर करत नेपाळच्या फलंदाजीला खिंडार पाडले. हर्षितने १६ धावांत चार विकेट्स घेतल्या, तर प्रिन्स यादवने अवघ्या सहा धावा देत पाच फलंदाजांना माघारी धाडले. दोघांनी मिळून नेपाळचे नऊ फलंदाज बाद केले.

नेपाळच्या डावातील पहिली विकेट एकही धाव न होता पडली. डावाच्या तिसऱ्या चेंडूवर हर्षित राणाने अर्जुन कमालला पायचीत पकडले. त्यानंतर विकेट्सची मालिका सुरूच राहिली. सातव्या षटकात नेपाळची अवस्था ५ बाद १७ अशी झाली होती. भारतीय गोलंदाजांच्या माऱ्यासमोर नेपाळच्या एकाही फलंदाजाला दुहेरी धावसंख्या गाठता आली नाही. अखेर नेपाळचा संपूर्ण संघ ११.३ षटकांत अवघ्या २६ धावांवर बाद झाला.

डावखुरा फिरकीपटू शाहबाज अहमदनेही एक विकेट मिळवली. भारतीय गोलंदाजांच्या वर्चस्वामुळे कर्णधार तिलक वर्माला अन्य गोलंदाजांना संधी देण्याचीही गरज भासली नाही. या विजयासह भारत-अ संघाने स्पर्धेची सुरुवात दणक्यात केली. फलंदाजांच्या शतकांनंतर गोलंदाजांनीही केलेल्या विक्रमी कामगिरीमुळे भारताने नेपाळला मोठ्या फरकाने पराभूत केले.

सन्मित्रने दिली विजयी सलामी

मुंबई : सन्मित्र क्रीडा, रणील कबड्डी संघ यांची मुं. उपनगर निवड चाचणीत द्वितीय श्रेणी पुरुष गटात विजयी सलामी, तर संघर्ष महिला संघाची उपांत्यपूर्व फेरीत धडक. मुंबई उपनगर कबड्डी असोसिएशनने सुधीर मोरे मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने ४४ वी जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेचे आयोजन केले आहे. द्वितीय श्रेणी पुरुषांच्या पहिल्या फेरीत सन्मित्र संघाने पूर्वार्धातील ६गुणांच्या पिछाडीवरून श्री साई श्रद्धा मंडळाचा प्रतिकार मोडून काढला. पहिला लोण देत व दोन अव्वल पकड करीत श्री साई श्रद्धाने आघाडी घेतली होती. पण उत्तरार्धात सन्मित्रच्या अंकुश, ओमकार यांनी संघाला दुसरी फेरी गाठून दिली.

रायगडचा रत्नागिरीवर पहिल्या डावाच्या आघाडीवर विजय

- प्रज्वल गोवारीचे नाबाद द्विशतक
- ओंकार राक्षिकारची ८ बळींची प्रभावी कामगिरी

रायगड : महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या वतीने धुळे येथील एमसीए क्रिकेट ग्राउंड, उंदणे येथे आयोजित करण्यात आलेल्या १४ वर्षांखालील मुलांच्या क्रिकेट स्पर्धेतील साखळी सामन्यात रायगडच्या संघाने रत्नागिरीच्या संघावर पहिल्या डावाच्या आघाडीवर विजय मिळवला.

या दोन दिवसीय सामन्यात रायगडच्या संघाने प्रथम फलंदाजी करताना सहा गडी गमावून ३९९ धावांवर डाव घोषित केला. रायगडचा सलामीवीर फलंदाज प्रज्वल गोवारी याने धडाकेबाज फलंदाजी करत नाबाद २१० धावांची खेळी साकारली आणि शानदार द्विशतक झळकावले.



त्याला करण कांबळे (४२ धावा) आणि यश ढेडे (४४ धावा) यांनी मोलाची साथ दिली.

रायगडच्या ३९९ धावांच्या प्रत्युत्तरात रत्नागिरीचा पहिला डाव अवघ्या १४७ धावांत आटोपला. रायगडकडून ओंकार राक्षिकार याने पाच बळी घेतले, तर संघाचा कर्णधार रोनित चौहान याने चार फलंदाजांना बाद केले.

पहिल्या डावात मोठी आघाडी घेतल्यानंतर रायगडने रत्नागिरीच्या संघाला फॉलोऑन दिला. दुसऱ्या डावात फलंदाजी करताना रत्नागिरीने दिवसअखेर चार गडी गमावून १३४ धावा केल्या. या डावातही रायगडकडून ओंकार राक्षिकार याने तीन बळी मिळवले, तर रयान जोशी याने एक फलंदाज बाद केला.

डब्ल्यूबीसीसी पाकिस्तानवर मेहरबान | पुरुष ब्लाइंड क्रिकेट आशिया कप

भारताचा पुरस्कार सोहळ्यावर बहिष्कार

। ढाका । वृत्तसंस्था ।

पुरुषांच्या ब्लाइंड क्रिकेट आशिया कपच्या अंतिम सामन्यात एकही चेंडू न टाकता सामना रद्द करण्यात आला. ढाका येथे शुक्रवारी या स्पर्धेचा अंतिम सामना खेळवण्यात येणार होता. मात्र, सामना रद्द झाल्यानंतरही पाकिस्तानला विजेता घोषित करण्यात आल्याने भारतीय ब्लाइंड क्रिकेट संघाने पुरस्कार वितरण सोहळ्यावर बहिष्कार टाकला. या निर्णयामुळे क्रिकेट असोसिएशन फॉर द ब्लाइंड इन इंडियाने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

चांगल्या नेट रनरेटच्या आधारावर पाकिस्तानला विजेतेपदाचा चषक देण्यात आला.



मात्र, दोन्ही संघांना संयुक्त विजेते घोषित करायला हवे होते, अशी भूमिका सीएबीआयने मांडली. सीएबीआयचे सरचिटणीस शैलेंद्र यादव यांनी पाकिस्तानवर एकतर्फी स्वतःला विजेता घोषित केल्याचा आरोप केला. तसेच या निर्णयात वर्ल्ड ब्लाइंड क्रिकेट काऊन्सिलच्या तांत्रिक समितीची भूमिका डावलण्यात आल्याचंही त्यांनी म्हटलं.

अंतिम सामन्यात एकही चेंडू न टाकता पाकिस्तानने स्वतःला विजेता घोषित केल्याच्या प्रकारामुळे मी अत्यंत निराश आहे. या निर्णयाचा मी तीव्र निषेध करतो,असं यादव यांनी निवेदनात म्हटलं. यादव यांनी पुढे स्पष्ट केलं की, नेट रनरेटचा निकष हा साखळी फेरी आणि स्पर्धेतील काही विशिष्ट टप्प्यांसाठी लागू असतो. मात्र, एकही चेंडू न टाकता अंतिम सामना रद्द झाल्यास विजेता ठरवण्यासाठी या निकषाचा आपोआप वापर करता येत नाही.

पावसामुळे अंतिम सामन्यात एकही चेंडू टाकला गेला नसेल, तर अशा परिस्थितीत स्पर्धेच्या लागू नियमांनुसार आणि डब्ल्यूबीसीसीच्या तांत्रिक समितीच्या निर्णयानुसारच निकाल निश्चित केला पाहिजे. अशा परिस्थितीत निकाल निश्चित करण्यासाठी स्पर्धेच्या नियमांमध्ये नमूद केलेल्या पर्यायांचा विचार केला पाहिजे. यामध्ये राखीव दिवस ठेवणं, दोन्ही संघांना संयुक्त विजेते घोषित करणं किंवा अधिकृतरीत्या मान्यता असलेला अन्य पर्याय निवडणं यांचा समावेश होतो,असं यादव यांनी स्पष्ट केलं.

दरम्यान, सीएबीआयने आणखी एक गंभीर आरोप केला आहे. डब्ल्यूबीसीसीचे अध्यक्ष आणि पाकिस्तान ब्लाइंड क्रिकेट काऊन्सिलचे अध्यक्ष सुलतान शाह यांनी तांत्रिक समितीचा निर्णय डावलल्याचा दावा करण्यात आला आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)